**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :०७**

नगरसचिव कार्यालय
दिनांक : ०८/१२/२०१६

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र -०७ बुधवार दि. १४/१२ /२०१६ रोजी सकाळी १०.३०वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**बुधवार दिनांक- १४ /१२/२०१६ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ८६ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५ बुधवार दिनांक १०/०८/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ८७ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८८ | कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८९ | मोटार व्हेईकल विभागासाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजि.) यापदी स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून पुढिल तीन महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत. |
| ९० | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत. ऑफिस रिपोर्ट. |
| ९१ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी, परिचारीका, लॅब टेक्नीशियन यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ९२ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदावंर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९३ | अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट . |
| ९४ | अहमदनगर महानगरपलिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदांर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट |
| ९५ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९६ | अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९७ | श्री.नारायण बाबुराव मिसाळ,यांची स्पर्धा परिक्षा केंद संचालक या पदावर कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावरील केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट |
| ९८ | अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेषपात्र स्त्री कर्मचा-यांकरिता गणवेष खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबत. |
| ९९ | अहमदनगर महानगरपालिकेचे विविध देखभाल दुरूस्ती करीता वार्षिक ठेकेदार नेमणे सन २०१५-१६ अंतर्गत ई - निविदा क्र.१३१६ स्टेज,मंडप,बेरेकेटींग या कामांच्या निविदा मंजुरी बाबत. |
| १०० | विविध देखभाल दुरूस्ती करीता वार्षीक ठेकेदार नेमणे सन २०१५-१६ अंतर्गत ई-निविदा क्र.१३१३ गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती या कामांच्या निविदा मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १०१ | अर्जदार श्री. जगदीश किसन पांडे, नेप्तीगेट नालेगांव यांनी अमरधाम जवळ असलेला १५X२० फुट इतक्या जागा व्यावसायासाठी जागाभाडे पोटी भाडेकराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेवून देणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १०२ | कोपरगाव- अहमदनगर रस्ता (रा.म. १०) देहरे रेल्वे भुयारी मार्गातील बाधीत जलवाहिन्यां स्थलांतरीत प्राप्त निविदा दरास मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट |
| १०३ | अहमदनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता बनवित असलेल्या गारबेज कॉम्पॅक्टरचे संयुक्तीक ४.५ क्यू.मी. क्षमतेचे लोखंडी कंटेनर बनविणे (अंदाजे ७० नग) कामी प्राप्त निविदा दरास मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| १०४ | सुरेश कांतीलाल पटवा नागापुर उप कार्यालय वॉर्ड क्र.७२, बील क्र.४६०(Z१७२०३००८६) एम.आय.डी.सी.एम.एल.ब्लॉक सर्व्हे नं.९ ते २१ मनपा हद्दीतुन वगळल्याने आकरण्यात आलेली घरपटटीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट |
| १०५ | शंकरराव निवृत्ती सोनवणे नागापुर उप कार्यालय वॉर्ड क्र.७२, बील क्र.४५९व ४६१ एम.आय.डी.सी.एम.एल.ब्लॉक सर्व्हे नं.९ ते २१ मनपा हद्दीतुन वगळल्याने आकरण्यात आलेली घरपटटीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्रमांक- ८६ - मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५ बुधवार दिनांक १०/०८/२०१६ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत

२] विषय क्रमांक- ८७ ते १०५ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक-८६ बुधवार दिनांक १४/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५ बुधवार दिनांक १०/०८/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५ बुधवार दिनांक १०/०८/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- सभासुरू करण्यापूर्वी प्रशासनाचे जबाबदार अधिकारी उपायुक्त कॅफो हे सभेस उपसस्थित नाहीत.तरी सभा तहकुब ठेवा व नंतर दोन दिवसांनी सभा घ्या.

मा.सभापती साहब :- आयुक्त व उपायुक्त सभेस उपस्थित नाही.तुम्ही आर्थिक बाबतीत निर्णय घेण्याचे अधिकार तुम्हाला आहेत का?

सहाय्यक आयुक्त श्री.दराडे :- मा.उपायुक्त चारठाणकर साहेबांनी मला सांगीतले सभा घ्या.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- तुमच्याकडे या बाबतचे लेखी आहे का ? स्थायी समिती घ्यायला जबाबदार अधिकारी पाहिजे.

सहाय्यक आयुक्त श्री.दराडे :- वालगुडे साहेब अमृत योजनेची आढावा बैठकीसाठी मुंबईला गेले.

मा.सभापती साहेब :- आयुक्त व आयुक्त असले तर त्यांना बोलावा म्हणजे निर्णय घेता येईल. तुम्ही काम करणार आम्हीच चर्चा करायची का ?

सहाय्यक आयुक्त श्री.दराडे :- आयुक्त साहेबांना विचारतो सभा घ्यायला सांगितलेली.

मा.सभापती साहेब :- नेमके काय म्हणले आयुक्त सांगा अ.नगर येथील इदगाह मैदान या धार्मिक स्थळाची करमाफी मिळावी असे निवेदन दिले त्यावर माफी दयायची आहे. आज जबाबदारी घेणारे अधिकारी नाही त्यामुळे आजची मिटींग शनिवारी दि.१७/१२/२०१६ रोजी सकाळी ११.३० ला होईल. या ठिकाणी प्रशासनाला १ पत्र देण्यांत यावे की, स्थायी समितीमध्ये महत्वाचे विषय असतात. तरी त्यांना पत्र देउन कळवावे की, प्रशासनला बेजबाबदार म्हणून लेखाी काढावे व प्रत्येक विभागाचे अधिकरी यांनी माहितीसह उपस्थित रहावे प्रभाग समिती क्र.३ प्रभाग अधिकारी यांनी या निवेदनाच्या पूर्ण प्रक्रिया पूर्ण करून उपस्थित रहावे.

**आजच्या मिटींग शनिवारी दि.१७/१२/२०१६ रोजी सकाळी ११.३० वा सभा सुरू.**

मा.सभापती साहेब :- दिनांक १४/१२/२०१६ ची तहकुब सभा क्र.७ दि.१७/१२/२०१६ रोजी सकाळी ११.३० वा. सभा सुरू..

मा.सभापती साहेब :- मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे. इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- इतिवृत्त कायम करण्यात यावे

मा.श्री. मनोज दुलम :- इतिवृत्त कायम करण्यात यावे

मा.सभापती साहेब :-मा.स्थायी समिती सभा क्र.-०५दि.१०/०८/२०१६रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५ बुधवार दिनांक १०/०८/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यात येत आहे.

सुचक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही/-

अनुमोदक :- मा.श्री. मनोज दुलम सही/-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक-८७ शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, श्री. प्रदिप सदाशिव ढगे व राहुल सदाशिव गिते यांनी दि. ११/०७/२०१६ रोजी अर्ज देवुन त्यामध्ये"पा. पु. विभागामध्ये कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) या पदावर कार्यरत आहे. सध्या मुळानगर ते वसंत टेकडी जलवाहिनी देखभाल व दुरुस्ता तसेच मुळानगर, विळद, नागापुर येथील पंपींग मशिनरीचे अंतर्गत कामे पाहणे तसेच प्रभाग समिती क्र. २ अंतर्गत पाणी वितरण व्यवस्था व व्हॉलमन यांचेवर नियंत्रण इत्यादी कामावर कार्यरत असुन आमची दि. १९/०८/२०१६ रोजी मुदतवाढ संपुष्टात येत आहे. तरी आम्हाला पा. पु. विभागामध्ये काम करण्याची इच्छा असुन मुदतवाढ मिळावी ." असे नमुद करुन विनंती केलेली आहे.

श्री.प्रदिप सदाशिव ढगे व राहुल सदाशिव गिते यांचे दि.११/०१/१६ रोजीचा अर्ज व मा.मॅकेनिकलइंजि.पा.पु.विभाग प्रमुख यांचे कडील मागणी प्रस्तावाच्या अनुषंगाने अ.नगर,मनपा पा पु.विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) व इतर तांत्रिक पदावर संबधितांची अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्नेनेमणूक करणे बाबत पुर्व मंजुरी मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव हा इकडील जा. क्र.आस्था. वर्कशीट २४६ दि. ६/०२/१६ अन्वये मा. स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता. सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्र. ७१ दि. २०/०२ /१६ अन्वये ठराव पारीत करुन संबधितांची पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) व इतर तांत्रिक पदावर करारानुसार तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस पुर्व मंजुरी देण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये शाखा अभियंता ,पा. पु. विभाग यांचे कडील जा.क्र. पा. पु. विभाग १३७४ दि. १२/०२/१६ अन्वयेचा अहवाल व मा.स्थायी समिती ठराव क्र. ७१ दि. २०/२/ २०अन्वयेचा पारीत मंजुर ठरावाच्या अनुषंगाने अ.नगर म.न.पा.च्या पा. पु. विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) या पदांवर अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती केलेल्या संबधीतांची त्या बाबतची माहीती खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती दिनांक | सद्यस्थिती मधील सहा महिने पुर्न नियुक्ती कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राहुल सदाशिव गिते | कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) | २०,०००/- | ८७८९ १९/०३/२०१६ | २०/०२/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | २०/०२/२०१६ते१९/०८/२०१६ |
| २ | राहुल सदाशिव ढगे | कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) | २०,०००/- | ८७८९ १९/०३/२०१६ | २७/१२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | २०/०२/२०१६ते१९/०८/२०१६ |

वरील संबधितांची जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणुक ८७८९ दि. १९/०३/२०१६ अन्वये करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) यापदी अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन त्यांची सदरची मुदत ही दिनांक २० / ०८ / २०१६ पासुन समाप्त होत आहे.

मा. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक - अमपा - २०१२ / प्र. क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतीच मान्यता प्राप्त झालेली आहे.त्यामध्ये पान नं. १७ वरील विवरण पत्र क्रमांक २२ मध्ये अनु. क्र. ७ मध्ये जल अभियंता विभागासाठी कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) या पदांची मंजुर पद संख्या खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेली आहे.

| अ. क्रं. | पदाचा तपशिल | मंजुर पदे | नवीन पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|
| ७ | कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) | | ३ | ३ |

तसेच मा. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - ब , शनिवार , फेब्रुवारी ६, २०१६ / माघ १७ , शके १९३७ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या आवश्यक शैक्षणिक पात्रतेस मान्यता दिलेली असुन त्यामधील पान नं. २२ वरील परिशिष्ट २ मध्ये अनु.क्रं. ५६ मध्ये खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता व नेमणुकीची पध्दत नमुद केलेले आहे.

| अ. क्रं. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकी करीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ५६ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी -३ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | नामनिर्देशन १०० % | ३३ वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेची पदविका<br>ब) ३ वर्षाचा संबधित कामाचा अनुभव किंवा<br>क) यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेची पदवी. |

सदरचा आकृतीबंध हा अनु. क्रं. १ ते ७ या अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये अनु.क्रं. १ ,२ , ६ व ७ खालील प्रमाणे अटी व शर्ती नमुद केलेली आहे.

**१)** शासन निर्णय दिनाक १० ऑगस्ट २००९ मध्ये स्पष्ट केल्यानुसार , शासनाने ज्याप्रमाणे ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणी लागु केल्या आहेत. त्याप्रमाणेच महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचा-यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे आवश्यक आहे. सदर अटीची पुर्तता झाल्यानंतर , नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणारी पदे आस्थापना खर्च विहीत मर्यादेत (३५ %) असल्यास विहीत मार्गाने भरता येईल.

**२)** महानगरपालिकेच्या ज्या सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करणे शक्य व आवश्यक आहे. अशा सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करण्यात याव्यात.

**३)** अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी ही शासन निर्णय, दिनांक ०४.०५.२००६ नुसार विहित केलेल्या मर्यादेत येत नाही तोपर्यत नवीन पदे न भरण्याचे शासनाचे आदेश कायम राहतील.

**४)** नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणा-या प्रत्येक संवर्गाची शासन नियमानुसार बिंदु नामावली अद्ययावत करुन ती प्रमाणात करुन घेणे, तसेच बिंदु नामावलीनुसार येणा-या आरक्षणाप्रमाणे पदे भरणे आवश्यक राहील. बिंदुनामावली प्रमाणित केल्याशिवाय कोणत्याही संवर्गातील पदे सरळसेवा, पदोन्नती अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात येऊ नयेत.

मा. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय , क्रमांक-अमपा-२०१२/प्र.क्र.३०१ (भाग -२)/ नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधामधील जल अभियंता विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) यापदांवर वरील नमुद केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे कार्यवाही करुन सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन तसेच नव्याने पदमंजुर संख्येनुसार पदनिहाय समावेशन करुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे सुधारीत आकृतीबंधामधील पदसंख्ये नुसार सद्यस्थिती मध्ये कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) या पदांची रिक्त पद संख्या निश्चित होत नाही.

सद्यस्थितीमध्ये पाणी पुरवठा विभागा करीता तात्पुरत्या स्वस्पात कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) यापदांवर करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीवरील दर्शविलेल्या संबधितांची सद्यस्थितीमध्ये शैक्षणिक अर्हता ही खालील प्रमाणे असुन त्याबाबतचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.नं. | नांव | सद्यस्थिती मधील तात्पुरत्या स्वस्पात पदनाम | धारण केलेली शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | राहुल सदाशिव गिते | कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) | बी.ई. मेकॅनिकल इंजिनियरंग |
| २ | प्रदिप सदाशिव ढगे | कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) | बी.ई. मेकॅनिकल इंजिनियरंग |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबतः महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील - ५३ तरतुद बाबतची छायांकित प्रत.)

अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थिती मध्ये सुधारीत आकृतीबंधामधील जल अभियंता विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) यापदांवर सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन तसेच नव्याने पदमंजुर संख्येनुसार पदनिहाय समावेशन करुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सद्यस्थितीमध्ये पाणी पुरवठा विभागामार्फत शहर व उपनगरामध्ये नागरीकांना पाणी वितरणामध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे श्री. प्रदिप सदाशिव ढगे व राहुल सदाशिव गिते यांचे दिनांक ११/०१/२०१६ रोजीचा अर्ज व मा. मॅकेनिकल इंजि. पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे

कडील यापुर्वीच्या मागणी प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) या पदांवर खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी धोरणात्मक बाब म्हणून निर्णय झाल्यास दरमहा रुपये ४०,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च २,४०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | राहुल सदाशिव गिते | कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) | २०,०००/- | पाणी पुरवठा |
| २ | प्रदिप सदाशिव ढगे | कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) | २०,०००/ | पाणी पुरवठा |

श्री. प्रदिप सदाशिव ढगे व राहुल सदाशिव गिते यांचे दि.११/०१/२०१६ रोजीचा अर्ज व मा. मॅकेनिकल इंजि. पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे कडील यापुर्वीच्या मागणी प्रस्तावाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) या पदांवर वरील संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अभिप्राय असे.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांची स्वाक्षरी

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,त्रुटी निरंक.

यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,सदर सेवा अत्यावशक असल्याने तांत्रिक खंड देवून ही शेवटची मुदतवाढ असेल दरम्यानच्या काळात Out Sourcing व्दारे कार्यवाही पुर्ण करून सादर करावे.तसेच सदर पदे आकृतीबंधात मंजूर असल्यास कायम भरती /पदोन्नतीची प्रक्रिया सुध्दा तातडीने हाती घेणे उचित होईल.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- नविन आलेले अधिकारी आपला परीचय सांगा व विषयाची माहिती दया.

आस्थापना विभाग प्रमुख श्री. लहारे :- परिचय सांगितला. राहुल गिते, प्रदिप ढगे यांची मानधनावर पुर्ननियुक्ती बाबत चा विषय आहे.

मा.श्री. गणेश भोसले :- मानधनावर पुर्ननियुक्ती आधीची मुदत संपण्या आधी प्रस्ताव का तयार केले जात नाहीत. मुदत संपल्यानंतर प्रस्ताव तयार केले जातात.मुदत संपल्यानंतर कर्मचारी कामावर येत नाही.त्यामुळे कामामध्ये विस्कळीत येवून नागरीकांची गैरसोय होते.

मा.सभापती साहेब :- मानधनावरील कर्मचा-यांचे ब-याच महिन्यापासून पगार प्रलंबीत आहेत.

मुख्यलेखापरिक्षक श्री.अनारसे :- मान्यता मिळाल्यानंतर त्यांचा राहिलेला पगार निघून जाईल.

मा.सभापती साहेब :- पाच महिन्यानंतर स्थायी समितीकडे प्रस्ताव येतो. आम्ही आधीच सांगितले एक महिना आधी प्रस्ताव देण्यात यावेत.मुदत संपण्याआधी मंजूरी घ्यायला पाहिजे.

आस्थपना विभाग श्री.सोनवणे :- प्रस्ताव वेळेत पाठविले परंतु आचारसंहिता असल्याने प्रस्ताव मंजूर होवू शकले नाहीत.

मा.श्री.गणेश भोसले :- मुदत संपलाच्या आधी १ महिना आधी स्टॅंडींगकडे पाठवायला पाहिजे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- एक महिना आधीच प्रस्ताव पाठवायला पाहिजे.

मा.श्री.मनोज दुलम :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब:- ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात यावी.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) यापदांवर तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री.मनोज दुलम सही/-

अनुमोदक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७

विषय क्रमांक-८८ शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्यास्वरूपात परिचारीका यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

**संदर्भ :-** प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. प्रमुख यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ३७८ दिनांक २८/०७/२०१६ अन्वयेचा अहवाल.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. प्रमुख यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ३७८ दि. २८/०७/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " जा.क्र. आस्थापना करारबध्द नेमणुक ७७२४ दि.०६/०२/२०१६ अन्वये सौ. नलु पोपट खराडे ह्या परिचारीका या पदावर करारबध्द पध्दतीने रु ६,०००/- दरमहा मानधनावर सहा महिन्या करिता कै. बा. दे. दवाखाना येथे हजर झालेल्या आहेत. त्यांच्या नेमणूकीचा कालावधी दि. ०५/०८/२०१६ रोजी संपत आहे. सदरच्या कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांनी पुढील कालावधीसाठी पुर्ननेमणुक मिळणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. तरी वरील सौ. नलु पोपट खराडे परिचारीका यांना नियमा प्रमाणे तांत्रिक खंड देऊन ०८/०८/२०१६ पासुन सहा महिन्या करीता कै.बा.दे.दवाखान्यासाठी परिचारिका या पदावर करारबध्द पध्दतीने पुनर्नेमणुक करणेस शिफारस आहे. असे नमुद करुन निर्देशित केलेले आहे.

प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. प्रमुख यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ३८० दि.०८/०७/२०१५ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता दि. २५/०८/२०१५ रोजीच्या दैनिक सार्वमत व दि.०३/०८/२०१५ रोजीच्या दैनिक नगर टाईम्स या वर्तमान पत्रामध्ये थेट पध्दतीने **(Walk In Interview)** नुसार उमेदवारांच्या मुलाखती बाबत जाहिराती प्रसिध्दीस देऊन दि. १० / ०९ / २०१५ रोजी मुलाखती आयोजीत करण्यात आलेल्या होत्या. त्यानुषंगाने दि. १० / ०९ / २०१५ रोजी मा. अतिरिक्त आयुक्त तथा अध्यक्ष,निवड समिती, अहमदनगर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली मा. निवड समिती यांनी उपस्थित उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेऊन पात्र ठरवुन उमेदवारांची निवड व प्रतिक्षा सुचीवरील उमेदवारांची निवड केलेली होती.

त्यानुसार निवड झालेल्या व प्रतिक्षा सुचिवरील निवड झालेल्या उमेदवारांची निवड यादी हि अहमदनगर महानगरपालिकेच्या नोटीस फलकावर जा.क्र.आस्था. ३८७० दि.१५/०९/२०१५ अन्वये दि.१५/०९/ २०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. दि.२५/०८/२०१५ रोजीच्या दैनिक सार्वमत व दि.०३/०८/२०१५ रोजीच्या दैनिक नगर टाईम्स या वर्तमान पत्रामध्ये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता थेट पध्दतीने **(Walk In Interview)** नुसार उमेदवारांच्या मुलाखती बाबत खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता व त्याप्रमाणे दरमहा मानधन नमुद करुन जाहिराती प्रसिध्दीस देण्यात आलेली होती.

| अं. क्र. | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | विभाग | पद संख्या | आवश्यक शैक्षणिक पात्रता | दरमहा मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | परिचारीका | कै.बा.दे.दवा. | १० | (RGNM) आर.जी.एन.एम.<br>----------------------------<br>वरील उमेदवार उपलब्ध न झाल्यास -<br>(RANM) आर.ए.एन.एम. | ८,०००/-<br>-----------<br>६,०००/- |

वरील निवड झालेल्या संबधितांची कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका या पदी अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक ५६२९ दि.२६/१० /२०१५ अन्वये सहा महिन्या करिता दरमहा मानधनावर कै.बा.दे.दवाखान्यामध्ये करारबध्द नेमणूक करण्यात आलेली होती.

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा. यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ८६२ दि ०९/१२/२०१५ अन्वयेच्या अहवाला नुसार उपरोक्त जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणूक ५६२९ दिनांक २६/१०/२०१५ अन्वयेच्या कार्यालयीन आदेशा नुसार अनिता रमेश पालवे , दिपिका धनराज गायकवाड व शितल दिलिप टाक व उध्दव खेडकर हे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये रुजु झालेले नव्हते त्यामुळे मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा. यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ८६२ दि ०९/१२/२०१५ अन्वयेच्या अहवालाअनुषंगाने प्रतिक्षा सुचीवरील निवड झालेले संबधित नलु पोपट खराडे यांची कै.बा.दे.दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका या पदी अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली असुन त्या बाबतचा तपशिल खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नलु पोपट खराडे | परिचारीका | ६,०००/- | जा.क्र. ७७२४ दि.०६/०२/२०१६ | ०६/०२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | ०५/०८/२०१६ |

वरील संबधितांची जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणुक ७७२४ दिनांक ०६/०२/२०१६ अन्वये करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली असुन त्यांची सदरची मुदत ही दिनांक ०६ / ०८ / २०१६ पासुन समाप्त होत आहे.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतीच मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यामध्ये पान नं. २२ वरील विवरण पत्र क्रमांक २९ मध्ये अनु. क्र. ९ व १० नुसार रुग्णालय व आरोग्य सेवा विभागासाठी परिचारिका / सहाय्यक परिचारीका / प्रसविका या पदांची मंजुर संख्या खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेली आहे.

| अ. क्रं. | पदाचा तपशिल | पुर्वीचे मंजुर पदे | नवीन पदे | एकुण पदे | सद्यस्थितीमध्ये पदांवर कायम कार्यरतपद संख्या | सद्यस्थितीमध्ये मानधनावरील कार्यरत पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | परिचारीका (जी.एन.एम) | १६ | -- | १६ | १४ | ११ |
| १० | सहाय्यक परिचारिका / प्रसविका (ए.एन.एम.) | ०३ | ०६ | ०९ | | |
| एकुण | | १९ | ०६ | **२५** | **१४** | **११** |

तसेच मा. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - ब , शनिवार , फेब्रुवारी ६, २०१६ / माघ १७ , शके १९३७ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या आवश्यक शैक्षणिक पात्रतेस मान्यता दिलेली असुन त्यामधील पान नं. ३३ वरील परिशिष्ट २ मध्ये अनु.क्रं. १११ व ११२ मध्ये खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता व नेमणुकीची पध्दत नमुद केलेले आहे.

| अ.क्रं. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकी करीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १११ | निम वैद्यकीय सेवा श्रेणी - ३ | नर्स /परिचारीका | नामनिर्देशन ७५ % | ३३ वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी विज्ञान शाखेची परिक्षा उर्तीर्ण.<br>ब) महाराष्ट्र नर्सिग कौन्सीलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका.<br>क) शासकीय / निमशासकीय खासगी रुग्णालयातील परिचारिका म्हणुन ३ वर्षाचा अनुभव आवश्यक .<br>ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सीलची नोंदणी आवश्यक. |
| ११२ | निम वैद्यकीय सेवा श्रेणी -३ | नर्स (ए.एन.एम.) (मिडवाईफर/ नर्स (ए.एन.एम.) | नामनिर्देशन १०० % | ३३ वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची माध्यमिक शालांत परिक्षा उर्तीर्ण.<br>ब) शासन मान्यता प्राप्त संस्थेचा ए. एन. एम. अभ्यासक्रम पुर्ण व त्यानंतर कामाचा २ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>क) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सीलची नोंदणी आवश्यक |

सदरचा आकृतीबंध हा अनु. क्रं. १ ते ७ या अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये अनु.क्रं. १ ,२ , ६ व ७ खालील प्रमाणे अटी व शर्ती नमुद केलेली आहे.

**१)** शासन निर्णय दिनाक १० ऑगस्ट २००९ मध्ये स्पष्ट केल्यानुसार , शासनाने ज्याप्रमाणे ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणी लागु केल्या आहेत. त्याप्रमाणेच महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचा-यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे आवश्यक आहे. सदर अटीची पुर्तता झाल्यानंतर , नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणारी पदे आस्थापना खर्च विहीत मर्यादेत (३५ %) असल्यास विहीत मार्गाने भरता येईल.

**२)** महानगरपालिकेच्या ज्या सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करणे शक्य व आवश्यक आहे. अशा सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करण्यात याव्यात.

**६)** अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी ही शासन निर्णय, दिनांक ०४.०५.२००६ नुसार विहित केलेल्या मर्यादेत येत नाही तोपर्यत नवीन पदे न भरण्याचे शासनाचे आदेश कायम राहतील.

**७)** नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणा-या प्रत्येक संवर्गाची शासन नियमानुसार बिंदु नामावली अद्ययावत करुन ती प्रमाणात करुन घेणे, तसेच बिंदु नामावलीनुसार येणा-या आरक्षणाप्रमाणे पदे भरणे आवश्यक राहील. बिंदु नामावली प्रमाणित केल्याशिवाय कोणत्याही संवर्गातील पदे सरळसेवा, पदोन्नती अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात येऊ नयेत.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र. क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधामधील रुग्णालय व आरोग्यसेवा विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या परिचारीका यापदांवर वरील नमुद केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे कार्यवाही करुन सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

सद्यस्थितीमध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदांवर अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावर करारबध्द नियुक्ती वरील दर्शविलेल्या संबधितांची शैक्षणिक अर्हता ही खालील प्रमाणे असुन त्याबाबतचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.नं. | नांव | धारण केलेली शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | नलु पोपट खराडे | आर.ए.एन.एम. |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबतः महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ तरतुद बाबतची छायंकित प्रत.)

अहमदनगर महानगरपालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवे करीता सद्यस्थितीमध्ये सुधारीत आकृतीबंधामधील रुग्णालय व आरोग्य सेवा विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या परिचारीका यापदांवर सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सद्यस्थितीमध्ये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्या

मध्ये अत्यंत कमी प्रमाणात परिचारिका असल्यामुळे तात्काळ नागरिकांना आरोग्यसेवा देणेमध्ये अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै. बा.दे.दवा. प्रमुख यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ३७८ दिनांक २८/०७/२०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वस्पात परिचारीका या पदांवर खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ०८/०८/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये ६,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च ३६,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वस्पात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | नलु पोपट खराडे | परिचारीका | ६,०००/- | कै.बा.दे.दवा. |

प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै. बा.दे.दवा. प्रमुख यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ३७८ दिनांक २८/०७/२०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वस्पात परिचारीका या पदांवर वरील संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ०८/०८/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा. स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांची संमती दर्शक स्वाक्षरी.
यावर मुख्यलेखाधिकारी सांची स्वाक्षरी.
यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.
यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,अ प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक ठरते.
यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.
यावर मा.आयुक्त साहेब यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- टेक्नीकल पद आहे ना ? ब्लड बॅक अत्याधुनिक झाली आहे हे पद परमनंट करायला काय हरकत आहे.

मा.उपायुक्त (सा) श्री. चारठणकर :- मा.स्थायी समितीच्या आदेशानुसार आपण त्यांना कामावर घेतो. शासनाने आपल्याला खर्चाबाबत जे आदेश दिले आहेत. ७२ टक्के आस्थापना वर खर्च होतो. सुधारीत प्रस्ताव करून दिला जर तो मा. महासभेत मंजूरी घेवून मा. शासनाकडे पाठवू जे कर्मचारी लागतात त्या अनुषंगाने आकृतीबंधानुसार काही बदल करून घ्यायचे आहे. नवीन पद निर्माण करण्याची गरज आहे. पुढच्या महासभेच्या आम्ही तो प्रस्ताव देवू.

सहाय्यक आयुक्त श्री. दराडे :- चार्ट बनवला आहे. आयुक्त साहेबांकडे पाठवणार आहे.

मा.सभापती साहेब :- मंगळवार व बुधवार पर्यत होईल का ?

मा.श्री. दिलीप सातपुते :- जे लोक आपल्याकडून निघुन गेले त्यांचे जागेवर जाहिरात देवून पदे भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

डॉ. शिल्पा :- जे लोक सध्या कार्यरत आहे त्यांची मुदत ३० डिसेंबरला संपत आहे त्यासाठी आम्ही प्रस्ताव दिला आहे.

आस्थापना प्रमुख श्री. सोनवणे :- १ प्रस्ताव आला आहे.

मा.श्री. दिलीप सातपुते :- वृषाली पाटील सोडून गेल्या त्याच काय ?

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- वृषाली पाटील रजेवर आहे.

वैद्यकिय अधिकारी डॉ.श्रीमती शिल्पा पाठक :- सर आम्ही कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर लांकाबाबत बोलतो.

मा.श्री.गणेश भोसले :- मागणीपत्र नाही तर जाहिरात कोठुन काढतील.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- बी.डी.सी.डी.मध्ये दोन डॉक्टर लॉगलीव्ह वर आहे.डॉ.राजुरकर कायम स्वरूपी आहे.डॉ.वृशाली पाटील सध्या रजेवर आहेत.त्यांच्या रजेच्या मुदतीत आपण त्यांच्या जागेवर आपण दुसरे डॉक्टर घ्या.तक्रार मेट्रन शिंदे यांची आहे.मेट्रन शिंदे यांच्याकडे अतिरिक्त कार्याभार आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- त्या जर हिटलर सारखे वागत असतील.३९ कर्मचारी लेखी सहया करून तक्रार करतात.त्यात काही तत्थ असेल ना?

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- हा खुलासा मेडिकल ऑफिसरन करायला पाहिजे.

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- सेवाजेष्ठतेनुसार त्यांना नियुक्ती दिली.आरोग्य विभागामार्फत प्रस्ताव आला होता.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- डॉक्टर जर सोडून जायला लागले तर काहि तरी असेल ना?

सोनवणे यांना जो चार्ज दिला त्याला शैक्षणिक अर्हत काही आहे का?

मा.उपायुक्त श्री चारठाणकर :- सोनावणे यांच्या कडे जो चार्ज दिला आहे तो शैक्षणीक अर्हतेमध्ये बसत नाही. पण त्यांना कामाच्या सोयीसाठी चार्ज दिला आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ब्लड बॅकेबाबत माहिती सांगा.

ब्लड बॅंक वैद्यकिय अधिकारी :- ऑगस्ट २०१६ मध्ये मशिनरी आल्या आहेत.काही मशिनरी येणे बाकी आहे.त्याचा फॉलअप चालू आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- रक्त घटक बाबत तुम्हाला स्टाफ पुरेसा आहे का?

ब्लड बॅंक वैद्यकिय अधिकारी :- टेक्नशिय ४ व वैद्यकीय आधिकारी ४ आपण ॲप्लीकेशन करून स्टाफ भरतो.

मा.उपायुक्त श्री. चारठाणकर :- आपण जो आकृतीबंध मंजूर झाला त्यामध्ये ब्लड बॅंकेसाठी स्टाफ शासनाकडून मंजूर करून घ्यावा लागणार आहे.त्या मशीन हया भारी आहेत.सध्या जेमतेम मार्गाने भरणे आवश्यक आहे. डेग्यच्या वेळेला प्लेटलेट बाबत आपण पाहिल तर आपल्याला नागरीकांना प्लेटलेट कमी दराने देता येईल.

मा.श्री.मनोज दुलम :- सर्वानुमते ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- सर्वानुमतेऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसारअहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री.मनोज दुलम सही/-

अनुमोदक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७

विषय क्रमांक-८९ शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** मोटार व्हेईकल विभागासाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजि.) यापदी स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून पुढिल तीन महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की,यापुर्वी मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेचा विचार करून करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता(ॲटोमोबाईल इंजि.) यापदी १) स्वप्निल बाळकृष्ण पवार व २) जयेश वसंत कोके यांची अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र.आस्थापना कराबध्द नेमणूक १००१ दिनांक २०/०५/२०१६ अन्वये दिनांक १५/०३/२०१६ ते १४/०९/२०१६ या कालावधीमध्ये सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली होती.

उपरोक्त प्रकरणी १) स्वप्निल बाळकृष्ण पवार हे यापूर्वी दिनांक ०६/१२/२०१६ पासून तर २)जयेश वसंत कोके हे दिनांक १३/०८/२०१६ पासून वेळोवेळी तांत्रिक खंड देवून सह महिन्या करीता कार्यरत होते.

त्यामुळे सद्यस्थितीमध्ये त्यांची सेवाजेष्ठता पाहता स्वप्निल बाळकृष्ण पवार हे सेवाजेष्ठ दिसून येतात.

तरी मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेकरीता करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ॲओमोबाईल इंजि.) यापदी स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून पुढील तीन महिन्या करीता दरमहा रू.२०,०००/- या मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस पुर्व मंजूरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजूरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर सहाय्यक आयुक्त यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय कि, अ मान्येतेस्तव.

यावर मा.आयुक्त साहेब यांची संमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>चर्चा</u>**

मा.सभापती साहेब :- मोटार व्हेईकल विभागासाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजि.) यापदी स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून पुढिल तीन महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- यामध्ये सेवाजेष्ठता कशाच्या आधारावर ठरविण्यात आली.

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- सेवाजेष्ठतेचा प्रश्नच येत नाही.एकच पद आहे कनिष्ठ अभियंता.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- याला सेवाजेष्ठता लागू होत नाही तर दोघांचा प्रस्ताव ठेवा.ज्याला घ्यायच त्याला घेता येईल.

मा.सभापती साहेब :- निकम साहेब आपण दोन पदे भरूशकतो का?

मेकॅनिकल इंजी.श्री.निकम :- मोटार व्हेईकल विभागाकडून २ इंजीनिअर पाहिजे अशी मागणी आस्थापना विभागाला केली होती.

मा.श्री.बाळासाहेब बोराटेः- दोघांना घ्या, एकाला घ्यायचं असेल तर विषय पेंडीग ठेवा.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- त्याची मागणी कनिष्ठ अभियंता व सहाय्यक अभियंता या दोन पदावर कर्मचारी पाहिजे स्थायी समितीला वाटत असेल की दोन पदे भरली जावी तर आम्हाला अडचण नाही.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- मागणी दोघांची होती ना.

मा.सभापती साहेब :- दोघांची नियुक्ती तीन महिन्यांची आहे.त्यांना तांत्रीक एक दिवस खंड देवून सहा महिन्याची नियुक्ती दयावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- मेकॅनिकल इंजी.श्री.निकम यांची दोन ऑटोमोबाईल इंजीनियर यांची मागणी आहे.कामाची आवश्यकता पहाता आधी प्रमाणे दोघांना नियुक्ती देण्यात यावी.

मा.श्री.दिलीप सातपुते :- सर्वानुमतेऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- आकृतीबंध तयार करताना महानगरपालिकेच्या मोटर व्हेईकल विभागाचा व्याप पहता जास्त पदाची निर्मीती करणे गरजेचे आहे.मोटार व्हेईकल विभागा मध्ये तेथील वहानांची संख्या पहाता दोन इंजि आवश्यक वाटते त्यामुळे पुर्वी प्रमाणे करारा नुसार कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजि.) यापदावर स्वप्निल बाळकृष्ण पवार व श्री.जयेश कोके यांची अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून पुढिल सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे मोटार व्हेईकल विभागासाठी तेथील वाहनांची संख्या व कामाची निकड, विभागाची मागणी पहाता करारा नुसार कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजि.) यापदी स्वप्निल बाळकृष्ण पवार व पुर्वी प्रमाणेच मानधनावर कार्यरत असलेले श्री.जयेश कोके यांना सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून पुढिल सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस ही सभा मान्यता देत आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही/-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक-९० शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत. ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

**संदर्भ :-** प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. प्रमुख यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ५२५ दिनांक २१/०९/२०१६ अन्वयेचा अहवाल.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, प्र. मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. प्रमुख यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ५२५ दि. २१/०९/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " जा. क्र. आस्थापना नेमणुक ८००८ दि.२०/०२/२०१६ अन्वये डॉ. श्री.अमोल जाधव यांची वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग तज्ञ) कै. बा. दे. दवाखाना या पदावर तात्पुरत्या स्वरुपात रु २०,०००/- दरमहा मानधनावर करारबध्द पध्दतीने सहा महिन्या करीता नेमणूक करण्यात आलेली होती. सदरच्या नेमणूकीचा कालावधी दि.३१/०५/२०१६ रोजी संपत आहे. सदरच्या कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांनी पुढील कालावधीसाठी पुर्ननेमणुक करणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे.मात्र वरील वैद्यकीय अधिकारी यांनी पुर्ननेमणुक मिळणे बाबतचा अर्ज त्यांच्या नेमणुकीचा कालावधी संपण्यापुर्वी दोन महिने अगोदर देणे आवश्यक आहे. परंतु डॉ. श्री. जाधव यांनी नेमणुक कालावधी संपल्यानंतर दिनांक ०८/०८/२०१६ रोजी पुढिल कालावधीसाठी पुर्ननेमणुक करणे बाबत कै. बा.दे. दवाखाना येथे विनंती अर्ज केलेला आहे.सध्या दवाखान्यामध्ये रुग्णांना संख्या प्रंचड वाढलेली असुन सदर रुग्णांना आरोग्य संदर्भात सेवा देणेकामी पुरेसा वैद्यकीय अधिकारी संवर्गातील स्टाफ उपलब्ध असणे आवश्यक आहे. तरी दवाखान्याचा अत्यावश्यक कामाची निकड पाहता डॉ. श्री. अमोल जाधव , वैद्यकिय अधिकारी यांना नियमाप्रमाणे तांत्रिक खंड देऊन दिनांक ०३/०६/२०१६ पासुन सहा महिन्या करिता वैद्यकिय अधिकारी , कै. बा.दे.दवाखाना यापदावर कार्योत्तर मंजुरी घेऊन पुर्ननेमणुक करणेस शिफारस आहे. " असे नमुद करुन सुचीत केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये प्र. मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवा. प्रमुख त्यांचे कडील जा.क्र. कै. बा. दे.दवा. व सुतिका गृह ६९१ दि. २१/१०/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ या पदी अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवुन दिनांक ०१/१२/२०१५ पासुन पुढिल सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस पुर्व मंजुरी मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव हा इकडील जा.क्र.आस्था.वर्क. १८२ दिनांक २४/११/२०१५ अन्वये मा. स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता.

सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ५१ दिनांक १२/०१/२०१६ अन्वये ठराव पारीत करुन कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ या पदी अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवुन दिनांक ०१/१२/२०१५ पासुन पुढिल सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मंजुरी दिलेली होती.

त्यानुसार सद्यस्थितीमध्ये प्र. मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवा. प्रमुख त्यांचे कडील जा. क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ६९१ दि. २१/१०/२०१५ अन्वयेचा प्रस्ताव व मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ५१ दिनांक १२/०१/२०१६ अन्वयेच्या पारीत ठरावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती केलेल्या संबधीतांची त्या बाबतची माहीती खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वस्पात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती दिनांक व कालावधी | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. अमोल सुरेश जाधव | स्त्रीरोग तज्ञ | २०,०००/- | ८००८ २०/०२/२०१६ | ०१/१२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | ३१/०५/२०१६ |

वरील संबधितांची जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणुक ८००८ दिनांक २०/०२/२०१६ अन्वये करारानुसार तात्पुरत्या स्वस्पात स्त्रीरोग तज्ञ यापदी अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली असुन त्यांची सदरची मुदत ही दिनांक ०१ / ०६ / २०१६ पासुन समाप्त झालेली आहे.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतीच मान्यता प्राप्त झालेली आहे.त्यामध्ये पान नं. २२ वरील विवरण पत्र क्रमांक २९ मध्ये अनु. क्र. ५ नुसार रुग्णालय व आरोग्य सेवा विभागासाठी स्त्रीरोग तज्ञ हे मंजुर पद संख्या खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेली आहे.

| अ.क्रं. | पदाचा तपशिल | पुर्वीचे मंजुर पदे | नवीन पदे | एकुण पदे | सद्यस्थितीमध्ये पदांवर कायम कार्यरत पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ५ | स्त्रीरोग तज्ञ | | १ | १ | --- |
| एकुण | | ------ | १ | १ | --- |

तसेच मा. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - ब , शनिवार , फेब्रुवारी ६, २०१६ / माघ १७ , शके १९३७ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या आवश्यक शैक्षणिक पात्रतेस मान्यता दिलेली असुन त्यामधील पान नं. ३१ वरील परिशिष्ट २ मध्ये अनु.क्रं. १०० नुसार खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता व नेमणुकीची पध्दत नमुद केलेले आहे.

| अ. क्रं. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकी करीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १०० | आरोग्य सेवा श्रेणी - १ | स्त्रीरोग तज्ञ | नामनिर्देशन १०० % | ३५ वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम. डी. (स्त्री व प्रसृतीरोग शास्त्र) किंवा एम.बी.बी.एस. , डी.जी.ओ. किंवा समकक्ष पदवी. ब) शासकीय / निमशासकीय / खाजगी रुग्णालयातील संबधित विषयातील ३ वर्षाचा अनुभव |

सदरचा आकृतीबंध हा अनु. क्रं. १ ते ७ या अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये अनु.क्रं. १ ,२ , ६ व ७ खालील प्रमाणे अटी व शर्ती नमुद केलेली आहे.

**१)** शासन निर्णय दिनाक १० ऑगस्ट २००९ मध्ये स्पष्ट केल्यानुसार , शासनाने ज्याप्रमाणे ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणी लागु केल्या आहेत. त्याप्रमाणेच महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचा-यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे आवश्यक आहे. सदर अटीची पुर्तता झाल्यानंतर , नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणारी पदे आस्थापना खर्च विहीत मर्यादेत (३५ %) असल्यास विहीत मार्गाने भरता येईल.

**२)** महानगरपालिकेच्या ज्या सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करणे शक्य व आवश्यक आहे. अशा सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करण्यात याव्यात.

**६)** अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी ही शासन निर्णय, दिनांक ०४.०५.२००६ नुसार विहित केलेल्या मर्यादेत येत नाही तोपर्यत नवीन पदे न भरण्याचे शासनाचे आदेश कायम राहतील.

**७)** नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणा-या प्रत्येक संवर्गाची शासन नियमानुसार बिंदु नामावली अद्ययावत करुन ती प्रमाणात करुन घेणे, तसेच बिंदु नामावलीनुसार येणा-या आरक्षणाप्रमाणे पदे भरणे आवश्यक राहील. बिंदु नामावली प्रमाणित केल्याशिवाय कोणत्याही संवर्गातील पदे सरळसेवा, पदोन्नती अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात येऊ नयेत.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधामधील रुग्णालय व आरोग्यसेवा

विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या स्त्रीरोग तज्ञ यापदांवर वरील नमुद केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे कार्यवाही करुन सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

सद्यस्थितीमध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ यापदांवर अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावर करारबध्द नियुक्ती वरील दर्शविलेल्या संबधितांची शैक्षणिक अर्हता ही खालील प्रमाणे असुन त्याबाबतचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.नं. | नांव | धारण केलेली शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | डॉ. अमोल सुरेश जाधव | B.A.M.S. M.S. (Gyn & Obs) |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबतः महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ तरतुद बाबतची छायंकित प्रत.)

अहमदनगर महानगरपालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थितीमध्ये सुधारीत आकृतीबंधामधील रुग्णालय व आरोग्य सेवा विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या स्त्रीरोग तज्ञ यापदांवर सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सद्यस्थितीमध्ये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्या मध्ये अत्यंत कमी प्रमाणात स्त्रीरोग तज्ञ असल्यामुळे तात्काळ नागरिकांना आरोग्यसेवा देणेमध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै. बा.दे.दवा. प्रमुख यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ५२५ दिनांक २१/०९/२०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने खास बाब म्हणुन कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ या पदांवर खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ०३/०६/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करुन तद्नंतर सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीच्या अनुषंगाने मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत निर्णय झाल्यास दरमहा रुपये २०,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च १,२०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. अमोल सुरेश जाधव | स्त्रीरोग तज्ञ | २०,०००/- | कै.बा.दे.दवा. |

प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै. बा.दे.दवा. प्रमुख यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ५२५ दिनांक २१/०९/२०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे

दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वस्पात स्त्रीरोग तज्ञ या पदांवर वरील संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ०३/०६/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस व तद्नंतर सदर करारबध्द मानधनावरील कालावधीतील पुर्ननियुक्तीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव हा मा. स्थायी समितीकडे पाठविणे बाबत निर्णय झाल्यास मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन मंजुरी करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमख यांचा अहवाल असे.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,प्रस्तावानुसार रिक्त पदाचे अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारीत ) २०१२ चे कलम ५३ प्रमाणे कार्य वाही करणे आवश्यक ठरते.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय कि,Through Est.

फेरसादर,

विनंती की,प्र.मुख्यवैद्यकिय अधिकारी यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.५२५ दि.२१/०९/२०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बा.दे.दवा.तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ यापदी तांत्रिक खंड देवून दि.०३/०६/२०१६पासून पुढील सहा महिन्या करीता डॉ.अमोल सुरेश जाधव यांची मानधनावार मरारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्ताव हा आस्थापना विभागा मार्फत पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आलेला आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीच्या अनुषंगाने मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे निर्णया करीता पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.आस्थापना प्रमुख यांचे फेरसादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांची स्वाक्षरी.

यावार मा.उपायुक्त यांचाी स्चाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- टेक्नीकल पद आहे, ब्लड बॅक अत्याधुनिक झाली आहे हे पद परमनंट करायला काय हरकत आहे.

मा.उपायुक्त (सा) श्री. चारठणकर :- मा.स्थायी समितीच्या आदेशानुसार आपण त्यांना कामावर घेतो. शासनाने आपल्याला खर्चाबाबत जे आदेश दिले आहेत. ७२ टक्के आस्थापना वर खर्च होतो. सुधारीत प्रस्ताव करून दिला जर तो मा. महासभेत मंजूरी घेवून मा. शासनाकडे पाठवू जे कर्मचारी लागतात त्या अनुषंगाने आकृतीबंधानुसार काही बदल करून घ्यायचे आहे. नवीन पद निर्माण करण्याची गरज आहे. पुढच्या महासभेच्या आम्ही तो प्रस्ताव देवू.

सहाय्यक आयुक्त श्री. दराडे :- सुधारीत प्रस्तावाचा चार्ट बनवला आहे. आयुक्त साहेबांकडे पाठवणार आहे.

मा.सभापती साहेब :- मंगळवार व बुधवार पर्यत होईल का ?

मा.श्री. दिलीप सातपुते :- जे लोक आपल्याकडून निघुन गेले त्यांचे जागेवर कोण काम करणार.

बा.दे.दवा.डॉ. शिल्पा पाठक :- मानधनावरील जे कर्मचारी सध्या कार्यरत आहे त्यांची मुदत ३० डिसेंबरला संपत आहे त्यासाठी आम्ही प्रस्ताव दिला आहे.

आस्थापना प्रमुख श्री. सोनवणे :- एक प्रस्ताव आला आहे.

मा.श्री. दिलीप सातपुते :- डॉ. वृषाली पाटील सोडून गेल्या त्याच काय ?

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- डॉ.वृषाली पाटील रजेवर आहे.

वैद्यकिय अधिकारी डॉ.श्रीमती शिल्पा पाठक :- सर आम्ही कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर कर्मचा-याच्या बाबतीत बोलतो.

मा.श्री.गणेश भोसले :- बा.दे.दवाखण्यात कर्मचारी उपलब्ध होणेबाबतचे मागणीपत्र नाही तर जाहिरात कोठुन काढतील.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- बी.डी.सी.डी.मध्ये दोन डॉक्टर लॉग लीव्ह वर आहे.डॉ.राजुरकर कायम स्वरूपी आहे.डॉ.वृशाली पाटील सध्या रजेवर आहेत.त्यांच्या रजेच्या मुदतीत आपण त्यांच्या जागेवर आपण दुसरे डॉक्टर घ्या.तक्रार मेट्रन शिंदे यांची आहे.मेट्रन शिंदे यांच्याकडे अतिरिक्त कार्याभार आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- त्या जर हिटलर सारखे वागत असतील.३९ कर्मचारी लेखी सहया करून तक्रार करतात.त्यात काही तत्थ असेल ना?

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- हा खुलासा मेडिकल ऑफिसर यांनी करायला पाहिजे.

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- सेवाजेष्ठतेनुसार त्यांना नियुक्ती दिली.आरोग्य विभागामार्फत प्रस्ताव आला होता.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- डॉक्टर जर सोडून जायला लागले तर काहि तरी असेल ना?

सोनवणे यांना जो चार्ज दिला त्याला शैक्षणिक अर्हत काही आहे का?

मा.उपायुक्त श्री चारठाणकर :- सोनावणे यांच्या कडे जो चार्ज दिला आहे तो शैक्षणीक अर्हतेमध्ये बसत नाही. पण त्यांना कामाच्या सोयीसाठी चार्ज दिला आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ब्लड बॅकेबाबत माहिती सांगा.

ब्लड बॅक वैद्यकिय अधिकारी :- ऑगस्ट २०१६ मध्ये मशिनरी आल्या आहेत.काही मशिनरी येणे बाकी आहे.त्याचा फॉलअप चालू आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- रक्त घटक बाबत तुम्हाला स्टाफ पुरेसा आहे का?

ब्लड बॅक वैद्यकिय अधिकारी :- टेक्नशिय ४ व वैद्यकीय आधिकारी ४ आपण ॲप्लीकेशन करून स्टाफ भरतो.

मा.उपायुक्त श्री. चारठाणकर :- आपण जो आकृतीबंध मंजूर झाला त्यामध्ये ब्लड बॅकेसाठी स्टाफ शासनाकडून मंजूर करून घ्यावा लागणार आहे.त्या मशीन हया भारी आहेत.सध्या जेमतेम मार्गाने भरणे आवश्यक आहे. डेग्यच्या वेळेला प्लेटलेट बाबत आपण पाहिल तर आपल्याला नागरीकांना प्लेटलेट कमी दराने देता येईल.

मा.सौ.सुनिता फुलसौदर :- सर्वानुमते ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- सर्वानुमतेऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ.सुनिता फुलसौंदर सही/-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक-९१ शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी, परिचारीका, लॅब टेक्नीशियन यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

**संदर्भ : -**आरोग्य विभागाकडील जा.क्र. आरोग्य विभाग ७९४ दिनांक ०५/१०/२०१६ अन्वयेचा प्रस्ताव.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, आरोग्य विभाग यांनी त्यांचे कडील जा.क्र. आरोग्य विभाग ७९४ दिनांक ०५/१०/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बा.दे.दवाखाना व रक्तपेढी विभागा करिता तात्पुरत्या स्वरुपात तांत्रिक कर्मचारी यांना अटी व शर्तीवर मानधनावर करारबध्द नियुक्तीवरील मुदत संपत असल्याने पुर्ननेमणुकी देणे बाबत मुख्य वैद्यकिय अधिकारी, कै.बा.दे.दवाखाना यांचेमार्फत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार पुढिल मुदतवाढ मिळणेसाठी करार तत्वावरील कर्मचा-यांची करार मुदतीची माहिती पुढिल प्रमाणे आहे.

| अ.क्रं. | कर्मचा-याचे नांव | पदनाम | करार नियुक्ती समाप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १ | डॉ.सौ.ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) | वैद्यकिय अधिकारी | दि.०४/०४/२०१६तदि.०३/१०/२०१६ |
| २ | मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) | परिचारीका | दि.२८/०४/२०१६ते दि. ७/१०/२०१६ |
| ३ | अपर्णा विलास चाबुकस्वार | परिचारीका | दि.२८/०४/२०१६ते दि.७/१०/२०१६ |
| ४ | सुप्रिया अर्जुन टेमकर | परिचारीका | दि.२८/०४/२०१६तेदि. ७/१०/२०१६ |
| ५ | स्वप्नाली प्रताप इंगावले | परिचारीका | दि.२८/०४/२०१६तेदि.२७/१०/२०१६ |
| ६ | अर्चना संदिप क्षत्रिय | परिचारीका | दि.२८/०४/२०१ते दि. २७/१०/२०१६ |
| ७ | शेख नईम युसुफ | लॅब टेक्निशियन | दि.१९/०७/२०१६तेदि. १८/१०/२०१६ |
| ८ | गायकवाड शिल्पा प्रभाकर | परिचारिका | दि.१९/०७/२०१६तेदि. १८/१०/२०१६ |
| ९ | सुलभा प्रकाश पवळ | परिचारिका | दि.१९/०७/२०१६तेदि. १८/१०/२०१६ |
| १० | अनिता रमेश तोडमल | परिचारिका | दि.१९/०७/२०१६तेदि. १८/१०/२०१६ |

उपरोक्त यादी मधील कर्मचा-यांचा करार त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे समाप्त होत आहे. तरी त्यांना नेमणुकीचा कालावधी संपल्यानंतर नियमा नुसार तांत्रिक खंड देऊन त्यांना पुढिल सहा महिन्या करीता कै.बा.दे.दवाखान्यासाठी व रक्तपेढी विभागासाठी मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने पुर्ननेमणुक देणे बाबत ." नमुद करुन सुचित केलेले आहे.

सदर प्रस्तावावर मा.वैद्यकीय आरोग्यधिकारी यांनी " मा.शासनाने मंजुर केलेल्या आकृतीबंध (फेब्रुवारी २०१६) ची अंलबजावणी होण्यास अवधी लागण्याची शक्यता आहे. तसेच Outsourcing पध्दतीने नेमणुक करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.तथापि आरोग्य विभागाच्या तातडीच्या सेवेची निकड पाहता वरील कार्यवाही पुर्ण होईपर्यत प्रशासकीय कामकाजाची निकड पाहता प्रस्तावात नमुद केल्यानुसार व दि. ३/१०/२०१६ च्या मा.आयुक्त यांचे दालनात झालेल्या आढावा बैठकीतील निर्देशाप्रमाणे अनु.क्रं. १ ते १० कर्मचा-यांची मुदत संपल्यानंतर ३ दिवस नियमाप्रमाणे तांत्रिक खंड देऊन पुनर्नेमणुक पुढील ६ महिन्यासाठी करणेस हरकत नसावी. "असे नमुद करुन निर्देशित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये वरील तक्त्यामधील अनु क्रं. १ यांचे बाबत प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा. यांनी त्यांचेकडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह ११५३ दिनांक १५/०३/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " जा.क्र.आस्थापना करारबध्द ३८२६ दिनांक १४/०९/२०१५ अन्वये डॉ. सौ. ज्योती लालासाहेब शिंदे यांची वैद्यकीय अधिकारी कै. बा.दे.दवाखाना या पदावर तात्पुरत्या स्वरुपात करारबध्द पध्दतीने दिनांक ०२/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता नेमणुक करण्यात आलेली होती. सदरच्या नेमणुकीचा कालावधी दिनांक ०१/०४/२०१६ रोजी संपत आहे. सदरच्या कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांनी पुढील कालावधीसाठी पुर्ननेमणुक करणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. तरी त्यांना नियमाप्रमाणे तांत्रिक खंड देऊन दिनांक ०४/०४/२०१६ पासुन सहा महिन्या करीता वैद्यकीय अधिकारी कै. बा.दे.दवाखाना या पदावर पुर्ननेमणुक करणे शिफारस आहे. " असे नमुद करुन निर्देशित केलेले होते.

त्यानुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.सौ.ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांची त्याची सहा महिन्या करीता केलेल्या करारबध्द मानधनावरील पुर्ननेमणुकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ०४/०४/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा रु २०,०००/- या मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव हा इकडील जा.क्र.आस्था. वर्क. ०१ दिनांक ०५/०४/२०१६ रोजी मा.स्थायी समितीकडे निर्णया करिता पाठविण्यात आलेला होता.

सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ०७ दिनांक २५/०४/२०१६ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत करुन मंजुरी दिलेली होती.

"अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदी डॉ. सौ. ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर. खर्च मंजुर.नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी."

त्यानुसार सद्यस्थितीमध्ये मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांनी त्यांचे कडील जा. क्र. कै. बा.दे.दवा. व सुतीका गृह ११५३ दिनांक १५/०३/२०१६ अन्वयेचा प्रस्ताव व मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ०७ दिनांक २५/०४/२०१६ च्या पारीत मंजुर ठरावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार डॉ. सौ. ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांची तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदी अटी व शर्ती प्रमाणे जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणूक १००२ दिनांक २०/०५/२०१६ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक ०४/०४/२०१६ पासुन पुढिल सहा महिन्या करीता दरमहा रु २०,०००/- या मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली होती.

सदर वरील संबधीतांची सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या कालावधीतील मानधनावरील पुर्ननेमणुकीची मुदत ही दिनांक ०३/१०/२०१६ पासुन समाप्त झालेली आहे.

तसेच वरील तक्त्यामधील अनु.क्रं. २ ते ६ यांचे बाबत सद्यस्थितीमध्ये प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै. बा.दे.दवा. प्रमुख यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ११७६ दि. २१ /०३/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " जा.क्र. आस्थापना कंत्राटी नेमणुक ५६२९ दि. २६ /१०/२०१५ अन्वये १) सौ. मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) , २) सौ. अर्पणा विलास चाबुकस्वार ३) सौ. सुप्रिया अर्जुन टेमकर ४) सौ. स्वप्नाली प्रताप इंगावले ५) सौ. अर्चना संदिप क्षत्रिय ह्या परिचारीका या पदावर तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने दि. २६/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करिता कै. बा. दे. दवाखाना येथे हजर झालेल्या आहेत. त्यांच्या नेमणूकीचा कालावधी दि. २५/०४/२०१६ रोजी संपत आहे. त्यांचे नेमणूकीच्या कालावधीमध्ये काम समाधानकारक असुन त्यांनी पुढील कालावधीसाठी पुर्ननेमणुक मिळणे बाबत इकडील कार्यालयास विनंती अर्ज दिलेला आहे. तरी वरील परिचारीका यांना नेमणूकीचा कालावधी संपल्यानंतर तांत्रिक खंड देऊन दि. २८/०४/२०१६ पासुन सहा महिन्या करिता कै. बा. दे. दवाखान्यासाठी परिचारीका या पदावर तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने पुर्ननेमणुक करणेस शिफारस आहे." असे नमुद करुन सुचीत केलेले होते.

त्यानुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका या पदांवर अटी व शर्ती नुसार संबधीतांची तांत्रिक खंड देवुन दि. २८/०४/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे निर्णया करीता इकडील जा. क्र. आस्था. वर्क. २० दिनांक ०५/०५/२०१६ अन्वये पाठविण्यात आलेला होता. सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. स्थायी समिती ठराव क्रं. १७ दिनांक ३०/०५/२०१६ अन्वये आस्थापना विभागा संबधी खालील प्रमाणे परिच्छेद क्रं. १ मध्ये ठराव पारीत करुन मंजुरी दिलेली होती.

"अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारिका यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुर, खर्च मंजुर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी."

त्यानुसार सद्यस्थितीमध्ये मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांनी त्यांचे कडील जा. क्र. कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह ११७३ दिनांक २१/०३/२०१६ अन्वयेचा प्रस्ताव व मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १७ दिनांक ३०/०५/२०१६ च्या पारीत मंजुर ठरावाच्या अनुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार संबधितांची तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका या पदी अटी व शर्ती प्रमाणे

जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणूक २७६० दिनांक २९ / ०७ / २०१६ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक २८/०४/२०१६ पासुन पुढिल सहा महिन्या करीता नमुद दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर वरील संबधीतांची सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या कालावधीतील मानधनावरील पुर्ननेमणुकीची मुदत ही दिनांक २७/१०/२०१६ पासुन समाप्त होणार आहे.

तसेच वरील तक्त्यामधील अनु.क्रं. ७ ते १० यांचे बाबत सद्यस्थितीमध्ये रक्तपेढी विभाग यांचे कडील जा.क्र. रक्तपेढी विभाग २९ दिनांक ११/०५/२०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वस्पात परिचारिका , लॅब टेक्निशियन यापदी मानधनावर अटी व शर्ती नुसार करारबध्द पुर्ननियुक्ती करीता नव्याने वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवुन उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती होवुन कार्यवाही होणे बाबतचा प्रस्ताव दिनांक २०/०५/२०१६ अन्वये सादर करण्यात आलेला होता. तथापि सदर प्रस्तावावर मा.आयुक्त साहेब यांनी संबधितास तांत्रिक खंड देवुन तीन महिन्यांची पुर्ननेमणुक करुन व नविन प्रस्तावित पदे आऊट सोर्स पध्दतीने उपलब्ध करुन घेता येतील काय याबाबत निर्देशित केलेले होते. त्यानुसार इकडील जा.क्र.१९४६ दिनांक २७/०६/२०१६ अन्वये त्यानुषंगाने अहवाल सादर करणे बाबत मा.वैद्यकीय आरोग्याधिकारी, आरोग्य विभाग प्रमुख यांना पत्र देण्यात आलेले होते.त्यानुसार याबाबत आरोग्य विभागाकडून अद्याप पर्यत अहवाल प्राप्त झालेला नाही. सदर प्रस्तावावरील मा.आयुक्त साहेब यांचे मान्यतेने सद्यस्थितीमध्ये वरील तक्त्यामधील अनु.क्रं. ७ ते १० यांची रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वस्पात लॅब टेक्निशियन व स्टाफ नर्स यापदी जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणुक १७२१ दिनांक १८/०६/२०१६ अन्वये अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवुन दिनांक १९/०७/२०१६ पासुन पुढिल तीन महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात होणार आहे.

सदर वरील संबधीतांची तीन महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या कालावधीतील मानधनावरील करारबध्द पुर्ननेमणुकीची मुदत ही दिनांक १८/१०/२०१६ पासुन समाप्त झालेली आहे.

सद्यस्थितीमध्ये संबधितांची कै.बा.दे.दवाखाना व रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वस्पात वैद्यकिय अधिकारी , परिचारिका, लॅब टेक्निशियन यापदी या पदांवर अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेले असुन त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वस्पात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. सौ.ज्योती लालासाहेब शिंदे | वैद्यकिय अधिकारी | २०,०००/- | जा.क्र. १००२ दि.२०/०५/२०१६ | ०४/०४/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | ०३/१०/२०१६ |
| २ | मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) | परिचारीका | ६,०००/- | जा.क्र. २७६० दि.२९/०७/२०१६ | २९/०७/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | २७/१०/२०१६ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | अपर्णा विलास चाबुकस्वार | परिचारीका | ६,०००/- | जा.क्र. २७६० दि.२९/०७/२०१६ | २९/०७/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | २७/१०/२०१६ |
| ४ | सुप्रिया अर्जुन टेमकर | परिचारीका | ६,०००/- | जा.क्र. २७६० दि.२९/०७/२०१६ | २९/०७/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | २७/१०/२०१६ |
| ५ | स्वप्नाली प्रताप इंगावले | परिचारीका | ८,०००/- | जा.क्र. २७६० दि.२९/०७/२०१६ | २९/०७/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | २७/१०/२०१६ |
| ६ | अर्चना संदिप क्षत्रिय | परिचारीका | ८,०००/- | जा.क्र. २७६० दि.२९/०७/२०१६ | २९/०७/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | २७/१०/२०१६ |
| ७ | शेख नईम युसुफ | लॅब टेक्निशियन | १६,०००/- | जा.क्र. १७२१ दि.१८/०६/२०१६ | १९/०७/२०१६ तीन सहा महिन्या करीता | १८/१०/२०१६ |
| ८ | गायकवाड शिल्पा प्रभाकर | स्टाफ नर्स | ११,०००/- | जा.क्र. १७२१ दि.१८/०६/२०१६ | १९/०७/२०१६ तीन सहा महिन्या करीता | १८/१०/२०१६ |
| ९ | सुलभा प्रकाश पवळ | स्टाफ नर्स | ११,०००/- | जा.क्र. १७२१ दि.१८/०६/२०१६ | १९/०७/२०१६ तीन सहा महिन्या करीता | १८/१०/२०१६ |
| १० | अनिता रमेश तोडमल | स्टाफ नर्स | ११,०००/- | जा.क्र. १७२१ दि.१८/०६/२०१६ | १९/०७/२०१६ तीन सहा महिन्या करीता | १८/१०/२०१६ |

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतीच मान्यता प्राप्त झालेली आहे.

तसेच मा. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - ब , शनिवार , फेब्रुवारी ६, २०१६ / माघ १७ , शके १९३७ दिनांक ०६ फेब्रुवारी २०१६ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या आवश्यक शैक्षणिक पात्रतेस मान्यता दिलेली असुन सदरचा आकृतीबंध हा अनु. क्रं. १ ते ७ या अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये अनु.क्रं. १ ,२ , ६ व ७ खालील प्रमाणे अटी व शर्ती नमुद केलेली आहे.

**१)** शासन निर्णय दिनाक १० ऑगस्ट २००९ मध्ये स्पष्ट केल्यानुसार , शासनाने ज्याप्रमाणे ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणी लागु केल्या आहेत. त्याप्रमाणेच महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचा-यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे आवश्यक आहे. सदर अटीची पुर्तता झाल्यानंतर , नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणारी पदे आस्थापना खर्च विहीत मर्यादेत (३५ %) असल्यास विहीत मार्गाने भरता येईल.

**२)** महानगरपालिकेच्या ज्या सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करणे शक्य व आवश्यक आहे. अशा सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करण्यात याव्यात.

**६)** अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी ही शासन निर्णय, दिनांक ०४.०५.२००६ नुसार विहित केलेल्या मर्यादेत येत नाही तोपर्यत नवीन पदे न भरण्याचे शासनाचे आदेश कायम राहतील.

**७)** नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणा-या प्रत्येक संवर्गाची शासन नियमानुसार बिंदु नामावली अद्ययावत करुन ती प्रमाणात करुन घेणे, तसेच बिंदु नामावलीनुसार येणा-या आरक्षणाप्रमाणे पदे भरणे आवश्यक राहील. बिंदु नामावली प्रमाणित केल्याशिवाय कोणत्याही संवर्गातील पदे सरळसेवा, पदोन्नती अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात येऊ नयेत.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधामधील रुग्णालय व आरोग्यसेवा विभागा तसेच रक्तपेढी विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या यापदांवर वरील नमुद केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे कार्यवाही करुन सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबतः महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील - ५३ तरतुद बाबतची छायंकित प्रत.)

अहमदनगर महानगरपालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थितीमध्ये सुधारीत आकृतीबंधामधील मंजुर दर्शविण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकारी, परिचारीका, लॅब टेक्निशियन यापदांवर सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सद्यस्थितीमध्ये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व रक्तपेढी विभागामध्ये अत्यंत कमी प्रमाणात वैद्यकिय अधिकारी, परिचारिका व लॅब टेक्निशियन असल्यामुळे तात्काळ नागरिकांना आरोग्यसेवा देणेमध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संदर्भिय आरोग्य विभाग यांनी त्यांचे कडील जा. क्र. आरोग्य विभाग ७९४ दिनांक ०५/१०/२०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स व लॅब टेक्निशियन या पदांवर खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील कारारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन नमुद दिनांका पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये १,०३,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च ६,१८,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. सौ.ज्योती लालासाहेब शिंदे | वैद्यकिय अधिकारी | २०,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| २ | मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) | परिचारीका | ६,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ३ | अपर्णा विलास चाबुकस्वार | परिचारीका | ६,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ४ | सुप्रिया अर्जुन टेमकर | परिचारीका | ६,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ५ | स्वप्नाली प्रताप इंगावले | परिचारीका | ८,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ६ | अर्चना संदिप क्षत्रिय | परिचारीका | ८,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ७ | शेख नईम युसुफ | लॅब टेक्निशियन | १६,०००/- | रक्तपेढी विभाग |
| ८ | गायकवाड शिल्पा प्रभाकर | स्टाफ नर्स | ११,०००/- | रक्तपेढी विभाग |
| ९ | सुलभा प्रकाश पवळ | स्टाफ नर्स | ११,०००/- | रक्तपेढी विभाग |
| १० | अनिता रमेश तोडमल | स्टाफ नर्स | ११,०००/- | रक्तपेढी विभाग |

संदर्भिय आरोग्य विभाग यांचे कडील जा. क्र. आरोग्य विभाग ७९४ दिनांक ०५/१०/२०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकिय अधिकारी,स्टाफ नर्स,लॅब टेक्निशियन या पदांवर वरील संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा. स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.
यावर सहाय्यक आयुक्त यांची स्वाक्षरी.
यावर मुख्यलेखाधिकरी यांची स्वाक्षरी.
यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र म न पा अधिनियम २०१२ सुधारीत चे कलम ५३ नुसार कार्यवाही करणेस हरकत नाही.
यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.
यावर मा.आयुक्त साहेब यांची संमतीदर्शक स्वक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी, परिचारीका, लॅब टेक्नीशियन यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत विषय आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- टेक्नीकल पद आहे, ब्लड बॅक अत्याधुनिक झाली आहे हे पद परमनंट करायला काय हरकत आहे.

मा.उपायुक्त (सा) श्री. चारठणकर :- मा.स्थायी समितीच्या आदेशानुसार आपण त्यांना कामावर घेतो. शासनाने आपल्याला खर्चाबाबत जे आदेश दिले आहेत. ७२ टक्के आस्थापना वर खर्च होतो. सुधारीत प्रस्ताव करून दिला जर तो मा. महासभेत मंजूरी घेवून मा. शासनाकडे पाठवू जे कर्मचारी लागतात त्या अनुषंगाने आकृतीबंधानुसार काही बदल करून घ्यायचे आहे. नवीन पद निर्माण करण्याची गरज आहे. पुढच्या महासभेच्या आम्ही तो प्रस्ताव देवू.

सहाय्यक आयुक्त श्री. दराडे :- सुधारीत प्रस्तावाचा चार्ट बनवला आहे. आयुक्त साहेबांकडे पाठवणार आहे.

मा.सभापती साहेब :- मंगळवार व बुधवार पर्यत होईल का ?

मा.श्री. दिलीप सातपुते :- जे लोक आपल्याकडून निघुन गेले त्यांचे जागेवर कोण काम करणार.

बा.दे.दवा.डॉ. शिल्पा पाठक :- मानधनावरील जे कर्मचारी सध्या कार्यरत आहे त्यांची मुदत ३० डिसेंबरला संपत आहे त्यासाठी आम्ही प्रस्ताव दिला आहे.

आस्थापना प्रमुख श्री. सोनवणे :- एक प्रस्ताव आला आहे.

मा.श्री. दिलीप सातपुते :- डॉ. वृषाली पाटील सोडून गेल्या त्याच काय ?

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- डॉ.वृषाली पाटील रजेवर आहे.

वैद्यकिय अधिकारी डॉ.श्रीमती शिल्पा पाठक :- सर आम्ही कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर कर्मचा-याच्या बाबतीत बोलतो.

मा.श्री.गणेश भोसले :- बा.दे.दवाखण्यात कर्मचारी उपलब्ध होणेबाबतचे मागणीपत्र नाही तर जाहिरात कोठुन काढतील.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- बी.डी.सी.डी.मध्ये दोन डॉक्टर लॉग लीव्ह वर आहे.डॉ.राजुरकर कायम स्वरूपी आहे.डॉ.वृशाली पाटील सध्या रजेवर आहेत.त्यांच्या रजेच्या मुदतीत आपण त्यांच्या जागेवर आपण दुसरे डॉक्टर घ्या.तक्रार मेट्रन शिंदे यांची आहे.मेट्रन शिंदे यांच्याकडे अतिरिक्त कार्याभार आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- त्या जर हिटलर सारखे वागत असतील.३९ कर्मचारी लेखी सहया करून तक्रार करतात.त्यात काही तत्थ असेल ना?

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- हा खुलासा मेडिकल ऑफिसर यांनी करायला पाहिजे.

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- सेवाजेष्ठतेनुसार त्यांना नियुक्ती दिली.आरोग्य विभागामार्फत प्रस्ताव आला होता.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- डॉक्टर जर सोडून जायला लागले तर काहि तरी असेल ना?

सोनवणे यांना जो चार्ज दिला त्याला शैक्षणिक अर्हत काही आहे का?

मा.उपायुक्त श्री चारठाणकर :- सोनावणे यांच्या कडे जो चार्ज दिला आहे तो शैक्षणीक अर्हतेमध्ये बसत नाही. पण त्यांना कामाच्या सोयीसाठी चार्ज दिला आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ब्लड बॅकेबाबत माहिती सांगा.

ब्लड बॅंक वैद्यकिय अधिकारी :- ऑगस्ट २०१६ मध्ये मशिनरी आल्या आहेत.काही मशिनरी येणे बाकी आहे.त्याचा फॉलअप चालू आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- रक्त घटक बाबत तुम्हाला स्टाफ पुरेसा आहे का?

ब्लड बॅंक वैद्यकिय अधिकारी :- टेक्नशिय ४ व वैद्यकीय आधिकारी ४ आपण ॲप्लीकेशन करून स्टाफ भरतो.

मा.उपायुक्त श्री. चारठाणकर :- आपण जो आकृतीबंध मंजूर झाला त्यामध्ये ब्लड बॅकेसाठी स्टाफ शासनाकडून मंजूर करून घ्यावा लागणार आहे.त्या मशीन हया भारी आहेत.सध्या जेमतेम मार्गाने भरणे आवश्यक आहे. डेग्यच्या वेळेला प्लेटलेट बाबत आपण पाहिल तर आपल्याला नागरीकांना प्लेटलेट कमी दराने देता येईल.

मा.सौ.सुनिता फुलसौदर :- सर्वानुमते ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- सर्वानुमतेऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी, परिचारीका, लॅब टेक्नीशियन यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ.सुनिता फुलसौदर सही/-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक-९२ शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदावंर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

**संदर्भ :-** मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतिका गृह ५८५ दिनांक १८/१०/२०१६ अन्वयेचा अहवाल

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतिका गृह ५८५ दिनांक १८/१०/२०१६ अन्वये अहवाल सादर करुन त्यामध्ये " जा.क्र.आस्थापना करारबध्द नेमणुक ३२७ दिनांक २१/०४/२०१६ अन्वये डॉ.सौ.नंदा प्रशांत वाघ (राऊत) यांची वैद्यकीय अधिकारी कै.बा.दे.दवाखाना या पदावर तात्पुरत्या स्वरुपात करारबध्द पध्दतीने दिनांक २१/०४/२०१६ पासुन सहा महिन्यांकरीता नेमणुक करण्यात आलेली होती.सदरच्या नेमणुकीचा कालावधी दिनांक २०/१०/२०१६ रोजी संपत आहे.सदरच्या कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक आहे.त्यांनी पुढील कालावधीसाठी पुनर्नेमणुक करणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. तरी त्यांना नियमाप्रमाणे तांत्रिक खंड देऊन दिनांक २४/१०/२०१६ पासुन सहा महिन्याकरीता वैद्यकिय अधिकारी कै.बा.दे.दवाखाना यापदावर करारबध्द पध्दतीने पुनर्नेमणुक करणेस शिफारस आहे." असे नमुद करुन सुचित केलेले आहे.

कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता दिनांक ०७/०२/२०१६ रोजीच्या सामना या वर्तमान पत्रामध्ये थेट पध्दतीने **(Walk In Interview)** नुसार उमेदवारांच्या मुलाखती बाबत जाहिराती प्रसिध्दीस देऊन दिनांक २० / ०२ / २०१६ रोजी मुलाखती आयोजीत करण्यात आलेल्या होत्या.

सदर प्रसिध्द जाहीरातीच्या अनुषंगाने दिनांक २० / ०२ / २०१६ रोजी मा. अतिरिक्त आयुक्त तथा अध्यक्ष , निवड समिती , अहमदनगर महानगरपालिका यांच्या अध्यक्षते खाली मा. निवड समिती यांनी उपस्थित उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेऊन त्यामध्ये १) डॉ.प्रतिभा दिलिप पाटील २) डॉ.नंदा प्रशांत वाघ ( राऊत ) यांना पात्र ठरवुन निवड केलेली होती.

त्यानुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली होती. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.प्रतिभा दिलिप पाटील | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | जा.क्र. ३२७ दि.२१/०४/२०१६ | २१/०४/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | २०/१०/२०१६ |
| २ | डॉ.नंदा प्रशांत वाघ (राऊत) | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | जा.क्र. ३२७ दि.२१/०४/२०१६ | २१/०४/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | २०/१०/२०१६ |

वरील अनु. क्रं. १ डॉ. प्रतिभा दिलिप पाटील ह्या पुढिल सहा महिन्या करिता इच्छुक असल्याचे दिसुन येत नसल्याने त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढिल सहा महिन्या करिता मानधनावर करारबध्द पुर्ननेमणूकी बाबत सद्यस्थितीमध्ये विचार करणे उचित होणार नाही.

वरील अनु.क्रं. २ डॉ.नंदा प्रशांत वाघ (राऊत) यांची सदर सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या कालावधीतील मानधनावरील पुर्ननेमणुकीची मुदत ही दिनांक २१/१०/२०१६ पासुन समाप्त झालेली आहे.

मा.आयुक्त साहेब यांचेशी यापुर्वी झालेल्या चर्चे दरम्यान सद्यस्थितीमधील मानधनावरील पुर्ननियुक्ती प्रकरणी संबधितांना कार्यालयीन सुट्टी वगळून किमान ३ दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढिल पुर्ननियुक्ती बाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे अशी सुचना त्यावेळी करण्यात आलेली आहे.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतीच मान्यता प्राप्त झालेली आहे.

तसेच मा. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - ब , शनिवार , फेब्रुवारी ६, २०१६ / माघ १७ , शके १९३७ दिनांक ०६ फेब्रुवारी २०१६ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या आवश्यक शैक्षणिक पात्रतेस मान्यता दिलेली असुन सदरचा आकृतीबंध हा अनु. क्रं. १ ते ७ या अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये अनु.क्रं. १ ,२ , ६ व ७ खालील प्रमाणे अटी व शर्ती नमुद केलेली आहे.

**१)** शासन निर्णय दिनाक १० ऑगस्ट २००९ मध्ये स्पष्ट केल्यानुसार , शासनाने ज्याप्रमाणे ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणी लागु केल्या आहेत. त्याप्रमाणेच महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचा-यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे आवश्यक आहे. सदर अटीची पुर्तता झाल्यानंतर , नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणारी पदे आस्थापना खर्च विहीत मर्यादेत (३५ %) असल्यास विहीत मार्गाने भरता येईल.

**२)** महानगरपालिकेच्या ज्या सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करणे शक्य व आवश्यक आहे. अशा सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करण्यात याव्यात.

**६)** अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी ही शासन निर्णय, दिनांक ०४.०५.२००६ नुसार विहित केलेल्या मर्यादेत येत नाही तोपर्यत नवीन पदे न भरण्याचे शासनाचे आदेश कायम राहतील.

**७)** नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणा-या प्रत्येक संवर्गाची शासन नियमानुसार बिंदु नामावली अद्ययावत करुन ती प्रमाणात करुन घेणे, तसेच बिंदु नामावलीनुसार येणा-या आरक्षणाप्रमाणे पदे भरणे आवश्यक राहील. बिंदु नामावली प्रमाणित केल्याशिवाय कोणत्याही संवर्गातील पदे सरळसेवा, पदोन्नती अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात येऊ नयेत.

मा. महाराष्ट्र शासन ,नगर विकास विभाग ,शासन निर्णय ,क्रमांक -अमपा -२०१२/प्र.क्र. ३०१(भाग-२/नवि २५,मंत्रालय ,मुंबई-३२ दि.०६ फेब्रु.,२०१६नुसार अ.नगर म.न.पाच्याआस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधामधील रुग्णालय व आरोग्यसेवा विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकारी यापदांवर वरील नमुद केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे कार्यवाही करुन सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबतः महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ तरतुद बाबतची छायंकित प्रत.)

अहमदनगर महानगरपालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थितीमध्ये सुधारीत आकृतीबंधामधील मंजुर दर्शविण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकारी यापदांवर सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सद्यस्थितीमध्ये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्यांमध्ये अत्यंत कमी प्रमाणात वैद्यकिय अधिकारी असल्यामुळे तात्काळ नागरिकांना आरोग्यसेवा देणेमध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संदर्भिय मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतिका गृह ५८५ दिनांक १८/१०/२०१६ अन्वयेचा अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना पाच दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक २६ / १० / २०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये २०,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च १,२०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ.नंदा प्रशांत वाघ (राऊत) | वैद्यकिय अधिकारी | २०,०००/- | कै.बा.दे.दवा. |

संदर्भिय मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवा. यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतिका गृह ५८५ दिनांक १८/१०/२०१६ अन्वयेचा अहवालाच्या अनुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकिय अधिकारी यापदी वरील संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना पाच दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक २६ / १० / २०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा. स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अभिप्राय असे.

यावर सहाय्यक आयुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,महाराष्ट्र मनपा अधिनियम २०१२ ची सुधारीत कलम ५३ नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदावंर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- टेक्नीकल पद आहे ना ? ब्लड बॅक अत्याधुनिक झाली आहे हे पद परमनंट करायला काय हरकत आहे.

मा.उपायुक्त (सा) श्री. चारठणकर :- मा.स्थायी समितीच्या आदेशानुसार आपण त्यांना कामावर घेतो. शासनाने आपल्याला खर्चाबाबत जे आदेश दिले आहेत. ७२ टक्के आस्थापना वर खर्च होतो. सुधारीत प्रस्ताव करून दिला जर तो मा. महासभेत मंजूरी घेवून मा. शासनाकडे पाठवू जे कर्मचारी लागतात त्या अनुषंगाने आकृतीबंधानुसार काही बदल करून घ्यायचे आहे. नवीन पद निर्माण करण्याची गरज आहे. पुढच्या महासभेच्या आम्ही तो प्रस्ताव देवू.

सहाय्यक आयुक्त श्री. दराडे :- चार्ट बनवला आहे. आयुक्त साहेबांकडे पाठवणार आहे.

मा.सभापती साहेब :- मंगळवार व बुधवार पर्यत होईल का ?

मा.श्री. दिलीप सातपुते :- जे लोक आपल्याकडून निघुन गेले त्यांचे जागेवर जाहिरात देवून पदे भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

वैद्यकिय अधिकारी डॉ.श्रीमती शिल्पा पाठक :- जे लोक सध्या कार्यरत आहे त्यांची मुदत ३० डिसेंबरला संपत आहे त्यासाठी आम्ही प्रस्ताव दिला आहे.

आस्थापना प्रमुख श्री. सोनवणे :- एक प्रस्ताव आला आहे.

मा.श्री. दिलीप सातपुते :- वृषाली पाटील सोडून गेल्या त्याच काय ?

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- वृषाली पाटील रजेवर आहे.

वैद्यकिय अधिकारी डॉ.श्रीमती शिल्पा पाठक :- सर आम्ही कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर लांकाबाबत बोलतो.

मा.श्री.गणेश भोसले :- मागणीपत्र नाही तर जाहिरात कोठुन काढतील.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- बी.डी.सी.डी.मध्ये दोन डॉक्टर लॉगलीव्ह वर आहे.डॉ.राजुरकर कायम स्वरूपी आहे.डॉ.वृशाली पाटील सध्या रजेवर आहेत.त्यांच्या रजेच्या मुदतीत आपण त्यांच्या जागेवर आपण दुसरे डॉक्टर घ्या.तक्रार मेट्रन शिंदे यांची आहे.मेट्रन शिंदे यांच्याकडे अतिरिक्त कार्याभार आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- त्या जर हिटलर सारखे वागत असतील.३९ कर्मचारी लेखी सहया करून तक्रार करतात.त्यात काही तत्थ असेल ना?

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- हा खुलासा मेडिकल ऑफिसरन करायला पाहिजे.

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- सेवाजेष्ठतेनुसार त्यांना नियुक्ती दिली.आरोग्य विभागामार्फत प्रस्ताव आला होता.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- डॉक्टर जर सोडून जायला लागले तर काहि तरी असेल ना?

सोनवणे यांना जो चार्ज दिला त्याला शैक्षणिक अर्हत काही आहे का?

मा.उपायुक्त श्री चारठाणकर :- सोनावणे यांच्या कडे जो चार्ज दिला आहे तो शैक्षणीक अर्हतेमध्ये बसत नाही. पण त्यांना कामाच्या सोयीसाठी चार्ज दिला आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ब्लड बॅकेबाबत माहिती सांगा.

ब्लड बॅक वैद्यकिय अधिकारी :- ऑगस्ट २०१६ मध्ये मशिनरी आल्या आहेत.काही मशिनरी येणे बाकी आहे.त्याचा फॉलअप चालू आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- रक्त घटक बाबत तुम्हाला स्टाफ पुरेसा आहे का?

ब्लड बॅक वैद्यकिय अधिकारी :- टेक्नशिय ४ व वैद्यकीय आधिकारी ४ आपण अॅप्लीकेशन करून स्टाफ भरतो.

मा.उपायुक्त श्री. चारठाणकर :- आपण जो आकृतीबंध मंजूर झाला त्यामध्ये ब्लड बॅकेसाठी स्टाफ शासनाकडून मंजूर करून घ्यावा लागणार आहे.त्या मशीन हया भारी आहेत.सध्या जेमतेम मार्गाने भरणे आवश्यक आहे. डेंग्युच्या वेळेला प्लेटलेट बाबत आपण पाहिल तर आपल्याला नागरीकांना प्लेटलेट कमी दराने देता येईल.

मा.श्री.मनोज दुलम :- सर्वानुमते ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- सर्वानुमतेऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदावंर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्टास सभा मान्यता देत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसारअहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदावंर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री.मनोज दुलम सही/-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७

विषय क्रमांक-९३ शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

**संदर्भः** -१) बांधकाम विभाग यांचे कडील जा.क्र. सार्व.बांधकाम विभाग १२८३ दिनांक १९/०९/२०१६ अन्वयेचा प्रस्ताव.२) बांधकाम विभाग यांचे कडील जा.क्र.सार्व.बांधकाम विभाग १३९३ दिनांक०६ /१०/२०१६अन्वयेचा प्रस्ताव.

विनंती की, उपरोक्त प्रकरणी मा. सहाय्यक आयुक्त साहेब यांनी श्री. सोनटक्के साहेब, अभियंता, बांधकाम विभाग यांचेशी दुरध्वनीवरुन संपर्क करुन मानधनावरील कनिष्ठ अभियंता यांची बाह्य यंत्रणेमार्फत सेवा उपलब्ध करुन घेणेस काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सद्यस्थितीमध्ये आवश्यकता असल्यास कामाची निकड व गरज पाहुन त्याबाबत सविस्तर पुनश्चः अहवाल आस्थापना विभागास सादर करणे बाबत सुचना केलेली होती.

त्यानुषंगाने बांधकाम विभाग यांनी त्यांचे कडील जा.क्र. सार्व. बांधकाम विभाग १३९३ दिनांक ०६/१०/२०१६ अन्वये पुनश्चः अहवाल सादर करुन त्यामध्ये " संदर्भिय पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागासाठी पदांचे मागणी पत्र सादर करणेचे सुचित करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे सा.बां. विभागाकडील माहिती आस्थापना विभागाकडेस दिनांक २३/९/२०१६ रोजी सादर करण्यात आलेली आहे. सार्व. बांधकाम विभागाकडेस सद्यस्थितीत दोनच कनिष्ठ अभियंता कार्यरत आहेत, व ३ कंत्राटी अभियंता कार्यरत आहेत, त्यापैकी १ कंत्राटी अभियंता प्रकल्प विभागाकडेस कार्यरत आहे. सदर कंत्राटी अभियंत्यांची मुदत २० नोव्हेंबर २०१६ अखेर संपणार आहे. राज्य शासनाचे धोरणानुसार अहमदनगर महानगरपालिकेने आवश्यक असलेल्या तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी बाह्य यंत्रणेद्वारे सेवा घेण्याचा निर्णय घेतला आहे, असे संदर्भिय पत्राद्वारे दिसुन येत आहे. त्यानुसार कार्यवाही होईपर्यत कंत्राटी अभियंते नेमणे आवश्यक आहे.अन्यथा कार्यवाहीत असलेल्या महत्वाचे योजनांच्या प्रकल्पांवर त्याचा परिणाम होईल. तरी बाह्य यंत्रणेद्वारे सेवा घेण्याच्या निर्णयाबाबत संपुर्ण कार्यवाही होई पर्यत श्री. राजु पडोळे व श्री. सचीन जाधव या दोन कंत्राटी अभियंत्यांची २ दिवसांचा तांत्रिक खंड देवुन नेमणुक करणे बाबत." नमुद करुन सुचित केलेले आहे.

सदर प्रस्तावावर प्र. शहर अभियंता यांनी " सार्व.बांधकाम विभागाकडे शासन निधी / मनपा निधी अंतर्गत अनेक विकास कामे प्रगतित व प्रस्तावित आहेत. सदर कामांवर दैनंदिन देखरेखीसाठी सध्याचे कार्यरत कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांना बाह्य यंत्रणेद्वारे नेमणुक होईपर्यत तांत्रिक खंड देवुन पुनश्च नेमणुक देणे बाबत ." नमुद करुन निर्देशित केलेले आहे.

मा.आयुक्त साहेब यांचेशी यापुर्वी झालेल्या चर्चे दरम्यान सद्यस्थितीमधील मानधनावरील पुर्ननियुक्ती प्रकरणी संबधितांना कार्यालयीन सुट्टी वगळून किमान ३ दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढिल पुर्ननियुक्ती बाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे अशी सुचना त्यावेळी करण्यात आलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थितीमध्ये सुधारीत आकृतीबंधामधील शहर अभियंता (स्थापत्य) विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सद्यस्थितीमध्ये बांधकाम विभागामध्ये अत्यंत कमी प्रमाणात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) असल्यामुळे बांधकाम विभागा मार्फत सद्यस्थितीमध्ये विविध योजने अंर्तगत राबविण्यात येत असलेल्या विकास कामामध्ये तांत्रिक अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे संदर्भिय क्रं. २ च्या बांधकाम विभाग यांचे कडील जा. क्र. बांधकाम विभाग १३९३ दिनांक ०६ / १० / २०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना चार दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक २४ / ११ / २०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे करारा नुसार रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये ४०,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च २,४०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | पडोळे राहुल शंकर | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २०,०००/- | बांधकाम विभाग |
| २ | जाधव सचिन शिवाजी | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २०,०००/- | बांधकाम विभाग |

संदर्भिय क्रं. २ च्या बांधकाम विभाग यांचे कडील जा.क्र.बांधकाम विभाग १३९३ दिनांक ०६/१०/२०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी वरील संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना चार दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक २४ / ११ / २०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा. स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अभिप्राय असे.

यावर सहाय्यक आयुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,महाराष्ट्र मनपा अधिनियम २०१२ ची सुधारीत कलम ५३ नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- डहाळे म्हणून जो वायरमन आहे. त्याची मुदत संपलेली असतांना देखील तुम्ही त्याच्या कडून काम करून घेता.

मा.उपायुक्त (सा) श्री. चारठणकर :- आस्थापना विभागाची मानधनावरील कर्मचार-यांचे ११ प्रस्ताव स्थायी समिती समोर विषय आहे. ज्यांची मुदत संपली त्यांना मुदतवाढ देण्याचे प्रस्ताव आधी घेण्याची सुचना दिली जाईल.

मा.सभापती साहेब :- अग्निशमन बाबत आउटसोर्सीग व्दारे नेमणूक करणे बाबतचा प्रस्तावावर जाहिरात देवूनही प्रतिसाद न मिळाल्याने, मानधनावर नेमणूक करण्यात यावी.

मा.श्री.गणेश भोसले :- महत्वाचा विषय आहे . बिगारी काय आग बुजवणार आहे. काम करणारे सगळे बिगारी आहे. त्यांना प्रशिक्षण नाही.

मा.उपायुक्त (सा) श्री. चारठणकर :- अग्निशमन विभागासाठी १५ फायमनची मागणी आहे. माजी सैनिक घेण्याबाबत सांगितले होत. अग्निशमन सेवेबाबत आउटसोर्सीगव्दारे लोक भरण्याचे काही प्रतिसाद न भेटल्याने आपल्याला मानधनावर लोक घ्यावे लागतील.

मा.श्री.गणेश भोसले :- माजी सैनिकांचे वय झालेले असते. चढ उतार हे त्यांना जमेल का ?

मा.उपायुक्त (सा) श्री. चारठणकर :- १५ लोकांची मागणी केली होती. त्याबाबत विचार चालू आहे.

मा.सभापती साहेब :- अग्निशमन विभागाकरीता मानधनावर तात्काळ नेमणूक करणे बाबत कार्यवाही करावी.

मा.सौ.रूपाली वारे :- विद्यमान स्थायी समिती निवडीबाबत सभेचे काम न्यायालयात अंतिम निकालावर आहे. मा. उच्च न्यायालयाचा निर्णय येउ पर्यत आपण कुठलेही निर्णय घेण्यात येउ नये.

प्र.नगरसचिव श्री. तडवी :- वारे मॅडमनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबत महानगरपालिकेला काही आदेश इकडे प्राप्त झालेले नाही. मा.उच्च न्यायालयाचे पत्र प्राप्त झाले नाही.

मा.श्री.बाळासाहेब बोराटेः-काल मी आठ सकाळी वाजेपर्यत वाडीयापार्क येथे होतो.तेथील स्टीट लाईट आठ वाजेपर्यत चालू होत्या.आपण लाईट करीता टायमल चे काम दिले आहे.रसिक कोठारी काम का करत नाही.

इले विभाग श्री.सातपुते :- आपण त्यांना नोटीस काढल्या आहेत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- नोटीस काढल्या तर त्याची ओ.सी.मला दाखवा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- माझ्या वॉर्ड मध्ये वायरमन नाही.त्या सय्यदला कारणे दाखवा नोटीस काढा ?

इले विभाग श्री.सातपुते :- अहमदनगर शहरातील इले. पोलची संख्या पहाता वायरमन कमी पडतात.या बाबातचा प्रस्ताव वेळोवेळी देवूनही कार्यवाही होत नाही त्यामुळे नगरसेवकांच्या रोषास सामोरे जावे लागते.या करीता मानधनावर वायमन घेण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- मा.उपायुक्त साहेब स्थायी समितीकडे वायरमन पदा करीता ॲप्लीकेशन आले आहे.त्या पैकी सागर केशव बनकर,वाकळे महेश राजेंद्र व इतरांचे प्राप्त झालेल्या अर्जा नुसार त्यांना मानधनावर नियुक्ती देण्यात यावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- स्थायी समिती मध्ये प्राप्त झालेल्या अर्जदारांना तात्काळ नियुक्ती देण्यात यावी.ठेकेदारांनी आपल्याला सांगायच का ? टाईमर चोरीला जाईल.कारण नसतांना हा टाईम पास चालला.टाईमर बसवा म्हणून आम्ही सांगीतल.

मा.सभापती साहेब :- ताबडतोब नियुक्ती देण्यात यावी.टायमर न बसविणा-या ठेकेदाराला नोटीस दया व टाईमर बसवायला लावा.

मा.श्री.अनिल बोरूडे :- स्ट्रीट लाईट बसवायचे कामा बाबत माहिती दया.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- निधी कधी आला.

इले. विभाग श्री.सातपुते :- निधी सन २०११-१२ मध्ये आला.

मा.श्री.अनिल बोरूडे :- फाईल आणून दाखवा.

मा.सभापती साहेब :- सन्माननीय सदस्यांचे जे म्हणणे आहे.त्याप्रमाणे कार्यवाही करा

मा.श्री.अनिल बोरूडे :- महालक्ष्मी उदयान ते खंडोबा मंदिरापर्यत आठ दिवसांपासून लाईट बंद आहे.

मा.सभापती साहेब :- गाडीचे काय झाले.

इले. विभाग श्री.सातपुते :- एक वर्षापासून माझा रिपोर्ट आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये युरो ४ गाडी लागते,तुम्ही युरो ३ च टेंडर काढता.

इले. विभाग श्री.सातपुते :- तो मुंबईचा ठेकेदार आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- निकम साहेब,विनायक नगरला पाणी नाही,ट्रॅफीकवाले तिथ काम करू देईना.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे:- नगरउत्थानमधील कामाबाबत टाईमर बाबत निर्णय दया.

इले. विभाग श्री.सातपुते :- त्याला नोटीस देवू,सात दिवसांची मुदत देवू काम झाले नाही तर डिपॉझिट जप्त करू.

मा.सभापती साहेब :- आपण जर त्याचे टेंडर रद्द केल.त्याला शेवटची नोटीस दया,त्याला बोलवून घ्या.आठ दिवसाची मुदत दया आणी आम्हाला पुढच्या मिटींगला अहवाल दया.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- लाईट बीलामध्ये फरक पडेल साहेब,टाईमर बसवायला पाहिजे,मिटींगमध्ये चर्चा झाली आहे.नंतर विसरून जावू नका. चारठाणकर साहेब तुम्ही लक्ष घालून टाईमर बसवायला सांगा.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- काही प्रभागामध्ये लाईट चालू बंद करण्यासाठी कर्मचारी नाही तुम्ही कशाची वाट बघता,ॲग्रीमेंट नुसार कार्यवाही प्रस्तावीत करा.

इले. विभाग श्री.सातपुते :- उपनगरमधील वायरमन यांना मी लाईट चालू बंद करण्याचे काम सांगतो ते करतात.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- श्री बल्लाळ यांचा काही व्हि.आर.एस.चा अर्ज आला आहे का?

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- आला आहे. दोन तीन दिवस झाले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- पोस्ट काय आहे त्यांची

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- कनिष्ठ अभियंता,सन ९५ पसून कार्यरत आहेत.

मा.सभापती साहेब :- त्या अर्जावर काय केले.

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- पे बील क्लार्क कडे अर्ज गेला.

मा.सभापती साहेब :- पाटील साहेब तुम्ही सांगा,श्री.बल्लाळ कोणत्या पोस्टवर काम करता.

नगररचनाकार श्री.पाटील :- श्री बल्लाळ,कनिष्ठ अभियंता आहेत.

मा.श्री.गणेश भोसले :- नगररचनाकडे कनिष्ठ अभियंता हे पद आस्थापना सुचीवर नाही.

मा.सभापती साहेब :- दराडे साहेब तुम्ही सांगा.

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- जोशी सहाय्यक नगररचनाकार आहे.

मा.सभापती साहेब :- पुढच्या आढावा बैठकीमध्ये त्यांचा अर्ज मंजूर करावा.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- अर्ज माझ्याकडे आला नाही.२० वर्ष सेवा झाल्यानंतर ते अर्ज करू शकतात.मा.आयुक्तांना स्वच्छा निवृत्ती देता येते.

मा.श्री.बाळासाहब बोराटे :- सहाय्यक नगररचनाकार यांना बसायला केबीन नाही.कनिष्ठ अभियंत्याला केबीन आहे.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- कनिष्ठ अभियांत्याला चार्ज देता येतो आपल्याकडे नगरपालिका असल्यापसून ते त्यापदावर काम करतात.सहाय्यक नगररचनाकार यांची पदवी बी.ई.सिव्हिल व आर्किटेक अशी आहे.श्री.बल्लाळ हे कनिष्ठ अभियंताच आहे.ब-याच वर्षापासून ते काम करतात.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- त्यांचा अर्ज मंजूर करणार का?

मा.सभापती साहेब :- त्यांचा अर्ज मंजूर करा व त्या पदाचा माणूस त्याच पदारवर नेमणूक करा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- श्री. जोशींच्या पण ब-याच तक्रारी आहेत.

मा.सभापती साहेब :- व्हि.आर.एस.च्या अर्जाबाबत विचार करा व बाकीचे पद कसे भरता येईल.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- काही पद सरळसेवाभरतीचे भरता येतील.आपल्या कडचे पात्र असतील तर त्यांना पदोन्नती देता येईल.

मा.सभापती साहेब :- नगरपालिकेच्या नियमानुसार आपले अजून काम चालू आहे.बजेट च्या कामासाठी ज्या लोकांची बदली केली ते हजर झाले नाही.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- जे कर्मचारी हजर झाले नाही त्या कर्मचा-यांना शिस्तभंग कारवाई प्रस्तावित करणे बाबत सांगीतले आहे.दोन दिवसांत त्याची पूर्तता केली जाईल. आणखी त्यांना कर्मचारी लागत असतील तर ते दिले जाईल.

मा.सभापती साहेब :- बांधकामा विभागातील मानधनावरील सर्व.अभियंते कार्यरत आहेत का? अभियंत्यांची कमतरता आल्याने कामामध्ये दिरंगाई होत आसल्याचे निदर्शनास येते.

बांधकाम विभाग श्री.सोनटक्के :- बांधकाम विभागातील मानधनावरी अभियंता श्री.सचिन शिवाजी जाधव हे सध्या आपल्या कडे कार्यरत नाहीत.त्यांचा अर्ज नसुन मिळालेल्या माहिती नुसार ते पुणे येथे स्थायीक झाल्याचे समजत

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- त्यांचे जागेवर ताबतोब अभियंता घ्या.कामे वेळेवर होत नाहीत.ज्याला गरज आहे त्यांची नियुक्ती करा.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती कडे श्री.सचिन बाबासाहेब सापते यांनी अर्ज केला असून त्यांना सचिन शिवाजी जाधव यांचे जागेवर नियुक्ती देण्यात यावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- इतगाह मैदान बाबत माहिती दया.मंदिर,मशीद,चर्च,गुरूव्दार यांना घरपट्टी नसतांना आपण घरपट्टी लावली आहे.

प्रभाग अधिकारी श्री.साबळे :- कलम १३२ नुसार सामान्य करामध्ये सूट देवू.संकलीत कर मध्ये सुट देवून बाकीचे कर आपण घेतो.

मा.सभापती साहेब :- धार्मीक स्थळांना आपण संपूर्ण कर आकारतो,सर्व प्रभाग अधिका-यांनी सर्व्हे केला.त्यांनी जर मागचे पैसे भरले असतील जर ॲक्ट मध्ये तरतुद असेल तर तुम्ही कस करता.प्रभाग अधिकारी यांनी सर्व्हे करून जे धार्मीक स्थळ रेग्यूलाईज होतील या संदर्भात चार्ट तयार करून पेपरमध्ये डिक्लेअर करा.त्यामुळे लोक येवून तुमच्या कडून माहिती घेतील.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- धार्मीक स्थळांना १३२ कलमाप्रमाणे तरतूद आहे.की संकलीत कराची आकारणी करण्यांत येवू नये.मंदिराला आकारणी केली जात नाही.पण त्यात बाकीचे जे क्षेत्र वापरात येते त्याला आकारणी लागते. सर्व्हे करून आपण निर्णय घेवू.

मा.सभापती साहेब :- इदगाह मैदाना संदर्भात निर्णय घेण्यात यावा.

प्रभाग अधिकारी श्री.साबळे :- आजपर्यतची थकबाकी ११ लाख रूपये आहे.

मा.सभापती साहेब :- १३२ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

नगररचनाकार श्री.पाटील :- आकृतीबंध मंजूर होईपर्यत दोन अथयंते मिळावेत.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- फायर फायटर विभागाकरीता आपण आउटसोर्सीग पध्दतीने जाउ शकत नाही. मानधनावर कर्मचारी घ्यावे लागतील.

मा.सभापती साहेब :- नगररचनाचा प्रस्ताव आला का? हे लोक मानधनावर घ्यावे किती दिवसांत प्रस्ताव आयुक्तांकडे पाठविता.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- मानधनावर टक्केवारी वाढते.आउटसोर्सीग ने टक्केवारी वाढत नाही.

मा.श्री.गणेश भोसले :- बांधकाम विभागाकडील अत्यावश्यक सेवेसाठी कनिष्ठ अभियंता या पदावर दोन कनिष्ठ अभियंता घेण्याचा प्रस्ताव आहे.याच प्रस्तावातील श्री.जाधव नंदकिशोर विठ्ठल यांचे नांव का आलेले नाही.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- श्री.जाधव नंदकिशोर विठ्ठल हे प्रकल्प विभागाकडे कार्यरत असून त्यांच्या पुर्ननियुक्तीचा प्रस्ताव दि.१३/१२/१६ रोजी म्हणजे कालच प्रस्ताव स्थायी समिती कडे पाठविण्यात आला आहे.प्रकल्प विभागाकडील कंत्राटी पध्दतीने घेतलेल्या अभियंत्यांमुळे दैनंदिन कामे थोडयाफार प्रमाणात सुरळीत होत आहेत.त्यांचा प्रस्ताव पाठविला असून त्यांना याच सभेमध्ये नियुक्ती देण्यात यावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- प्रकल्प विभागाची मागणी पहाता त्यांच्याकडील कार्यरत असलेले अभियंता श्री.नंदकिशोर जाधव यांच्या पुर्ननियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- विषय क्रमांक विषय क्र. ८७ ते ९७ असे ११ विषय कर्मचारी मानधनावर नियुक्तीचे असल्याने सर्व विषयांवर चर्चा झालेली असल्याने सर्व विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.मनोज दुलम :- सर्वानुमते ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. नगरसचिव कार्यलयाकडे पाठविलेल्या प्रस्तावानुसार श्री.नंदकिशोर विठ्ठल जाधव यांची करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी पुर्ननियुक्ती करण्यात यावी.अर्जदार श्री.सचिन बाबासाहेब सापते यांनी अर्ज केला असून त्यांना श्री.सचिन शिवाजी जाधव हे पुणे येथे गेल्याने त्यांचे जागेवर नियुक्ती करण्यात यावी. सागर केशव बनकर,वाकळे महेश राजेंद्र व इतरांना वायरमन यापदी अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात यावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे:- सर्वानुमते ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. नगरसचिव कार्यलयाकडे पाठविलेल्या प्रस्तावानुसार श्री.नंदकिशोर विठ्ठल जाधव यांची करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी पुर्ननियुक्ती करण्यात यावी.अर्जदार श्री.सचिन बाबासाहेब सापते यांनी अर्ज

केला असून त्यांना श्री.सचिन शिवाजी जाधव हे पुणे येथे गेल्याने त्यांचे जागेवर नियुक्ती करण्यात यावी.
सागर केशव बनकर,वाकळे महेश राजेंद्र व इतरांना वायरमन यापदी अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मान्यता देत आहे.

नगरसचिव कार्यलयाकडे पाठविलेल्या प्रस्तावानुसार श्री.नंदकिशोर विठ्ठल जाधव यांची करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात यावी.

मा.स्थायी समिती कडे श्री.सचिन बाबासाहेब सापते यांनी अर्ज केला असून त्यांना श्री.सचिन शिवाजी जाधव हे पुणे येथे गेल्याने त्यांचे जागेवर नियुक्ती करण्यात यावी.

स्थायी समिती कडे वायरमन पदा करीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार सागर केशव बनकर,वाकळे महेश राजेंद्र व इतरांना मानधनावर नियुक्ती देण्यात यावी.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार नगरसचिव कार्यलयाकडे पाठविलेल्या प्रस्तावाप्रमाणे श्री.नंदकिशोर विठ्ठल जाधव यांची करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात यावी.

मा.स्थायी समिती कडे श्री.सचिन बाबासाहेब सापते यांनी अर्ज केला असून त्यांना श्री.सचिन शिवाजी जाधव यांच्या रिक्त झालेल्या जागेवर करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात यावी.

त्याच प्रमाणे स्थायी समिती कडे वायरमन पदा करीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार सागर केशव बनकर,वाकळे महेश राजेंद्र व इतरांना वायरमन यापदी अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात यावी. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री.मनोज दुलम सही/-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक-९४ शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपलिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदांर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

**संदर्भ :-** रक्तपेढी विभागाकडील जा.क्र.रक्तपेढी विभाग १३७ दिनांक १८/१०/२०१६अन्वयेचा प्रस्ताव.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, रक्तपेढी विभाग यांनी त्यांचे कडील जा. क्र. रक्तपेढी विभाग १३७ दिनांक १८/१०/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये " रक्तपेढी विभागामध्ये खालील तक्त्यामध्ये दर्शविल्या प्रमाणे कर्मचारी तात्पुरत्या स्वरुपात रक्तपेढी विभागामध्ये मानधनावर काम करत असुन सदर मानधनावरील कर्मचा-यांचा कामाचा कालावधी दि. ६/९/२०१६ ते ५/१२/२०१६ अखेर आहे. सदर कर्मचा-यांचे काम समाधानकारक असुन रक्तपेढी विभागासाठी सदर कर्मचा-यांची पुढील सहा महिन्या करीता नेमणुक करण्यास प्रस्ताव सविनय सादर."

| अ.नं. | नाव | पद | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती मोरे पल्लवी दगडु | लॅब टेक्निशियन | ६/९/२०१६ ते ५/१२/२०१६ |

वरील प्रमाणे नमुद करुन सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये रक्तपेढी विभाग यांचे कडील जा.क्र. रक्तपेढी विभाग २९ दिनांक ११ / ०५ / २०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारिका, लॅब टेक्निशियन यापदी मानधनावर अटी व शर्ती नुसार करारबध्द पुर्ननियुक्ती करीता नव्याने वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवुन उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती होवुन कार्यवाही होणे बाबतचा प्रस्ताव आस्थापना विभागामार्फत दिनांक २०/०५/२०१६ अन्वये सादर करण्यात आलेला होता. तथापि सदर प्रस्तावावर मा.आयुक्त साहेब यांनी संबधितास तांत्रिक खंड देवुन पुढिल तीन महिन्यांची पुर्ननेमणुक करून व नविन प्रस्तावित पदे आऊट सोर्स पध्दतीने उपलब्ध करुन घेता येतील काय याबाबत निर्देशित केलेले होते.त्यानुसार इकडील जा. क्र. आस्थापना १९४६ दिनांक २७/०६/२०१६ अन्वये त्यानुषंगाने अहवाल सादर करणे बाबत मा. वैद्यकीय आरोग्याधिकारी, आरोग्य विभाग प्रमुख यांना पत्र देण्यात आलेले होते.त्यानुसार याबाबत आरोग्य विभागाकडून अद्याप पर्यत अहवाल प्राप्त झालेला नाही. सदर प्रस्तावावरील मा.आयुक्त साहेब यांचे मान्यतेने सद्यस्थितीमध्ये श्रीमती मोरे पल्लवी दगडु यांची रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदी जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणुक १७२२ दिनांक १८/०६/२०१६ अन्वये अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवुन दिनांक ०६/०९/२०१६ पासुन पुढिल तीन महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर वरील संबधीतांची तीन महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या कालावधीतील मानधनावरील करारबध्द पुर्ननेमणुकीची मुदत ही दिनांक ०५/१२/२०१६ पासुन समाप्त होणार आहे.

सद्यस्थितीमध्ये संबधितांची रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदी अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेले असुन त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती मोरे पल्लवी दगडु | लॅब टेक्निशियन | १६,०००/- | जा.क्र. १७२२ दि.१८/०६/२०१६ | ०६/०९/२०१६ पासुन तीन महिन्या करीता | ०५/१२/२०१६ |

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतीच मान्यता प्राप्त झालेली आहे.

तसेच मा. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - ब , शनिवार , फेब्रुवारी ६, २०१६ / माघ १७ , शके १९३७ दिनांक ०६ फेब्रुवारी २०१६ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या आवश्यक शैक्षणिक पात्रतेस मान्यता दिलेली असुन सदरचा आकृतीबंध हा अनु. क्रं. १ ते ७ या अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये अनु.क्रं. १ ,२ , ६ व ७ खालील प्रमाणे अटी व शर्ती नमुद केलेल्या आहेत.

**१)** शासन निर्णय दिनाक १० ऑगस्ट २००९ मध्ये स्पष्ट केल्यानुसार , शासनाने ज्याप्रमाणे ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणी लागु केल्या आहेत. त्याप्रमाणेच महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचा-यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे आवश्यक आहे. सदर अटीची पुर्तता झाल्यानंतर , नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणारी पदे आस्थापना खर्च विहीत मर्यादेत (३५ %) असल्यास विहीत मार्गाने भरता येईल.

**२)** महानगरपालिकेच्या ज्या सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करणे शक्य व आवश्यक आहे. अशा सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करण्यात याव्यात.

**६)** अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी ही शासन निर्णय, दिनांक ०४.०५.२००६ नुसार विहित केलेल्या मर्यादेत येत नाही तोपर्यत नवीन पदे न भरण्याचे शासनाचे आदेश कायम राहतील.

**७)** नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणा-या प्रत्येक संवर्गाची शासन नियमानुसार बिंदु नामावली अद्ययावत करुन ती प्रमाणात करुन घेणे, तसेच बिंदु नामावलीनुसार येणा-या आरक्षणाप्रमाणे पदे भरणे आवश्यक राहील. बिंदु नामावली प्रमाणित केल्याशिवाय कोणत्याही संवर्गातील पदे सरळसेवा, पदोन्नती अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात येऊ नयेत.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधामधील रक्तपेढी विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या यापदांवर वरील नमुद केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे कार्यवाही करुन सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबतः महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ तरतुद बाबतची छायंकित प्रत.)

मा.आयुक्त साहेब यांचेशी यापुर्वी झालेल्या चर्चे दरम्यान सद्यस्थितीमधील मानधनावरील पुर्ननियुक्ती प्रकरणी संबधितांना कार्यालयीन सुट्टी वगळून किमान ३ दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढिल पुर्ननियुक्ती बाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे अशी सुचना त्यावेळी करण्यात आलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थितीमध्ये सुधारीत आकृतीबंधामधील मंजुर दर्शविण्यात आलेल्या लॅब टेक्निशियन यापदांवर सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सद्यस्थितीमध्ये रक्तपेढी विभागामध्ये अत्यंत कमी प्रमाणात लॅब टेक्निशियन असल्यामुळे तात्काळ नागरिकांना आरोग्यसेवा देणेमध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संदर्भिय रक्तपेढी विभाग यांनी त्यांचे कडील जा. क्र. रक्तपेढी विभाग १३७ दिनांक १८/१०/२०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदांवर खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन नमुद दिनांक ०९/१२/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये १६,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च ९६,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती मोरे पल्लवी दगडु | लॅब टेक्निशियन | १६,०००/- | रक्तपेढी विभाग |

संदर्भिय रक्तपेढी विभाग यांचे कडील जा. क्र. रक्तपेढी विभाग १३७ दिनांक १८/१०/२०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदांवर वरील संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधना वरील करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक ०९/१२/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा. स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अभिप्राय असे.

यावर सहाय्यक आयुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,महाराष्ट्र मनपा अधिनियम २०१२ ची सुधारीत कलम ५३ नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपलिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदांर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत चा विषय आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- टेक्नीकल पद आहे, ब्लड बॅक अत्याधुनिक झाली आहे हे पद परमनंट करायला काय हरकत आहे.

मा.उपायुक्त (सा) श्री. चारठणकर :- मा.स्थायी समितीच्या आदेशानुसार आपण त्यांना कामावर घेतो. शासनाने आपल्याला खर्चाबाबत जे आदेश दिले आहेत. ७२ टक्के आस्थापना वर खर्च होतो. सुधारीत प्रस्ताव करून दिला जर तो मा. महासभेत मंजूरी घेवून मा. शासनाकडे पाठवू जे कर्मचारी लागतात त्या अनुषंगाने आकृतीबंधानुसार काही बदल करून घ्यायचे आहे. नवीन पद निर्माण करण्याची गरज आहे. पुढच्या महासभेच्या आम्ही तो प्रस्ताव देवू.

सहाय्यक आयुक्त श्री. दराडे :- सुधारीत प्रस्तावाचा चार्ट बनवला आहे. आयुक्त साहेबांकडे पाठवणार आहे.

मा.सभापती साहेब :- मंगळवार व बुधवार पर्यत होईल का ?

मा.श्री. दिलीप सातपुते :- जे लोक आपल्याकडून निघुन गेले त्यांचे जागेवर कोण काम करणार.

बा.दे.दवा.डॉ. शिल्पा पाठक :- मानधनावरील जे कर्मचारी सध्या कार्यरत आहे त्यांची मुदत ३० डिसेंबरला संपत आहे त्यासाठी आम्ही प्रस्ताव दिला आहे.

आस्थापना प्रमुख श्री. सोनवणे :- एक प्रस्ताव आला आहे.

मा.श्री. दिलीप सातपुते :- डॉ. वृषाली पाटील सोडून गेल्या त्याच काय ?

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- डॉ.वृषाली पाटील रजेवर आहे.

वैद्यकिय अधिकारी डॉ.श्रीमती शिल्पा पाठक :- सर आम्ही कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर कर्मचा-याच्या बाबतीत बोलतो.

मा.श्री.गणेश भोसले :- बा.दे.दवाखण्यात कर्मचारी उपलब्ध होणेबाबतचे मागणीपत्र नाही तर जाहिरात कोठुन काढतील.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- बी.डी.सी.डी.मध्ये दोन डॉक्टर लॉग लीव्ह वर आहे.डॉ.राजुरकर कायम स्वरूपी आहे.डॉ.वृशाली पाटील सध्या रजेवर आहेत.त्यांच्या रजेच्या मुदतीत आपण त्यांच्या जागेवर आपण दुसरे डॉक्टर घ्या.तक्रार मेट्रन शिंदे यांची आहे.मेट्रन शिंदे यांच्याकडे अतिरिक्त कार्याभार आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- त्या जर हिटलर सारखे वागत असतील.३९ कर्मचारी लेखी सहया करून तक्रार करतात.त्यात काही तथ्य असेल ना?

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- हा खुलासा मेडिकल ऑफिसर यांनी करायला पाहिजे.

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- सेवाजेष्ठतेनुसार त्यांना नियुक्ती दिली.आरोग्य विभागामार्फत प्रस्ताव आला होता.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- डॉक्टर जर सोडून जायला लागले तर काहि तरी असेल ना?सोनवणे यांना जो चार्ज दिला त्याला शैक्षणिक अर्हता काही आहे का?

मा.उपायुक्त श्री चारठाणकर :- सोनावणे यांच्या कडे जो चार्ज दिला आहे तो शैक्षणीक अर्हतेमध्ये बसत नाही. पण त्यांना कामाच्या सोयीसाठी चार्ज दिला आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ब्लड बॅकेबाबत माहिती सांगा.

ब्लड बॅक वैद्यकिय अधिकारी :- ऑगस्ट २०१६ मध्ये मशिनरी आल्या आहेत.काही मशिनरी येणे बाकी आहे.त्याचा फॉलअप चालू आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- रक्त घटक बाबत तुम्हाला स्टाफ पुरेसा आहे का?

ब्लड बॅक वैद्यकिय अधिकारी :- टेक्नशिय ४ व वैद्यकीय आधिकारी ४ आपण ॲप्लीकेशन करून स्टाफ भरतो.

मा.उपायुक्त श्री. चारठाणकर :- आपण जो आकृतीबंध मंजूर झाला त्यामध्ये ब्लड बॅकेसाठी स्टाफ शासनाकडून मंजूर करून घ्यावा लागणार आहे.त्या मशीन हया भारी आहेत.सध्या जेमतेम मार्गाने भरणे आवश्यक आहे. डेग्यच्या वेळेला प्लेटलेट बाबत आपण पाहिल तर आपल्याला नागरीकांना प्लेटलेट कमी दराने देता येईल.

मा.श्री.दिलीप सातपुते :- आकृतीबंधातील मंजूर पदे भरेपर्यत सदरचा स्टाफ जाहिरात काढून मानधनावर नियुकती करण्यात यावी.

मा.सौ.सुनिता फुलसौंदर :- सर्वानुमते ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मनोज दुलम :- सर्वानुमतेऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपलिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदांर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपलिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदावर तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.खर्च मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ.सुनिता फुलसौंदर सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मनोज दुलम सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक-९५ शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिकाआस्थापना विभाग.

**संदर्भ :-** मा. मॅकेनिकल इंजि. पा.पु. विभाग यांचे कडील जा.क्र. पा. पु. विभाग ७५५ दिनांक ३०/९/ २०१६ अन्वयेचा अहवाल.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, मा. मॅकेनिकल इंजि. पा.पु. विभाग यांनी त्यांचे कडील जा.क्र. पाणी पुरवठा विभाग ७५५ दिनांक ३० / ०९ / २०१६ अन्वये अहवाल सादर करुन त्यामध्ये " अहमदनगर महानगरपालिकेमध्ये पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) पदांवर दिनांक २०/०२/२०१६ रोजी पासुन ६ महिन्या करीता निर्दशित अटी शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नेमणुका करण्यात आलेल्या आहेत. नियुक्त केलेल्या श्री. प्रज्वल अदिनाथ मिसाळ, श्री.विशाल गोरख शिंदे, सौ. स्नेहल राजेंद्र मुळे , कनिष्ठ अभियंता ( सिव्हील) या विभागाकडे हजर झाल्यानंतर नेमणुकीस असुन कार्यरत आहेत. परंतु कंत्राटी करारा नुसार नेमणुक केलेल्या कर्मचा-यांची मुदत दि.१०/१०/२०१६ रोजी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे मुदतवाढ मिळणे कामी श्री. प्रज्वल अदिनाथ मिसाळ, श्री.विशाल गोरख शिंदे, सौ. स्नेहल राजेंद्र मुळे यांनी दिनांक २६/०९/२०१६ रोजी इकडेस विनंती अर्ज दिलेला आहे. या अनुषंगाने मा.आयुक्त यांचे संदर्भिय पारीत आदेशा नुसार पाणी पुरवठा विभागा करीता मोठ्या प्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने कंत्राटी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात श्री. प्रज्वल अदिनाथ मिसाळ, श्री.विशाल गोरख शिंदे, सौ. स्नेहल राजेंद्र मुळे यांना नियमानुसार तांत्रिक खंड देवुन मुदतवाढ देणे संयुक्तीक वाटते. " असे नमुद करुन सुचित केलेले आहे.

मा. मॅकेनिकल इंजि. पा.पु. विभाग त्यांचे कडील जा.क्र. पाणी पुरवठा विभाग १५०४ दिनांक १९ / ०३ / २०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने व मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ०९ दिनांक २५/०४/२०१६ अन्वयेच्या पारीत ठरावाच्या अनुषंगाने सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदांवर अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती केलेल्या संबधीतांची त्या बाबतची माहीती खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्नेहल राजेंद्र मुळे | कनिष्ठ अभियंता ( सिव्हील) | २०,०००/- | १३६२ ०४/०६/२०१६ | ०८/०४/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | ०७/१०/२०१६ |
| २ | प्रज्वल आदिनाथ मिसाळ | कनिष्ठ अभियंता ( सिव्हील) | २०,०००/- | १३६२ ०४/०६/२०१६ | ०८/०४/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | ०७/१०/२०१६ |
| ३ | शेख नाजनीन सज्जाद | कनिष्ठ अभियंता ( सिव्हील) | २०,०००/- | १३६२ ०४/०६/२०१६ | ०८/०४/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | ०७/१०/२०१६ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | विशाल गोरख शिंदे | कनिष्ठ अभियंता ( सिव्हील) | २०,०००/- | १३६२ ०४/०६/२०१६ | ०८/०४/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | ०७/१०/२०१६ |
| ५ | अबोली दुर्योधन कासार | कनिष्ठ अभियंता ( सिव्हील) | २०,०००/- | १३६२ ०४/०६/२०१६ | ०८/०४/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | ०७/१०/२०१६ |

सदर वरील संबधीतांची सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या कालावधीतील मानधनावरील नेमणुकीची मुदत ही दिनांक ०८/०४/२०१६ पासुन समाप्त झालेली आहे.

वरील तक्त्यामधील अनु. क्रं. ५ अबोली दुर्योधन कासार यांनी दिनांक ०५/१०/२०१६ रोजी अर्ज देवुन मानधनावरील नियुक्तीची मुदत समाप्त होत असल्याने पुढिल पुर्ननेमणुक मिळणे बाबत विनंती केलेली आहे. तथापि अबोली दुर्योधन कासार यांना पुढिल मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत त्यांचा त्याप्रमाणे तसा अहवाल मा. मेकॅनिकल इंजि. पाणी पुरवठा विभाग यांनी इकडेस सादर केलेला नाही. तसेच अनु. क्रं. ३ शेख नाजनीन सज्जाद यांनी पुढिल पुर्ननेमणुक मिळणे बाबत तसा अर्ज अथवा त्यांना पुढिल मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत त्याप्रमाणे तसा अहवाल मा. मेकॅनिकल इंजि. पाणी पुरवठा विभाग यांनी इकडेस सादर केलेला नाही. त्यामुळे शेख नाजनीन सज्जाद व अबोली दुर्योधन कासार यांची सद्यस्थितीमध्ये पुढिल मानधनावर पुर्ननियुक्ती बाबत विचार करणे संयुक्तीक वाटत नाही.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतेच मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यामध्ये पान नं. १७ वरील विवरण पत्र क्रमांक २२ मध्ये अनु. क्र. ५ नुसार जल अभियंता विभागासाठी कनिष्ठ अभियंता ( सिव्हील) - ५ इतकी पद संख्या दर्शविण्यात आलेली आहे.

तसेच मा. महाराष्ट्र शासन राज पत्र असाधारण भाग चार - ब , शनिवार , फेब्रुवारी ६, २०१६ / माघ १७ , शके १९३७ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या आवश्यक शैक्षणिक पात्रतेस मान्यता दिलेली असुन त्यामधील पान नं. २० वरील परिशिष्ट २ मध्ये अनु.क्रं. ४८ मध्ये खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता व नेमणुकीची पध्दत नमुद केलेले आहे.

| अ. क्रं. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकी करीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ४८ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी -३ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | नामनिर्देशन १०० % | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदविका.<br>ब) ३ वर्षाचा संबधित कामाचा अनुभव.<br>किंवा<br>क) स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण. |

सदरचा आकृतीबंध हा अनु. क्रं. १ ते ७ या अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये अनु.क्रं. १ ,२ , ६ व ७ खालील प्रमाणे अटी व शर्ती नमुद केलेली आहे.

**१)** शासन निर्णय दिनाक १० ऑगस्ट २००९ मध्ये स्पष्ट केल्यानुसार , शासनाने ज्याप्रमाणे ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणी लागु केल्या आहेत. त्याप्रमाणेच महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचा-यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे आवश्यक आहे. सदर अटीची पुर्तता झाल्यानंतर , नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणारी पदे आस्थापना खर्च विहीत मर्यादेत (३५ %) असल्यास विहीत मार्गाने भरता येईल.

**२)** महानगरपालिकेच्या ज्या सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करणे शक्य व आवश्यक आहे. अशा सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करण्यात याव्यात.

**६)** अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी ही शासन निर्णय, दिनांक ०४.०५.२००६ नुसार विहित केलेल्या मर्यादेत येत नाही तोपर्यत नवीन पदे न भरण्याचे शासनाचे आदेश कायम राहतील.

**७)** नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणा-या प्रत्येक संवर्गाची शासन नियमानुसार बिंदु नामावली अद्ययावत करुन ती प्रमाणात करुन घेणे, तसेच बिंदु नामावलीनुसार येणा-या आरक्षणाप्रमाणे पदे भरणे आवश्यक राहील. बिंदु नामावली प्रमाणित केल्याशिवाय कोणत्याही संवर्गातील पदे सरळसेवा, पदोन्नती अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात येऊ नयेत.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधामधील जल अभियंता विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंता ( सिव्हील) यापदी सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

मा. मॅकेनिकल इंजि. पा.पु. विभाग त्यांचे कडील संदर्भिय जा.क्र. पाणी पुरवठा विभाग ७५५ दिनांक ३० / ०९ / २०१६ अन्वयेच्या अहवालामधील पाणी पुरवठा विभागा करीता तात्पुरत्या स्वस्पात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावर करारबध्द नियुक्ती वरील दर्शविलेल्या संबधितांची शैक्षणिक अर्हता ही खालील प्रमाणे असुन त्याबाबतचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.नं. | नांव | धारण केलेली शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | स्नेहल राजेंद्र मुळे | डिप्लोमा (स्थापत्य), Auto cad. कोर्स |
| २ | प्रज्वल आदिनाथ मिसाळ | पदवी (स्थापत्य), डिप्लोमा (स्थापत्य), एम. एस. सी. आय. टी. (MS - CIT) |
| ३ | विशाल गोरख शिंदे | पदवी (स्थापत्य), डिप्लोमा (स्थापत्य), एम. एस. सी. आय. टी., (MS - CIT), Auto cad. कोर्स |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबत : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ तरतुद बाबतची छायंकित प्रत.)

अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थिती मध्ये सुधारीत आकृतीबंधामधील जल अभियंता विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सद्यस्थितीमध्ये पाणी पुरवठा विभागामध्ये अत्यंत कमी प्रमाणात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) असल्यामुळे पाणी पुरवठा विभागा मार्फत सद्यस्थितीमध्ये फेज - २ व विविध योजने अंर्तगत राबविण्यात येत असलेल्या विकास कामामध्ये तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मा. मॅकेनिकल इंजि. पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे कडील जा.क्र.पाणी पुरवठा विभाग ७५५ दिनांक ३०/०९/२०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील कारारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर कारारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये ६०,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च ३,६०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | स्नेहल राजेंद्र मुळे | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २०,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| २ | प्रज्वल आदिनाथ मिसाळ | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २०,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ३ | विशाल गोरख शिंदे | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २०,०००/- | पाणी पुरवठा विभाग |

मा. मॅकेनिकल इंजि. पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे कडील जा.क्र. पाणी पुरवठा विभाग ७५५ दिनांक ३०/०९/२०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी वरील संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील कारारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर कारारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अभिप्राय असे.

यावर सहाय्यक आयुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,महाराष्ट्र मनपा अधिनियम २०१२ ची सुधारीत कलम ५३ नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- आपला परीचय सांगा व विषयाची माहिती दया.

आस्थापना विभाग प्रमुख श्री. लहारे :- परिचय सांगितला. राहुल गिते, प्रदिप ढगे यांची मुदतवाढ देण्यास त्याला मंजुरी मिळावी.

मा.श्री. गणेश भोसले :- ज्यावेळेस मुदत संपते त्या वेळेस तुम्ही वाढवून का घेत नाही ते लोक सुटीवर गेले तर इकडे सगळा अंधार होतो.

मुख्यलेखापरिक्षक :- श्री. अनारसे :- मान्यता मिळाल्यानंतर त्यांचा राहिलेला पगार निघून जाईल.

मा.सभापती साहेब :- पाच महिन्यानंतर स्थायी समितीकडे प्रस्ताव येतो. आम्ही आधीच सांगितले एक महिना आधी प्रस्ताव देत जा. पूर्णीचे मंजूरी घ्यायला पाहिजे.

मा.श्री.गणेश भोसले :- मुदत संपलाच्या आधी १ महिना आधी स्टॅडींगकडे पाठवायला पाहिजे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- एक महिना आधीच प्रस्ताव पाठवायला पाहिजे.

मा.श्री.मनोज दुलम :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.श्री.विशाल गोरख शिंदे यांना पाणी पुरवठा विभागातुन बांधकाम विभागात पुर्ननियुक्ती देण्यात यावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. बांधकाम विभागाकडे अभियंत्याची कमतरता असल्याने , पाणी पुरवठा विभागामध्ये कार्यरत असलेले श्री.विशाल गोरख शिंदे, कनिष्ठ अभियंता (सिव्हील)यांना तांत्रिक खंड देउन पुढील सहा महिन्याकरिता पुर्ननियुक्ती देउन बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

बांधकाम विभागाकडे अभियंत्याची कमतरता असल्याने ,सध्या पाणी पुरवठा विभागामध्ये कार्यरत असलेले विशाल गोरख शिंदे, कनिष्ठ अभियंता (सिव्हील)यांना तांत्रिक खंड देउन पुढील सहा महिन्याकरिता पुर्ननियुक्ती देउन बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात यावे तसेच श्री.विशाल गोरख शिंदे यांच्या बाबत पुढील सर्व कार्यालयीन कार्यवाही (मानधन अहवाल, पुढील पुर्ननियुक्ती आदी ) बांधकाम विभागामार्फत करण्यात यावेत.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

बांधकाम विभागाकडे अभियंत्याची कमतरता असल्याने,पाणी पुरवठा विभागामध्ये कार्यरत असलेले श्री.विशाल गोरख शिंदे, कनिष्ठ अभियंता (सिव्हील)यांना तांत्रिक खंड देउन पुढील सहा महिन्याकरिता पुर्ननियुक्ती देउन बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात यावे. तसेच श्री.विशाल गोरख शिंदे यांच्या बाबत पुढील सर्व कार्यालयीन कार्यवाही (मानधन अहवाल, पुढील पुर्ननियुक्ती आदी ) बांधकाम विभागामार्फत करण्यात यावेत. ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.खर्च मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री.मनोज दुलम सही/-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक-९६ शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

**संदर्भ : -** १) इलेक्ट्रिक सुपरवायझर यांचे कडील जा.क्र. इलेक्ट्रिक विभाग ४८४ दिनांक १४ / १० / २०१६ अन्वयेचा अहवाल. २) मा.आयुक्त साहेब यांचेशी दिनांक २१/१०/२०१६ रोजी समक्ष झालेल्या चर्चामधील दिलेले निर्देश.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, इलेक्ट्रिक सुपरवाझर यांनी त्यांचे कडील जा.क्र. इलेक्ट्रिक विभाग ४८४ दिनांक १४/१०/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रिक विभागाकडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेले वरील संदर्भ क्रं.१ नुसार ७ वायरमन , संदर्भ क्रं. २ नुसार ५ वायरमन तसेच संदर्भ क्रं. ३ नुसार १ वायरमन यांना संदर्भिय कार्यालयीन आदेश सहा महिन्या करीता दिलेला होता. सदर वायरमन यांची कंत्राटी पध्दतीने केलेली मुदत दि. २०/१०/२०१६ रोजी संपुष्टात येत आहे. विद्युत विभागाने बाहेरील कॉन्ट्रॅक्टर कडुन / एजन्सी कडुन २० वायरमन व २० बिगारी कंत्राट पध्दतीने पुरविण्या बाबत ( Out Sorcing) ऑफिस रिपोर्ट आस्थापना विभागाकडे यापुर्वी दिलेला आहे. परंतु सदर कार्यवाहीस आस्थापना विभागाकडून काही अंशी कालावधी लागण्याची शक्यता आहे.विद्युत विभागाकडे तांत्रिक कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने शहरातील पथदिवे, प्रॉपर्टी,दवाखाने,ऑफिस व इतर कार्यालय,उद्यान इत्यादीचे दैनदिन देखभाल दुरुस्ती करावे लागते.अपुर्ण कर्मचारी वर्ग असल्याने हे कामे करणे साध्य होत नाही.त्यामुळे नागरीक,पदाधिकारी व अधिकारी यांच्या तक्रारी सतत येत असतात वेळीच कामे झाल्याने त्यांच्या रोषास सामोरे जावे लागते.सध्या शहरामध्ये नवरात्र उत्सव,मोहरम उत्सव व दिपावली सणाचे दिवस असल्याने पथदिवे कार्यान्वीत ठेवणे आवश्यक आहे. तरी आउट सोर्सिंग द्वारे कार्यवाही पुर्ण होईपर्यत मानधनावरील वायरमनला सहा महिन्याकरीता मुदतवाढ देणे अत्यावश्यक आहे.

| अ.नं. | कर्मचा-याचे नाव | अ.नं. | कर्मचा-याचे नाव |
|---|---|---|---|
| १ | सुभाष बापुराव सुळ,वायरमन | ८ | अंकित किशोर कासवा ,वायरमन |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब ,वायरमन | ९ | शेख अजिज सत्तार,वायरमन |
| ३ | इकबाल सुलेमान सय्यद,वायरमन | १० | जावळे अनिल श्रीरंग,वायरमन |
| ४ | देवरे गितेश आण्णासाहेब,वायरमन | ११ | शिंदे महेश अर्जुन,वायरमन |
| ५ | काटकर लंकेश तुकाराम,वायरमन | १२ | गायकवाड अरविंद शामराव ,वायरमन |
| ६ | डहाळे सौरभ भाऊसाहेब,वायरमन | | |
| ७ | महारपुडे कैलास भाउसाहेब,वायरमन | | |

तरी अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीकल विभागा कडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेल्या १२ वायरमन यांची मुदत दि.२०/१०/२०१६ व वरील संदर्भिय आदेशानुसार संपत असल्याने त्यांना ६ महिन्या करीता मुदतवाढी बाबत ." नमुद करुन सुचित केलेले होते.

सदर प्रस्तावावर मा.अतिरिक्त आयुक्त यांनी "मा.आयुक्त सो‌ यांनी सुचित केले प्रमाणे आऊट सोर्सिंगद्वारे कार्यवाही करावी व पुर्तता अहवाल सादर करावा." असे नमुद करुन निर्देशित केलेले आहे.

याबाबत सदर प्रकरणावर मा. आयुक्त साहेब यांचेशी दिनांक २१/१०/२०१६ रोजी झालेल्या समक्ष चर्चेनुसार इलेक्ट्रिक विभागाने उपरोक्त सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आऊट सोर्सिंगद्वारे बाबतची कार्यवाही ही तात्काळ करावी व तो पर्यत संबधित मानधनावरील वायरमन यांना तांत्रिक खंड देवुन तात्काळ पुढिल मानधनावर पुर्ननेमणुक करणे बाबत कार्यवाही करावी. अशी सुचना करण्यात आलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमधील सुधारीत आकृतीबंधामधील मंजुर दर्शविण्यात आलेल्या पदांवरील सद्यस्थितीमध्ये रिक्त पद संख्येच्या अनुषंगाने तांत्रिक पदावर आऊट सोर्सिंगद्वारे कार्यवाही बाबत स्वतंत्ररित्या प्रस्ताव प्रस्तावित सादर करण्यात आलेला असुन त्यानुसार सद्यस्थितीमध्ये पुढिल कार्यवाही करण्यात येत आहे.

इलेक्ट्रिक विभागा यांचे कडील जा.क्र. ६४१ दिनांक ०१/०४/२०१६ व इलेक्ट्रिक जा. क्र. २९ दिनांक २२/०४/२०१६ अन्वयेच्या पत्राच्या अहवालाच्या अनुषंगाने इलेक्ट्रिक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन या पदांवर अटी व शर्ती नुसार संबधीतांची तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे निर्णया करीता इकडील जा.क्र.आस्था. वर्क. २३ दिनांक १६/०५/२०१६ अन्वये पाठविण्यात आलेला होता.

सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. स्थायी समिती ठराव क्रं. १८ दिनांक ३०/०५/२०१६ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत करुन मंजुरी दिलेली होती.

"अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रिक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुर, खर्च मंजुर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी."

इलेक्ट्रिक विभागा यांचे कडील जा.क्र. ६४१ दिनांक ०१/०४/२०१६ व इलेक्ट्रिक विभाग जा. क्र. २९ दिनांक २२/०४/२०१६ अन्वयेचा पत्रानुसार अहवाल तसेच मा. स्थायी समिती ठराव क्रं. १८ दिनांक ३०/०५/२०१६ अन्वये ठराव पारीत करुन मंजुरी दिल्याच्या अनुषंगाने इलेक्ट्रिक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती केलेल्या संबधीतांची सद्यस्थितीमधील त्या बाबतची माहीती खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तातपुरत्या स्वस्पात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुभाष बापुराव सुळ | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. २६५५ दि.२६/०७/२०१६ | २३/०४/२०१६पासुन सहा महिन्या करीता | २२/१०/२०१६ |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. २६५५ दि.२६/०७/२०१६ | २३/०४/२०१६पासुन सहा महिन्या करीता | २२/१०/२०१६ |
| ३ | इकबाल सुलेमान सय्यद | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. २६५५ दि.२६/०७/२०१६ | २३/०४/२०१६पासुन सहा महिन्या करीता | २२/१०/२०१६ |
| ४ | देवरे गितेश आण्णासाहेब | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. २६५५ दि.२६/०७/२०१६ | २३/०४/२०१६पासुन सहा महिन्या करीता | २२/१०/२०१६ |
| ५ | काटकर लंकेश तुकाराम | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. २६५५ दि.२६/०७/२०१६ | २३/०४/२०१६पासुन सहा महिन्या करीता | २२/१०/२०१६ |
| ६ | डहाळे सौरभ भाऊसाहेब | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. २६५५ दि.२६/०७/२०१६ | २३/०४/२०१६पासुन सहा महिन्या करीता | २२/१०/२०१६ |
| ७ | महारपुडे कैलास भाऊसाहेब | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. २६५५ दि.२६/०७/२०१६ | २३/०४/२०१६पासुन सहा महिन्या करीता | २२/१०/२०१६ |
| ८ | अंकित किशोर कासवा | वायरमन | ९,५००/- | जा.क्र.२६५३ दि.२६/०७/२०१६ | २२/०४/२०१६पासुन सहा महिन्या करीता | २१/१०/२०१६ |
| ९ | शेख अजिज सत्तार | वायरमन | ९,५००/- | जा.क्र.२६५३ दि.२६/०७/२०१६ | २२/०४/२०१६पासुन सहा महिन्या करीता | २१/१०/२०१६ |
| १० | जावळे अनिल श्रीरंग | वायरमन | ९,५००/- | जा.क्र.२६५३ दि.२६/०७/२०१६ | २२/०४/२०१६पासुन सहा महिन्या करीता | २१/१०/२०१६ |
| ११ | शिंदे महेश अर्जुन | वायरमन | ९,५००/- | जा.क्र.२६५३ दि.२६/०७/२०१६ | २२/०४/२०१६पासुन सहा महिन्या करीता | २१/१०/२०१६ |
| १२ | गायकवाड अरविंद शामराव | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. २६५७ दि.२६/०७/२०१६ | ३०/०७/२०१६पासुन सहा महिन्या करीता | २९/०१/२०१७ |

वरील संबधितांची करारानुसार तात्पुरत्या स्वस्पात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द केलेल्या पुर्ननियुक्तीची मुदत ही वरील तक्त्यामधील अनु.क्रं. १ ते ७ यांची दिनांक २३ / १० / २०१६ पासुन व अनु.क्रं. ८ ते ११ यांची दिनांक २२ / १० / २०१६ पासुन तर अनु.क्रं. १२ यांची दिनांक ३० / ०१ / २०१७ पासुन समाप्त होत आहे.

वरील तक्त्यामधील अनु.क्रं. १२ यांचे पुर्ननियुक्ती कालावधी समाप्ती बाबत काही कालावधी आहे. त्यामुळे अनु.क्रं. १२ गायकवाड अरविंद शामराव यांची सद्यस्थितीमध्ये केलेल्या मानधनावरील करारबध्द

पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना पुढिल कालावधी करिता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत सद्यस्थितीमध्ये विचार करणे संयुक्तीक होणार नाही.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतीच मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यामध्ये पान नं. १९ वरील विवरण पत्र क्रमांक २४ मध्ये अनु. क्र. ५ नुसार विद्युत विभागासाठी वायरमन / तारतंत्री - ३० इतकी पद संख्या दर्शविण्यात आलेली आहे.

| अ. क्रं. | पदाचा तपशिल | पुर्वीचे मंजुर पदे | नवीन पदे | **एकुण पदे** | सद्यस्थितीमध्ये पदांवर कायम कार्यरत पद संख्या | सद्यस्थितीमध्ये मानधनावरील कार्यरत पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वायरमन / तारतंत्री | १९ | ११ | **३०** | **१६** | **१२** |

तसेच मा. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - ब , शनिवार , फेब्रुवारी ६, २०१६ / माघ १७ , शके १९३७ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या आवश्यक शैक्षणिक पात्रतेस मान्यता दिलेली असुन त्यामधील पान नं. २४ वरील परिशिष्ट २ मध्ये अनु.क्रं. ७२ मध्ये खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता व नेमणुकीची पध्दत नमुद केलेले आहे.

| अ. क्रं. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकी करीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ४८ | तांत्रिक सेवा श्रेणी - ३ | वायरमन / तारतंत्री | नामनिर्देशन ७५ % | ३३ वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परीक्षा उर्तिर्ण.<br>ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे तारतंत्री अभासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |

सदरचा आकृतीबंध हा अनु. क्रं. १ ते ७ या अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये अनु.क्रं. १ ,२ , ६ व ७ खालील प्रमाणे अटी व शर्ती नमुद केलेली आहे.

**१)** शासन निर्णय दिनाक १० ऑगस्ट २००९ मध्ये स्पष्ट केल्यानुसार, शासनाने ज्याप्रमाणे ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणी लागु केल्या आहेत. त्याप्रमाणेच महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचा-यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे आवश्यक आहे. सदर अटीची पुर्तता झाल्यानंतर ,

नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणारी पदे आस्थापना खर्च विहीत मर्यादेत (३५ %) असल्यास विहीत मार्गाने भरता येईल.

**२)** महानगरपालिकेच्या ज्या सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करणे शक्य व आवश्यक आहे. अशा सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करण्यात याव्यात.

**३)** अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी ही शासन निर्णय, दिनांक ०४.०५.२००६ नुसार विहित केलेल्या मर्यादेत येत नाही तोपर्यत नवीन पदे न भरण्याचे शासनाचे आदेश कायम राहतील.

**४)** नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणा-या प्रत्येक संवर्गाची शासन नियमानुसार बिंदु नामावली अद्ययावत करुन ती प्रमाणात करुन घेणे, तसेच बिंदु नामावलीनुसार येणा-या आरक्षणाप्रमाणे पदे भरणे आवश्यक राहील. बिंदु नामावली प्रमाणित केल्याशिवाय कोणत्याही संवर्गातील पदे सरळसेवा, पदोन्नती अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात येऊ नयेत.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधामधील विद्युत विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या वायरमन यापदांवर अटी व शर्तीच्या अनुषंगाने सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबत : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील - ५३ तरतुद बाबतची छायांकित प्रत.)

अहमदनगर महानगरपालिकेच्या विद्युत विभाग अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थितीमध्ये सुधारीत आकृतीबंधामधील विद्युत विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या वायरमन यापदांवर सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सद्यस्थितीमध्ये विद्युत विभागामध्ये अत्यंत कमी प्रमाणात वायरमन असल्यामुळे तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे इलेक्ट्रिक सुपरवायझर यांचे कडील जा.क्र. इलेक्ट्रिक विभाग ४८४ दिनांक १४/१०/२०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने विशेष बाब म्हणून इलेक्ट्रिक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन या पदांवर खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये ९,५००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करुन तद्नंतर सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीच्या अनुषंगाने मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत त्याकामी दरमहा रुपये १,०४,५००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च ६,२७,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | सुभाष बापुराव सुळ | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| ३ | इकबाल सुलेमान सय्यद | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| ४ | देवरे गितेश आण्णासाहेब | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| ५ | काटकर लंकेश तुकाराम | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| ६ | डहाळे सौरभ भाऊसाहेब | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| ७ | महारपुडे कैलास भाऊसाहेब | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| ८ | अंकित किशोर कासवा | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| ९ | शेख अजिज सत्तार | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| १० | जावळे अनिल श्रीरंग | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| ११ | शिंदे महेश अर्जुन | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |

इलेक्ट्रिक सुपरवायझर यांचे कडील जा.क्र. इलेक्ट्रिक विभाग ४८४ दिनांक १४/१०/२०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने विशेष बाब म्हणून इलेक्ट्रिक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन या पदांवर वरील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये ९,५००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करुन तद्नंतर सदरच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा. स्थायी समितीकडे पाठविणे बाबत उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन मंजुरी मिळणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अभिप्राय असे.

यावर सहाय्यक आयुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,महाराष्ट्र मनपा अधिनियम २०१२ ची सुधारीत कलम ५३ नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

म्मा.सभापती साहेब :- डहाळे म्हणून जो वायरमन आहे मंजूरी नसताना तुम्ही त्याच्या कडून काम करून घेता.

मा.उपायुक्त (सा) श्री. चारठणकर :- ११ प्रस्ताव स्थायी समिती समोर विषय आहे. मधल्या काळात आपण १ प्रयत्न केला होता. आफटसोर्सीगहारे लोक घ्यायचे ज्यांची मुदत संपली त्यांना मुदतवाढ दयायची मुदत संपण्या आधी त्यांचे प्रस्ताव आधी घेण्याची सुचना दिली जाईल.

मा.सभापती साहेब :- अग्निशमन बाबत आफटसोर्सीगहारे प्रस्ताव पाठवून का लोक घेत नाही.

मा.श्री.गणेश भोसले :- महत्वाचा विषय आहे . बिगारी काय आज बुजवणार आहे. काम करणारे सगळे बिगारी आहे. त्यांना प्रशिक्षण नाही.

मा.उपायुक्त (सा) श्री. चारठणकर :- अग्निशमन विभागासाठी १५ वायमनची मागणी आहे. माजी सैनिक घेण्याबाबत सांगितले होत. अग्निशमन सेवेबाबत आउटसोर्सीगहारे लोक भरण्याचे काही खर नाही कारण आपल्याला मानधनावर लोक घ्यावे लागतील.

मा.श्री.गणेश भोसले :- माजी सैनिकांचे वय झालेले असते. चढ उतार हे त्यांना जमेल का ?

मा.उपायुक्त (सा) श्री. चारठणकर :- १५ लोकांची मागणी केली होती. त्याबाबत विचार चालू आहे.

मा.सभापती साहेब :- ताबडतोब जागा भरावी.

मा.सौ.रूपाली वारे :- विद्यमान स्थायी समिती निवडीबाबत सभेचे काम न्यायालयात अंतिम निकालावर आहे. मा. उच्च न्यायालयाचा निर्णय येउ पर्यत आपण कुठलेही निर्णय घेण्यात येउ नये.

प्र.नगरसचिव श्री. तडवी :- वारे मॅडमनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबत महानगरपालिकेला काही आदेश इकडे प्राप्त झालेले नाही. मा.उच्च न्यायालयाचे पत्र प्राप्त झाले नाही.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- आपण नागरीकांना आनंदऋषी किंवा जनकल्याण रक्तपेढी मधून घ्यायला सांगतो.मोटार व्हेईकल बाबत स्वप्निल पवार हा १ इंजिनीयर मध्ये सगळे काम होईल का ?मानधनावर आपण ज्यांना घेतो त्यांना सेवाजेष्ठता लागू होते का? सोनवणे सांगा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- निर्णय घेवून टाका

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- काल मी आठ सकाळी वाजेपर्यत वाडीया पार्क येथे होतो.तेथील स्टीट लाईट आठ वाजेपर्यत चालू होत्या.आपण लाईट करीता टायमल चे काम दिले आहे.रसिक कोठारी काम का करत नाही.

इले विभाग श्री.सातपुते :- आपण त्यांना नोटीस काढल्या आहेत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- नोटीस काढल्या तर त्याची ओ.सी.मला दाखवा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- माझ्या वॉर्ड मध्ये वायरमन नाही.त्या सय्यदला कारणे दाखवा नोटीस काढा ?दान जणांचे ॲप्लीकेशन आले आहे.त्यांना घ्या.जुने लोक काढून टाका ते खाजगी काम करतात.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ठेकेदारांनी आपल्याला सांगायच का? टाईमर चोरीला जाईल.कारण नसतांना हा टाईम पास चालला.टाईमर बसवा म्हणून आम्ही सांगीतल.

मा.सभापती साहेब :- त्या ठेकेदाराला एक नोटीस दया व टाईमर बसवायला लावा.

मा.श्री.अनिल बोरूडे :- स्ट्रीट लाईट बसवायचे कामा बाबत माहिती दया.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- निधी कधी आला.

इले. विभाग श्री.सातपुते :- निधी सन २०११-१२ मध्ये आला.

मा.श्री.अनिल बोरूडे :- फाईल आणून दाखवा.

मा.सभापती साहेब :- सन्माननीय सदस्यांचे जे म्हणणे आहे.त्याप्रमाणे कार्यवाही करा

मा.श्री.अनिल बोरूडे :- महालक्ष्मी उदयान ते खंडोबा मंदिरापर्यत आठ दिवसांपासून लाईट बंद आहे.

मा.सभापती साहेब :- गाडीचे काय झाले.

इले. विभाग श्री.सातपुते :- एक वर्षापासून माझा रिपोर्ट आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये युरो ४ गाडी लागते,तुम्ही युरो ३ च टेंडर काढता.

इले. विभाग श्री.सातपुते :- तो मुंबईचा ठेकेदार आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- निकम साहेब,विनायक नगरला पाणी नाही,ट्रॅफीकवाले तिथ काम करू देईना.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे:- नगरउत्थानमधील कामाबाबत टाईमर बाबत निर्णय दया.

इले. विभाग श्री.सातपुते :- त्याला नोटीस देवू,सात दिवसांची मुदत देवू काम झाले नाही तर डिपॉझिट जप्त करू.

मा.सभापती साहेब :- आपण जर त्याचे टेंडर रद्द केल.त्याला शेवटची नोटीस दया,त्याला बोलवून घ्या.आठ दिवसाची मुदत दया आणी आम्हाला पुढच्या मिटींगला अहवाल दया.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- लाईट बीलामध्ये फरक पडेल साहेब,टाईमर बसवायला पाहिजे,मिटींगमध्ये चर्चा झाली आहे.नंतर विसरून जावू नका. चारठाणकर साहेब तुम्ही लक्ष घालून टाईमर बसवायला सांगा.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- काही प्रभागामध्ये लाईट चालू बंद करण्यासाठी कर्मचारी नाही तुम्ही कशाची वाट बघता,ॲग्रीमेंट नुसार कार्यवाही प्रस्तावीत करा.

इले. विभाग श्री.सातपुते :- उपनगरमधील वायरमन यांना मी लाईट चालू बंद करण्याचे काम सांगतो ते करतात.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- श्री बल्लाळ यांचा काही व्हि.आर.एस.चा अर्ज आला आहे का?

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- आला आहे. दोन तीन दिवस झाले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- पोस्ट काय आहे त्यांची

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- कनिष्ठ अभियंता,सन ९५ पसून कार्यरत आहेत.

मा.सभापती साहेब :- त्या अर्जावर काय केले.

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- पे बील क्लार्क कडे अर्ज गेला.

मा.सभापती साहेब :- पाटील साहेब तुम्ही सांगा,श्री.बल्लाळ कोणत्या पोस्टवर काम करता.

नगररचनाकार श्री.पाटील :- श्री बल्लाळ,कनिष्ठ अभियंता आहेत.

मा.श्री.गणेश भोसले :- नगररचनाकडे कनिष्ठ अभियंता हे पद आस्थापना सुचीवर नाही.

मा.सभापती साहेब :- दराडे साहेब तुम्ही सांगा.

आस्थापना विभाग श्री.सोनवणे :- जोशी सहाय्यक नगररचनाकार आहे.

मा.सभापती साहेब :- पुढच्या आढावा बैठकीमध्ये त्यांचा अर्ज मंजूर करावा.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- अर्ज माझ्याकडे आला नाही.२० वर्ष सेवा झाल्यानंतर ते अर्ज करू शकतात.मा.आयुक्तांना स्वच्छा निवृत्ती देता येते.

मा.श्री.बाळासाहब बोराटे :- सहाय्यक नगररचनाकार यांना बसायला केबीन नाही.कनिष्ठ अभियंत्याला केबीन आहे.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- कनिष्ठ अभियांत्याला चार्ज देता येतो आपल्याकडे नगरपालिका असल्यापसून ते त्यापदावर काम करतात.सहाय्यक नगररचनाकार यांची पदवी बी.ई.सिव्हिल व आर्किटेक अशी आहे.श्री.बल्लाळ हे कनिष्ठ अभियंताच आहे.ब-याच वर्षापासून ते काम करतात.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- त्यांचा अर्ज मंजूर करणार का?

मा.सभापती साहेब :- त्यांचा अर्ज मंजूर करा व त्या पदाचा माणूस त्याच पदारवर नेमणूक करा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- श्री. जोशींच्या पण ब-याच तक्रारी आहेत.

मा.सभापती साहेब :- व्हि.आर.एस.च्या अर्जाबाबत विचार करा व बाकीचे पद कसे भरता येईल.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- काही पद सरळसेवाभरतीचे भरता येतील.आपल्या कडचे पात्र असतील तर त्यांना पदोन्नती देता येईल.

मा.सभापती साहेब :- नगरपालिकेच्या नियमानुसार आपले अजून काम चालू आहे.बजेट च्या कामासाठी ज्या लोकांची बदली केली ते हजर झाले नाही.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- जे कर्मचारी हजर झाले नाही त्या कर्मचा-यांना शिस्तभंग कारवाई प्रस्तावित करणे बाबत सांगीतले आहे.दोन दिवसांत त्याची पूर्तता केली जाईल. आणखी त्यांना कर्मचारी लागत असतील तर ते दिले जाईल.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- इतगाह मैदान बाबत माहिती दया.मंदिर,मशीद,चर्च,गुरूव्दार यांना घरपट्टी नसतांना आपण घरपट्टी लावली आहे.

प्रभाग अधिकारी श्री.साबळे :- कलम १३२ नुसार सामान्य करामध्ये सूट देवू.संकलीत कर मध्ये सुट देवून बाकीचे कर आपण घेतो.

मा.सभापती साहेब :- धार्मीक स्थळांना आपण संपूर्ण कर आकारतो,सर्व प्रभाग अधिका-यांनी सर्व्हे केला.त्यांनी जर मागचे पैसे भरले असतील जर ॲक्ट मध्ये तरतुद असेल तर तुम्ही कस करता.प्रभाग अधिकारी यांनी सर्व्हे करून जे धार्मीक स्थळ रेग्यूलाईज होतील या संदर्भात चार्ट तयार करून पेपरमध्ये डिक्लेअर करा.त्यामुळे लोक येवून तुमच्या कडून माहिती घेतील.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- धार्मीक स्थळांना १३२ कलमाप्रमाणे तरतूद आहे.की संकलीत कराची आकारणी करण्यांत येवू नये.मंदिराला आकारणी केली जात नाही.पण त्यात बाकीचे जे क्षेत्र वापरात येते त्याला आकारणी लागते. सर्व्हे करून आपण निर्णय घेवू.

मा.सभापती साहेब :- इदगाह मैदाना संदर्भात निर्णय घेण्यात यावा.

प्रभाग अधिकारी श्री.साबळे :- आजपर्यतची थकबाकी ११ लाख रूपये आहे.

मा.सभापती साहेब :- १३२ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

नगररचनाकार श्री.पाटील :- आकृतीबंध मंजूर होईपर्यत दोन अथयंते मिळावेत.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- फायर फायटर विभागाकरीता आपण आउटसोर्सीग पध्दतीने जाउ शकत नाही. मानधनावर कर्मचारी घ्यावे लागतील.

मा.सभापती साहेब :- नगररचनाचा प्रस्ताव आला का? हे लोक मानधनावर घ्यावे किती दिवसांत प्रस्ताव आयुक्तांकडे पाठविता.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- मानधनावर टक्केवारी वाढते.आउटसोर्सीग ने टक्केवारी वाढत नाही.

मा.सभापती साहेब :- ज्यांनी मागणी केली तुम्ही प्रस्ताव करून पाठवा.आयुक्त व उपायुक्त निर्णय घेतील.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- विषय क्रमांक विषय क्र. ८७ ते ९७ असे ११ विषय कर्मचारी मानधनावर नियुक्तीचे असल्याने सर्व विषयांवर चर्चा झालेली असल्याने सर्व विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.मनोज दुलम :- सर्वानुमते ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- सर्वानुमतेऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द कार्योत्तर पुर्ननियुक्तीस मंजूरीस ही सभा मान्यता देत आहे.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द कार्योत्तर पुर्ननियुक्तीस करणेस ही सभा मान्यता देत आहे.खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री.मनोज दुलम सही/-

अनुमोदक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक-९७ शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** श्री.नारायण बाबुराव मिसाळ,यांची स्पर्धा परिक्षा केंद संचालक या पदावर कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावरील केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

विनंती रिपोर्ट की, प्रा. श्री.नारायण बाबुराव मिसाळ, यांची जा.क्र.आस्था./ कंत्राटी नेमणुक१४७६ दि.८/६/२०१६ अन्वये दिनांक २७/३/२०१६ पासुन सहा महिन्या करीता दर महा रु.२०,०००/- एत्रीत मुशाहि-यावर अटीस व शर्ती नुसार स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्रासाठी संचालक म्हणुन तात्पुरत्या स्वरुपात नेमणुक करण्यात येवुन सदर प्रस्ताव कार्योत्तर मंजुरी साठी मा.स्थायी समिती समोर सादर करण्यात आलेले असता मा.स्थायी समिती सभा क्र.५ ठराव क्र.६६ दि.१०/०८/२०१६ अन्वये "जा.क्र.आस्था./ कंत्राटी १४७६ दि.८/६/२०१६ अन्वये दिनांक २७/३/२०१६ पासुन सहा महिन्याकरीता अटी व शर्ती नुसार मानधनावरील केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.तसेच श्री.नारायण बाबुराव मिसाळ,स्पर्धा परिक्षाकेंद्र संचालक यांना दरमहा मानधनात रुपये २०००/- म्हणजे रुपये २००००/- ऐवजी दरमहा रुपये २२०००/- ( रुपये बावीस हजार फक्त) माणधन देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.स्पर्धा परिक्षा केंद्रात मनपा कर्मचा-याची मुला/ मुलींना प्रमुख्याने प्राधान्य देण्यात यावे.ऑफिस रिपोर्ट मंजुर खर्च मंजुर"असा ठराव पारीत झालेला आहे.

तसेच प्रा. श्री.नारायण बाबुराव मिसाळ, जा.क्र.आस्था./ कंत्राटी नेमणुक१४७६ दि.८/६/२०१६ अन्वये देण्यात आलेल्या नियुक्तीचा कालावधी हा दिनांक २६/९/२०१६ रोजी समाप्त झालेली आहे.दरम्यान प्रा.श्री.एन.बी.मिसाळ,यांचा दिनांक १/९/२०१६ रोजीचा अर्ज दिनांक १९/९/२०१६ रोजी इकडेस प्राप्त झालेला असुन सदर अर्जा मध्ये"मी गेल्या दहा वर्षापासुन आपण चालविलेले स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्राच्या प्रकल्प संचालक पदी कार्यरत आहे.उत्तम निकाल प्रशिक्षणार्थीना वर्षभर विनामुल्य प्रशिक्षण यामुळे आपले केंद्र कायम चर्चेत असते.त्यामुळे गेल्या दोन महिन्या पुर्वी आपण माझ्या मानधनातही वाढ केल्याचे वृत्तपत्रांतुनच कळाले.त्या बद्दल मी आपला आभारी आहे.माझ्या षण्मासिक नियुक्तीची मुदत या महिनाखेर म्हणाजे दिनांक २६/९/२०१६ रोजी संपत आहे.तरी मला या स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्राच्या प्रकल्प संचालक पदी पुर्ननियुक्ती मिळावी हि विनंती.तसेच नवीन इमारती अत्यावश्यक असणा-या गोष्टीची लवकरात लवकर पुर्तता करुन आपले केंद्र या नव्या इमारती स्थलांतरीत कारावे हि नम्र विनंती.असे नमुद केलेले आहे.

प्रा.श्री.नारायण बाबुराव मिसाळ, याच्या उपरोक्त अर्जा बाबत प्र.प्रसिध्दी अधिकारी यांनी"प्रा.श्री.नारायण बाबुराव मिसाळ, हे सन २००७ पासुन अहमदनगर महानगरपालिका स्पर्धा परिक्षा केंद्राचे प्रकल्प संचालक म्हनुन कार्यरत आहेत.त्यांचे काम समाधानकारक असल्यामुळे स्पर्धा परिक्षा केंद्राच्या प्रकल्प संचालक पदी नियुक्ती करण्याबाबत शिफारस आहे"असा अभिप्राय देवुन त्यांच्या नियुक्ती बाबत शिफारस केलेली आहे.

प्रा.श्री.नारायण बाबुराव मिसाळ, हे स्पर्धा परिक्षा केंद्रांच्या प्रारंभा पासुन ( २००७ पासुन) मनपा स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक म्हणुन कार्यरत आहेत. त्यांचे काम समाधानकारकअसल्यामुळे त्यांची स्पर्धा परीक्षा केंद्र संचालक म्हणुन नेमणुक करणे बाबत शिफारशी नुसार वेळोवेळी सहा सहा महिन्या करीता करारबध्द करण्यात आलेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

५३:-नेमणुकीचे अधिकार कोणामध्ये निहित असणे.

१.महानगरपालिकेच्या ज्या अधिका-यांचे किमान वेतन भत्ते वगळुन चारशे रुपये किंवा त्याहुन अधिक आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणुक करण्याचा आधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल.परंतु आयुक्ताला भत्ते वगळुन चारशे किंवा त्याहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कर्ज विषयक कामासांठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्याहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समिती पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या

विषयक महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

२.पोट कलम(१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगर पालिका अधिकारी व कर्मचारी मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधिन यथास्थिती,नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक किंवा नगर पालिका सचिव यांच्याकडे निहित असेल मात्र कोणत्याही विशिष्ठ प्रकरणात किंवा प्रकरणाच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

३.य आधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतरिक्त नगर पालिका अधिकारी व कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित असेल.परंतु कायम नेमणुकाच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल.

आणखी असे की,आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीवाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्याहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि भत्ते वगळुन शंभर रुपयाहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही. असे नमुद केलेले आहे.तसेच श्री.मिसाळ हे सेवानिवृत्त असुन त्यांचे वय ६० वर्षा पेक्षा जास्त आहे. सेवा निवृत्त कर्मचा-यांना / अधिका-यांना पुर्ननियुक्ती / सेवेत मुदत वाढ देण्या बाबत मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचे कडील क्र.आरईएम १५०९/प्र.क्र.३५/२००९/१३ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई ४०००३२ दि.१ जुन २००९ अन्वये जनहित याचिका क्र.८५/०८ सेवा निवृत्त सेवा निवृत्त शासकीय अधिका-यांना पुर्ननियुक्ती/सेवेत मुदतवाढ देण्यास मा.उच्च न्यायालयाने घातलेल्या निर्बधाची अंमलबजवणी करणे बाबत आदेश दिलेले असुन आदेशात खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

"१.कोणत्याही सेवा निवृत झालेल्या शासकीय अधिका-याला मा.उच्च न्यायालयाच्या पुर्व परवानगी शिवाय सेवेत मुदतवाढ देण्यास अथवा पुर्ननियुक्त करण्यास निर्बंध घालण्यात आले असल्याचे सर्व विभागांच्या निदर्शनास आणण्यात आले आहे.

२. या बाबत विधी व न्याय विभागाने कंत्राटी पध्दतीने निवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करण्यापुर्वी मा.उच्च न्यायालयाची पुर्व परवानगी घ्यावी असा सल्ला दिला आहे.विधी व न्याय विभागाचे सदर अभिप्राय विचारात घेता शासन सेवेत कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यास सधस्थितीत सामान्य प्रशासन विभागाची मान्यता दिली जाणार नाही याची सर्व प्रशासकीय विभागांनी नोंद घ्यावी.

सदर बाबत तत्कालीन मुख्य लेखा अधिकारी श्री.कर्डीले,यांनी दि.२२/२/१० रोजीच्या प्रस्तावा मध्ये "महाराष्ट्र शासन साप्रवि/ आरईएम/१५०९/ प्र.क्र.३५/२००९/१३ दि.१ जुन २००९ नुसार सेवा निवृत्त शासकीय कर्मचा-यास पुर्ननियुक्ती देण्यास मा.उच्च न्यायालयाने निर्बध घातले आहे.श्री.मिसाळ, हे अशासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झाल्याचे दिसुन येते त्यांना कंत्राटी पध्दतीने एक वर्षासाठी मानधनावर नेमणुक देणे योग्य"असा अभिप्राय दिलेला आहे.

तरी श्री.नारायण बाबुराव मिसाळ.स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक यांची आस्था.जा.क्र.१४७६ दि. ८/६/२०१६ अन्वये देण्यात आलेली तात्पुरती नेमणुक हि दिनांक २६/९/२०१६ रोजी समाप्त झालेली असुन उपरोक्त मा.सामन्य प्रशासन विभाग,यांचे कडील दिनांक १ जुन २००९ रोजीचे पत्रा बाबत तत्कालीन मुख्य लेखा अधिकारी, यांचा अभिप्राय व प्र.प्रसिध्दी अधिकारी,यांची श्री.मिसाळ यांना पुर्ननियुक्ती देणे बाबतची शिफारस पहाता.तसेच म.न.पा.मार्फत चालविलेले स्पर्धा परिक्षा केंद्र हा एक उत्तम प्रकारचा उपक्रम असुन सदर उपक्रामात खंड पडुन येथील विद्यार्थ्याचे नुकसान लक्ष्यात घेता श्री.नारायण बाबुराव मिसाळ यांना तांत्रिक खंड देवुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुद नुसार मनपा मार्फत संचलीत स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्रासाठी संचालक म्हणुन दिनांक ३०/९/२०१६ पासुन सहा महिन्या करीता करार पध्दतीनी तात्पुरत्या स्वरुपात मा.स्थायी समिती ठराव क्र.६६

दि.१०/८/२०१६ नुसार दर महा रु.२२,०००/- ( रुपये बावीस हजार फक्त) एकत्रीत मुशाहि-यावर नियुक्ती देणे बाबत मुख्य लेखा परिक्षक व मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय घेवुन तसे नियुक्ती आदेश निर्गमित करुन प्रस्ताव कार्योत्तर मंजुरी साठी मा.स्थायी समिती समोर सादर करणेस तसेच त्यांनी त्यांचे अर्जात नवीन इमारती बाबत व आत्यवाश्यक गोष्टी बाबत केलेला उल्लेख पहाता सदरची बाब बांधकाम विभाग स्टोअर विभागाशी निगडीत असल्याने सदर अर्जाची छायांकीत प्रत बांधकाम विभाग व स्टोअर विभागाकडे पुढील तजविजी साठी पाठविणे उचित वाटते.तथापी आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर,सहाय्यक आयुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखाअधिक्षक यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,प्रस्तावित अ नुसार महाराष्ट्र मनपा अधिनियम २०१२ चे कलम ५३ नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय कि,प्रस्तावित मान्यतेस्तव.

यावर मा.आयुक्त साहेब यांची संहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- विषय क्रमांक विषय क्र. ८७ ते ९७ असे ११ विषय कर्मचारी मानधनावर नियुक्तीचे असल्याने सर्व विषयांवर चर्चा झालेली असल्याने सर्व विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.मनोज दुलम :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.छाया तिवारी :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार श्री.नारायण बाबुराव मिसाळ,यांची स्पर्धा परिक्षा केंद संचालक या पदावर कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावरील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री.मनोज दुलम सही/-

अनुमोदक :- मा.सौ.छाया तिवारी सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक-९८ शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेषपात्र स्त्री कर्मचा-यांकरिता गणवेष खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** स्टोअर विभाग अहमदनगर महानगरपालिका

**संदर्भ -** ई-निविदा क्र.१०५०

विनंती रिपोर्ट की,अहमदनगर महानगरपालिकेस कायम गणवेषपात्र स्त्री कर्मचा-यां करिता गणवेष पुरवठयासाठी मा.महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक मातसं/नस्ती २०१०/प्र.क्र.३४/३९ सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई - ४०००३२ दि.०६ ऑगस्ट २०१० अन्वये ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करुन जाहिर टेंडर नोटीस तसेच जाहिर टेंडर नोटीस मुदतवाढ प्रथमवेळ व व्दीतीय वेळ प्रसिद्ध करुन निविदा मागविल्या असता मुदतीत -

१)शार्प सेल्स,ठाणे.
२)क्रिश एंटरप्राईजेस,मानपाडा,ठाणे.
३)आर्चिस एंटरप्राईजेस,ठाणे.

याप्रमाणे ३(तीन)निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

तीनही निविदाकार यांनी निविदेत नमुद दराचे स्त्री कर्मचारी गणवेष नमुने दाखल केलेले आहेत.सदर निविदांचे व्यापारी (दराचे)लिफाफे उघडण्यात येवून निविदा दराचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र.१ ते १२ चे दर शार्प सेल्स,ठाणे यांचे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी आहेत.

तत्कालिन अहमदनगर नगरपालिका प्रशासन व कामगार संघटना यांचे दरम्यान झालेल्या ॲवार्ड मधील मुददा क्र.९ - गणवेष व संरक्षक साधने यातील अ.क्र.१ - अन्वये स्त्री कर्मचारी गणवेष युनियनचे प्रतिनिधींशी चर्चा करुन खरेदी करावे.असे ठरले असल्याने निविदे सोबत प्राप्त स्त्री कर्मचारी गणवेष नमुने गणवेषपात्र स्त्री कर्मचारी प्रतिनिधी व युनियन प्रतिनिधी अहमदनगर महानगरपालिका यांना समक्ष दाखवून त्यांची पसंती घेणे आवश्यक आहे.

जा.नं.साप्रवि-पी.ए./४६८ दि.१३/०७/२०१५ चे कार्यालयीन आदेशान्वये प्राप्त निविदा प्रत्येक आठवडयाच्या मंगळवारी सकाळी ११.३० वाजता मा.प्रशासकिय निविदा छानणी समिती बैठकीत ठेवणेबाबत आदेशीत केलेले आहे.

मा.उपायुक्तसाहेब(कर)यांचे मंजुरी अन्वये निविदे सोबत प्राप्त स्त्री कर्मचारी गणवेष नमुने पसंती करिता गणवेषपात्र स्त्री कर्मचारी प्रतिनिधी व युनियन प्रतिनिधींसह दि.१९/०१/२०१६ रोजी सकाळी १०=३० वाजता समक्ष उपस्थित राहणेबाबत मा.अध्यक्ष,अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांना व जा.क्र.स्टोअर विभाग-२९२ दि.१६/०१/२०१६ अन्वये निविदा दर वाटाघाटी करिता शार्प सेल्स,ठाणे यांना दि.१९/०१/२०१६ रोजी सकाळी ११=३० वाजता उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आलेले होते.परंतू सदर वेळी स्त्री कर्मचारी प्रतिनिधी उपस्थित नसल्याने गणवेष पसंतीबाबत निर्णय न घेता स्त्री कर्मचारी प्रतिनिधी व युनियन प्रतिनिधींसह पुनश्च कार्यालयात येवून गणवेष पसंती केली जाईल व त्यानंतर पसंत गणवेष नमुन्याचे निविदा दर वाटाघाटी करिता निविदाकार यांना बोलविण्यात यावे असे मा.अध्यक्ष,अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी मा.उपायुक्तसाहेब(कर)यांना तोंडी सुचित केलेले होते.

त्यानुसार मा.अध्यक्ष,अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी कामगार युनियन प्रतिनिधी,महिला सफाई व चतुर्थ श्रेणी कर्मचारी प्रतिनिधी यांचे समवेत दि.२३/०२/२०१६ रोजी समक्ष स्त्री

कर्मचारी गणवेष नमुने पाहून शार्प सेल्स,ठाणे यांचे गणवेष नमुने पसंत केलेले असून त्यांचेकडुन पसंत नमुन्या प्रमाणे स्त्री कर्मचारी गणवेष खरेदीबाबत कार्यवाही करुन लवकरात लवकर गणवेष वाटप करावा असे दि.२३/०२/२०१६ चे पत्रान्वये कळविलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेषपात्र स्त्री कर्मचा-यां करिता युनियन प्रतिनिधी व संबंधित पात्र महिला सफाई व चतुर्थ श्रेणी कर्मचारी प्रतिनिधी यांनी पसंत केलेल्या गणवेष नमुन्याचे निविदा दर वाटाघाटीसाठी दि.०१/०३/२०१६ रोजी सकाळी ११=३० वाजता मा.प्रशासकिय निविदा छानणी समिती बैठकीत समक्ष उपस्थित राहणेबाबत जा.क्र.३३९ दि.२६/०२/१६ अन्वये शार्प सेल्स,ठाणे यांना कळविले असता ते समक्ष उपस्थित होते.सदरवेळी झालेल्या चर्चेत शार्प सेल्स,ठाणे यांनी निविदेतील अ.क्र.१ ते १२ करीताचे निविदा दरात १०% दर कमी करुन मालाचा पुरवठा करण्यास तयार असल्याचे मान्य करुन तसे लेखी संमतीपत्र दिलेले आहे.

कामगार युनियन प्रतिनिधी व स्त्री कर्मचारी प्रतिनिधी यांनी पसंत केलेल्या अ.क्र.१ ते १२ चे नमुन्याचे शार्प सेल्स,ठाणे यांनी निविदा दर वाटाघाटी नंतर कमी करुन दिलेले(निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम क्र.१० मध्ये नमुद) निविदा दरास व गणवेष खरेदीकामी येणा-या खर्चास मंजुरी देणेबाबत शिफारस मा.प्रशासकिय निविदा छानणी समितीमार्फत करण्याचे ठरले आहे.

जा.क्र.स्टोअर विभाग- २५० दि. १५/०१/२०१५ अन्वये गणवेषपात्र स्त्री कर्मचा-यांची गणवेष वर्णन व नावासह माहिती मागवून प्राप्त झालेल्या माहिती प्रमाणे पसंत केलेल्या गणवेष नमुन्यांच्या निगोसिएशन नंतर कमी करुन दिलेल्या दरानुसार खरेदीकामी पुढील प्रमाणे खर्च येणार आहे.

| अ. क्र | पसंत नमुन्याप्रमाणे गणवेषाचा तपशील | गणवेषपात्र स्त्री कर्मचारी संख्या x त्यांना देण्यात येणारा गणवेष = खरेदी करणे आवश्यक गणवेष संख्या | पसंत केलेल्या नमुन्याचा निगोसिएशन कमी करुन दिलेला दर रु./नग | पसंत केलेल्या नमुन्याच्या दराने येणारा एकुण खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | स्त्री सफाई कर्मचा-यांकरीता - ६ वारी रंगीत साडी,कमीत कमी ५.५ मी. लांबीची ११६ सें.मी.रुंद,किनारपट्टी असलेली प्रत्येकी ३ साडी<br>रंग - काळा,लाल व जांभळा प्रत्येकी १ नग | **३२९ x ३ नग = ९८७ नग** | **४३९=२० प्रती १ नग** | **४३३४९०=४०** |
| २ | स्त्री सफाई कर्मचा-यांकरीता - ९ वारी रंगीत साडी,कमीत कमी ८.३ मी.लांबीची ११६ सें.मी. रुंद, किनारपट्टी असलेली प्रत्येकी २ साडी<br>रंग -काळा व फिक्कट निळा प्रत्येकी १ नग | **१२६ x २ नग = २५२ नग** | **६२९=१० प्रती १ नग** | **१५८५३३=२०** |
| ३ | स्त्री सफाई कर्मचा-यांकरिता - नमुना पसंतीच्या रंगीत साडीवर 'मॅच'होणारा ब्लाऊजपीस-रुंदी कमीत कमी ८९सें.मी. रंग-लाल(प्रत्येकी २ मिटरचा १ पिस करुन) | **४५५ x २ मीटर = ९१० मीटर** | **८१=०० प्रती १ मीटर** | **७३७१०=००** |
| ४ | स्त्री शिपाई कर्मचा-यांकरिता पुनम सुतामधील - ६ वारी कमीत कमी ५.५ मी.लांबी ११६ सें.मी.रुंद.रंग- अबोली | **५८ x ३ नग = १७४ नग** | **४२२=१० प्रती १ नग** | **७३४४५=४०** |
| ५ | स्त्री शिपाई कर्मचा-यांकरिता - नमुना पसंतीच्या साडीवर 'मॅच'होणारा ब्लाऊजपीस - रुंदी कमीत कमी ८९ सें.मी. (प्रत्येकी २ मिटरचा १ पिस करुन) | **५८ x २ मीटर = ११६ मीटर** | **८१=०० प्रती १ मीटर** | **९३९६=००** |
| ६ | दवाखान्यातील आया,दाया इ. स्त्री कर्मचा-यां करीता - ६ वार सफेद रंगाची साडी,कमीत कमी ५.५ मी.लांबीची ११६ सें.मी.रुंद, २.१/२" निळी गर्द किनारपट्टी असलेली. | **५२ x ३ नग = १५६ नग** | **४७८=८० प्रती १ नग** | **७४६९२=८०** |
| ७ | दवाखान्यातील आया,दाया इ. स्त्री कर्मचा-यां करीता - ९ वार सफेद रंगाची साडी,कमीत कमी ८.३ मी.लांबीची ११६ सें.मी.रुंद, २.१/२" निळी गर्द किनारपट्टी असलेली. | **४ x २ नग = ८ नग** | **५७६=०० प्रती १ नग** | **४६०८=००** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | दवाखान्यातील आया,दाया इ. स्त्री कर्मचा-यां करीता - ब्लाऊजपीस सफेद रंगाचा रुंदी कमीत कमी ८९ सें.मी. (प्रत्येकी २ मिटरचा १ पिस करुन) | **५६ x २ मीटर = ११२ मीटर** | **८१=००<br>प्रती १ मीटर** | **९०७२=००** |
| ९ | दवाखान्यातील स्त्री परिचारीका कर्मचा-यां करीता-६ वारी बदामी रंगाची वायल साडी कमीत कमी ५.५ मी.लांबीची, ११६ सें.मी.रुंद असलेली. | **६ नग x ३ नग = १८ नग** | **४७८=८०<br>प्रती १ नग** | **८६१८=४०** |
| १० | दवाखान्यातील स्त्री परिचारीका कर्मचा-यां करीता - नमुना पसंतीच्या बदामी रंगाची वायल साडीसाठी बदामी रंगाचा ब्लाऊजपीस - रुंदी कमीत कमी ८९ सें.मी. (प्रत्येकी २ मिटरचा १ पिस करुन) | **६ x २ मीटर = १२ मीटर** | **८१=००<br>प्रती १ मीटर** | **९७२=००** |
| ११ | दवाखान्यातील स्त्री परिचारीका कर्मचा-यां करीता बदामी रंगाचा सलवार कुर्ता दोन ड्रेससाठी कापड. पन्हा ३६". (प्रत्येकी ९ मिटरचा १ पिस करुन) | **३५ x ९ मीटर = ३१५ मीटर** | **१३२=३०<br>प्रती १ मिटर** | **४१६७४=५०** |
| १२ | दवाखान्यातील वैद्यकिय अधिकारी, लॅबटेक्निशियन,मिश्रक व स्त्री परिचारीका कर्मचा-यां करीता - दोन ॲप्रनसाठी पांढरे कापड पन्हा ५८" (प्रत्येकी ४ मिटर) | **४६ x ४ मीटर = १८४ मीटर** | **२९१=६०<br>प्रती १ मीटर** | **५३६५४=४०** |
| | | **एकूण रक्कम रु.९,४१,८६७=१०** | | |

तरी सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षातील गणवेषपात्र स्त्री कर्मचा-यां करीता शार्प सेल्स,ठाणे यांनी निविदा दर वाटाघाटी नंतर कमी करुन दिलेल्या निविदा दराने स्त्री कर्मचारी गणवेष अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन प्रतिनिधी व स्त्री कर्मचारी प्रतिनिधी यांनी समक्ष पसंत केलेल्या गणवेष नमुन्याप्रमाणे तसेच मा.प्रशासकिय निविदा छाननी समितीने केलेल्या शिफारशी प्रमाणे खरेदीस व त्याकामी येणा-या रक्कम रु.९,४१,८६७=००फक्त (अक्षरी रक्कम रुपये.नऊ लाख एक्केचाळीस हजार आठशे सदुसष्ठ फक्त)खर्चास मा.आयुक्तसाहेब यांनी दि.१७/०३/२०१६ रोजी मंजुरी दिलेली आहे. संबंधित निविदाकार यांना जा.क्र.स्टोअर विभाग - ३६३ दि.१९/०३/२०१६ अन्वये निविदा डिपॉझिट रक्कम भरुन करारनामा करुन देणेबाबत कळविले असता त्यांनी दि.२१/०४/२०१६ रोजी निविदा डिपॉझिट रक्कम भरुन संविदा पूर्ण केलेली आहे.

सदर बाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड)अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करणेबाबत स्टोअर विभाग दि.३०/०४/२०१६ चे प्रस्तावावर मा.मुख्य लेखाधिकारी "प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर"

मा.मुख्य लेखापरिक्षक "लेखा परीक्षण करण्यात आले लेखा परीक्षण अभिप्राय / त्रुटी निरंक".
मा.उपायुक्तसाहेब(कर)यांनी "प्रस्तावित नूसार मा.स्थायी समिती कडेस माहितीस्तव सादर करणेचे आदशार्थ सादर"असा अभिप्राय नमुद करुन स्वाक्षरी केलेली आहे.
मा.आयुक्तसाहेब यांनी सहमतीदर्शक स्वाक्षरी केलेली आहे.

तरी ई-निविदा क्र.१०५० - अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेषपात्र स्त्री कर्मचा-यां करिता गणवेष खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड)अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा रिपोर्ट असे.
सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

***<u>चर्चा :-</u>***

मा.सभापती साहेब :- गणवेषपात्र स्त्री कर्मचा-यांकरिता गणवेष खरेदी करणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- फक्त स्त्री कर्मचा-यांकरीता गणवेष खरेदी आहे का ? पुरूष कर्मचा-यांच्या गणवेशाचे काय ते केव्हा देणार. या कर्मचा-यांचे कोणत्या वर्षा करीता खरेदी करून दयावयाचे आहेत.

स्टोअर विभाग श्रीमती कमळापूरकर :- पुरूष कर्मचा-यांकरीता गणवेष खरेदीचा प्रस्ताव पाठविला आहे.लवकरच टेंडर काढण्यात येईल.सन २०१३-१४ या वर्षाचे गणवेश आपण सध्या खरेदी करीत आहोत.

प्र.शहर अभियंता:- प्रकल्प विभाग जा.क्र.५९ नुसार प्रोफेसर कॉलनी,फा.प्लॉट १२९ पैकी येथे FBT तत्वावर शॉपींग सेंटर विकसित करणे करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेसाठी ई निविदा राबविण्याची प्रक्रीया करित असल्याबाबत व सदर जागेच्या प्रमियम बाबत मा.स्थायी समितीस अवगत करावे असे मा.आयुक्त यांनी मान्यता दिल्यावरून पत्र आपल्या निदर्शनास आणत आहे.

मा.सभापती साहेब :- पत्र वाचुन दाखवा.

अभियंता श्री. निंबाळकर :- अहमदनगर महानगरपालिका प्रकल्प विभाग जा.क्र.५९, विषय- प्रोफेसर कॉलनी फायनल प्लॉट नं.१२९ (पैकी) येथे एफ.बी.टी. तत्वावर शॉपींग सेंटर विकसित करणेकरिता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेसाठी ई - निविदा मागविणेबाबत.

उपरोक्त विषयाकरिता ई - निविदा राबविणेकामी रिपोर्ट सादर केला असता मा. महासभा ठराव क्र.३८ दिनांक २२/०६/२०१० अन्वये अटी शर्तीची पुर्तता करणेस तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र.१०१ दिनांक ११/०३/२०११ रोजीच्या ठरावानुसार मा. महासभेच्या अटीस अधिन राहुन मा.शासनाच्या रेडीरेकरप्रमाणे येणा-या किमतीचे रकमेत १०% वाढ धरून ती रक्कम प्रिमियम रक्कम म्हणुन मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार सन २०१६-२०१७ च्या शिघ्र सिध्द गणकानुसार रूपये ५ कोटी २५ लाख इतका नगररचना विभागामार्फत प्रिमियम निश्चित करण्यात आलेला आहेत.

तसेच सदर प्रकरणात निविदा प्रसिध्द करणेस कोणताही मनाई हुकूम नसलेने निविदा प्रक्रिया राबविणेस आदेश नाहीत. असे अभिप्राय मनपा विधी सल्लागार यांनी दिलेले आहेत. त्याचबरोबर अनुज्ञेय बांधकाम व नाटयगृहाचा उर्वरीत एफ.एस.आय. या दोन्हीचा विचार करता रक्कम रूपये १०.६२ कोटी प्रिमियम रक्कम म्हणून नगररचना विभागाने अभिप्राय नोंदविलेला आहे.

वरील प्रमाणे ई - निविदा राबविणेस व त्याचबरोबर मा.स्थायी समितीस अवगत करणेस मा.आयुक्त यांनी दिनांक ७/६/२०१६ रोजी मान्यता दिलेला आहे. त्यानुसार मा.स्थायी समितीस अवगत करावे.

मा.सभापती साहेब :- प्रोफेसर कॉलनी येथे FBT तत्वावर शॉपींग सेंटर विकसित करणे करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेसाठी ई निविदा राबविण्याची प्रक्रीया करित असल्याबाबत व सदर जागेच्या प्रमियम बाबत मा.स्थायी समितीस अवगत करावे असे मा.आयुक्त यांनी मान्यता दिल्यावरून अभियंता यांनी वाचलेले पत्र स्थायी समितीस अवगत झाले आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- प्रोफेसर कॉलनी,फा.प्लॉट १२९ पैकी येथे FBT तत्वावर शॉपींग सेंटर विकसित करणे करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेसाठी ई निविदा राबविण्याची झालेली प्रक्रीया सभेच्या निदर्शनास आणणे बाबत च्या विषयाकरीता झालेली व पुढील कार्यवाही सुरू ठेवावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- सन २०१३-१४ मधील गणवेष आपण सन २०१६-१७ मध्ये मंजूरी देत आहोत.सर्व कार्यवाही करीत तीन वर्षाचा कालावधी गेला आहे.टेंडर काढणे ,टेंडरची मुदत ,अधिका-यांच्या मंजूरी या सर्व कार्यवाही करीता बराच वेळ जातो.एखादया वर्षामध्ये खरेदी करावयाची असल्यास ती खरेदी दुस-या वर्षी सुध्दा पुर्ण होत नाही. अत्ताची निविदा ही कार्योत्तर मंजूरीदेण्यात येवून पुढील वर्षाकरीता पुरवठादार शार्प सेल्स,ठाणे हे दराने पुढील वर्षा करीता गणवेषाचा पुरवठा करीत असल्यास याच सभेमध्ये मंजूरी देवून पुढील वर्षा करीता वर्कऑर्डर देण्यात यावी.प्रकल्प विभागाकडील शहर अभियंता यांचे पत्रानुसार कार्यवाही सुरू ठेवावी.

मा.श्री.मनोज दुलम :- ऑफिस रिपोर्ट नुसार निविदेस कार्योत्तर मंजूरी देण्यात येवून पुढील वर्षाकरीता पुरवठादार शार्प सेल्स,ठाणे हे दराने पुढील वर्षा करीता गणवेषाचा पुरवठा करीत असल्यास याच सभेमध्ये मंजूरी देवून पुढील वर्षा करीता वर्कऑर्डर देण्यात यावी.शहर अभियंता यांचे पत्रा नुसार झालेली व चालू असलेली कार्यवाही करावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट मध्ये नमूद दरास ही सभा कार्योत्तर मान्यता देत आहे व पुढील वर्षा करीता याच दराने गणवेश पुरवठा करीत असल्यास संबंधीत ठेकेदारास विचारणा करून स्त्री कर्मचारी गणवेषाची पुढील वर्षाकरीता याच दराने खरेदी करण्यास ही सभा मान्यता देत आहे. सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार प्रोफेसर कॉलनी येथे FBT तत्वावर शॉपींग सेंटर विकसित करणे करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेसाठी ई निविदा राबविण्याची प्रक्रीया करित असल्याबाबत व नगररचना विभागाने नोंदविलेल्या अभिप्रायानुसार जागेचे अनुज्ञेय बांधकाम व नाटयगृहाचा उर्वरीत एफ.एस.आय. या दोन्हीचा विचार करता रक्कम रूपये १०.६२ कोटी प्रिमियम रक्कम स्थायी समितीस अवगत झाले आहे. विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेषपात्र स्त्री कर्मचा-यांकरिता गणवेष खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये केलेल्या संविदेची माहिती स्थायी समितीच्या निदर्शनास आली आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर. शार्प सेल्स,ठाणे यांस पुढील वर्षा करीता याच दराने गणवेश पुरवठा करीत असल्यास विचारणा करून स्त्री कर्मचारी गणवेषाची पुढील वर्षाकरीता याच दराने खरेदी करण्यास ही सभा मान्यता देत आहे. सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार प्रोफेसर कॉलनी येथे FBT तत्वावर शॉपींग सेंटर विकसित करणे करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेसाठी ई निविदा राबविण्याची प्रक्रीया करित असल्याबाबत व नगररचना विभागाने नोंदविलेल्या अभिप्रायानुसार जागेचे अनुज्ञेय बांधकाम व नाटयगृहाचा उर्वरीत एफ.एस.आय. या दोन्हीचा विचार करता रक्कम रूपये १०.६२ कोटी प्रिमियम रक्कम स्थायी समितीस अवगत झाले असून या प्रिमीयम रक्कमेस हि सभा मान्यता देत आहे. विषय मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मनोज दुलम सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक-९९ शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे विविध देखभाल दुरूस्ती करीता वार्षिक ठेकेदार नेमणे सन २०१५-१६ अंतर्गत ई - निविदा क्र.१३१६ स्टेज,मंडप,बेरेकेटींग या कामांच्या निविदा मंजुरी बाबत.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे,

१] प्रशासकीय मान्यता : मा.आयुक्त यांची दि.२३/०३/२०१६

२] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- सन.२०१३-१४

३] ऑनलाईन ई- निविदा क्र. १३१६/ सन २०१६-१७

४] निविदा विक्री कालावधी :- दि.२९/०३/२०१६ ते दि.३०/५/२०१६ ( दुस-या मुदतवाढ नुसार)

५] निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.३१/०५/२०१६ ते दि. २/०६/२०१६ (पहिल्या मुदतवाढ नुसार)

६] निविदा उघडण्याची तारीख :- दि.०८/०६/२०१६

७] कामाची मुदत :- प्रत्येकी १२ महिने.

८] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| अ. क्र | ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदा धारकाने भरलेला दर | सर्वात कमी दराचे निविदा धारक व त्यांनी भरलेला दर. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | सा.बां.वि./ई -निविदा क्र.१३१६ २०१६-१७ | स्टेज, मंडप, बॅरेकेटींग इत्यादी | १५,००,०००/- | मे. कैलास मंडप वर्क्स | ०९.००% जादा दराने | मे.निलेश मंडप वर्क्स<br>५.०० % जादा दराने |
| | | | | मे.निलेश मंडप वर्क्स | ५.०० % जादा दराने | |
| | | | | मे.आर.के.मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स | ७.००% जादा दराने | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्ट्या रकाना क्र.७ मध्ये नमुद ठेकेदार मे.निलेश मंडप वर्क्स, अहमदनगर यांची निविदा स्पर्धात्मक दृष्टया कमी दराची ५.००% जादा दराने असुन दि.२४/०५/२०१६ रोजी मा.आयुक्त, अति. आयुक्त यांचेशी समक्ष झालेल्या चर्चेनुसार व दिलेल्या आदेशानुसार यशस्वी निविदा धारक यांना अंदाजपत्रकीय दराने काम करणेस तयार असले बाबत इकडील जा.क्र.५८३/२ दि.१०/०६/२०१६ च्या लेखी पत्रान्वये विचारणा करण्यात आली असता यशस्वी ठेकेदार मे. निलेश मंडप वर्क्स, अहमदनगर यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने करणेस तयार असलेबाबत दि.१३/०६/२०१६रोजी पत्र दिले आहे.

तरी यशस्वी निविदाधारक मे.निलेश मंडप वर्क्स, अहमदनगर यांची वार्षिक निविदा असल्याने अंदाजपत्रकीय दराची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर./क्ष

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, यशस्वी निविदाधारक यांनी उपरोक्त नमूद काम अंदाजपत्रकीय दराने करणेची लेखी संमती दिलेली असलेने अंदाजपत्रकीय दराची निविदा मा.स्थायी समिती समोर मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय कि,पुर्व लेखापरिक्षण करण्यात आले लेखा परिक्षण तृटी निरंक

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, नमूद "क्ष" प्रमाणे मान्यतेस्तव स. सादर

यावर मा.अति. आयुक्त यांचा अभिप्राय की, उपरोक्त सविस्तर अहवालानुसार मंजुरीकरिता मा.स्थायी समितीकडे सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

***चर्चा :-***

मा.सभापती साहेब :- विविध देखभाल दुरूस्ती करीता वार्षिक ठेकेदार नेमणे सन २०१५-१६ अंतर्गत ई - निविदा क्र.१३१६ स्टेज,मंडप,बेरेकेटींग या कामांच्या निविदा मंजुरी विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.सभापती साहेब :- किती जणांनी निविदा दाखल केल्या होत्या

बांधकाम विभाग श्री.पारखे :- तीन निविदा दाखल झाल्या आहेत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- हा फक्त दर मंजुरी चा विषय आहे का?

बांधकाम विभाग श्री.पारखे :- हो दर मंजूरीचा विषय आहे.

मा.सभापती साहेब :- नेमकी कोणती कामे आपण या निविदा दरामध्ये प्रस्तावीत करता.

बांधकाम विभाग श्री.पारखे :- महानगरपालिकेच्या कामाकरीता ज्यावेळी स्टेज,मंडप,गणपती करीता बेरेकेटींग करणे. आश्या स्वरूपाच्या कामा करीता ठेकेदार एजन्सी ची नेमणूक करणे करीता ही निविदा आहे.

मा.सभापती साहेब :- हि सर्व महत्वाची कामे आहेत व अत्यावश्यक कामे आहेत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ही सर्व वेळेत पुर्ण करावयाची कामे असून त्याची बीले पेंडींग ठेवू नयेत.

मा.श्री.मनोज दुलम :- वार्षीक निविदा असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- या निविदे अंर्तगत प्रस्तावित केलेली कामे रितसर पूर्ण झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत प्रशासनाने देयक अदा करण्याची कार्यवाही प्राधान्याने पार पाडावी.वार्षीक निविदा असल्याने ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे विविध देखभाल दुरूस्ती करीता वार्षिक ठेकेदार नेमणे करीता सन २०१५-१६ अंतर्गत ई - निविदा क्र.१३१६ स्टेज,मंडप,बेरेकेटींग या कामांच्या निविदा दरास ही सभा मान्यता देत आहे. या निविदे अंर्तगत प्रस्तावित केलेली कामे रितसर पूर्ण झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत प्रशासनाने देयक अदा करण्याची कार्यवाही प्राधान्याने पार पाडावी.ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री.मनोज दुलम सही/-

अनुमोदक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- १००                                                  शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** विविध देखभाल दुरूस्ती करीता वार्षीक ठेकेदार नेमणे सन २०१५-१६ अंतर्गत ई-निविदा क्र.१३१३ गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती या कामांच्या निविदा मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभाग

विषय : विविध देखभाल दुरूस्ती करीता वार्षिक ठेकेदार नेमणे सन २०१५-२०१६ अंतर्गत ई-निविदा क्र.१३१३ या कामांच्या निविदा मंजुरी बाबत.

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे,

१] प्रशासकीय मान्यता : मा.आयुक्त यांची दि.२३/०३/२०१६
२] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- सन.२०१३-१४
३] ऑनलाईन ई- निविदा क्र. १३१३/ सन २०१६-१७
४] निविदा विक्री कालावधी :- दि.२९/०३/२०१६ ते दि.१२/०५/२०१६ ( तिस-या मुदतवाढ नुसार)
५] निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.१३/०४/२०१६ ते दि. २६/०७/२०१६ (दुस-या मुदतवाढ नुसार)
६] निविदा उघडण्याची तारीख :- दि.०३/०८/२०१६
७] कामाची मुदत :- प्रत्येकी १२ महिने.
८] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| अ. क्र | ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदा धारकाने भरलेला दर | सर्वात कमी दराचे निविदा धारक व त्यांनी भरलेला दर. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | क्र.१३१३ | गटर/ ड्रेनेज / चेंबर दुरूस्ती | २०,००,०००/- | श्री. सुनिल राउत | २.३४% कमी दराने | श्री. सुनिल राउत २.३४% कमी दराने |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्ट्या रकाना क्र.७ मध्ये नमुद ठेकेदार श्री. सुनिल राउत, अहमदनगर यांची निविदा स्पर्धात्मक दृष्ट्या कमी दराची २.३४% कमी दराने असल्यामुळे यशस्वी निविदाधारक श्री. सुनिल राउत, अहमदनगर यांची २.३४% कमी दराची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव तथा मंजुरीस्तव पाठविणेस सविनय सादर./ क्ष

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, दुस-या मुदतवाढीनंतर एकच निविदा प्राप्त झाली सदरची निविदा निविदा दरापेक्षा २.३४ टक्के कमी दराची असलेने व वार्षिक देखभाल दुरूस्तीची निविदा असलेने दर निश्चिती साठी मा.स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे. करिता सदर निविदा दर निश्चितीसाठी मा.स्थायी समितीसमोर सादर करणेस मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय कि,पुर्व लेखापरिक्षण करण्यात आले लेखा परिक्षण तृटी निरंक

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, नमूद "क्ष" नुसार व अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा कमी दराची निविदा असलेने मान्यतेस्तव मे.स्थायी समिती सभेपुढे सादर करणेस हरकत नाही. मे.आदेशार्थ सादर.

यावर मा.अति. आयुक्त यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालानुसार व प्रस्तावीत "अ" प्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.३४% कमी दराने निविदा दर मान्यतेकरिता मा.स्थायी समितीकडे सादर करणे कामी निर्णयास्तव सादर.

यावर मा. आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, दुस-या मुदतवाढीनंतर एकच निविदे वर प्रस्ताव (निविदा) मान्य करता येईल किंवा कसे ? याबाबतच्या कायदेशीर तरतुदी तपासून स्वंयंस्पष्टता करावी.

ooo

मा. फेर सादर,

ई - निविदा प्रणाली अंतर्गत प्राप्त होणा-या निविदा देकाराबाबत अवलंबवयाची कार्यपध्दती विषयी मा. महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. निविदा -२०१२ /प्र.क्र.९७/पंरा-७ , बांधकाम भवन,२५ मर्झबान पथ, फोर्ट मुंबई दि.२३/९/२०१३मध्ये नमुद केल्यानुसार शासन निर्णय क्र.(३) दुस-यांदा मुदतवाढ दिलेल्या निविदे निविदा भरण्याचा कालावधी संपल्यानंतर एक जसे निविदा प्राप्त झाली असेल तर ती उघडण्याची कार्यवाही संबंधीत निविदा प्राधिका-याने करावी.

असे निर्देश दिले असल्याने तसेच उपरोक्त कामाची निविदा तिस-या मुदतवाढीनंतर प्राप्त झाली असल्याने ती उघडण्यात येवुन पुढील आवश्यकती कार्यवाही करून निविदा मान्यतेसाठी सादर करण्यात असलेली आहे. तरी उपरोक्त खुलाशान्वये निविदा मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव तथा मंजुरीस्तव पाठविणेस सविनय सादर.

सोबत- शासन निर्णय

येणेप्रमाणे शहर अभियंता यांचा फेरसादर असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावीनुसार निविदा मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे करणेस हरकत नाही.

यावर मा.अति.आयुक्त यांचा अभिप्राय की, उपरोक्त फेरसादर अहवालाप्रमाणे व "ब" नुसार शासन निर्णय दि.२३ सप्टेंबर २०१३ मधील ३ प्रमाणे कार्यवाही करणे उचित होईल. प्रथम निविदा व त्यानंतर दोन वेळा मुदतवाढ याप्रमाणे प्रस्ताव (निविदा) मान्य करता येईल. तथापि मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

***<u>चर्चा :-</u>***

मा.सभापती साहेब :- विविध देखभाल दुरूस्ती करीता वार्षीक ठेकेदार नेमणे सन २०१५-१६ अंतर्गत ई-निविदा क्र.१३१३ गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती या कामांच्या निविदा दराच्या मंजुरी विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.सभापती साहेब :- हि एकच निविदा आहे का?

बांधकाम विभाग श्री.पारखे :- दुस-या मुदतवाढीनंतर एकच निविदा प्राप्त झाली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- हा फक्त दर मंजूरी चा विषय आहे का?

बांधकाम विभाग श्री.पारखे :- हो दर मंजूरीचा विषय आहे.

मा.श्री.मनोज दुलम :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- या निविदे अंर्तगत प्रस्तावित केलेली कामे रितसर पूर्ण झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत प्रशासनाने देयक अदा करण्याची  कार्यवाही प्राधान्याने पार पाडावी.वार्षीक निविदा दर असल्याने ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार विविध देखभाल दुरूस्ती करीता वार्षीक ठेकेदार नेमणे सन २०१५-१६ अंतर्गत ई-निविदा क्र.१३१३ गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती या कामांच्या निविदा दरास ही सभा मान्यता देत आहे. या निविदे अंर्तगत प्रस्तावित केलेली कामे रितसर पूर्ण झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत प्रशासनाने देयक अदा करण्याची  कार्यवाही प्राधान्याने पार पाडावी.ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री.मनोज दुलम      सही/-

अनुमोदक :- मा.श्री.दिलीप सातपुते      सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- १०१ शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. जगदीश किसन पांडे, नेप्तीगेट नालेगांव यांनी अमरधाम जवळ असलेला १५X२० फुट इतक्या जागा व्यावसायासाठी जागाभाडे पोटी भाडेकराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेवून देणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मार्केट विभाग अहमदनगर महानगरपालिका

संदर्भ :- श्री जगदीश किसन पांडे यांचा दि.३०/१/१६ चा अर्ज.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती पुर्वक रिपोर्ट सादर करण्यात येते की,अर्जदार श्री जगदीश पांडे,नेप्तीगेट,नालेगांव यांनी अमरधाम जवळ असलेली १५x२०फुट इतक्या जागेची मागणी केलेली आहे.सदर जागा मागणी अर्ज मार्केट जा.नं.५०६ दि.२/२/१६ ने भाडे व अनामत ठरविणे कामी नगररचना विभागाकडे पाठविण्यात आला.त्यावर नगररचना जा.नं.११२३दि.६/२/१६ने विषयांकित जागा आरक्षण क्र.२२२ व्यापारी संकुल व कार्यालय या कारणासाठी आरक्षित आहे.तसेच फेरीवाला धोरणाच्या अनुषंगाने शहरातील फेरीवाल्याचे पुनर्वसन करणेसाठी सदर जागा राखीव ठेवले बाबत मा.उच्च न्यायालय,औरंगाबाद क्षंडपीठ येथे महानगरपालिकेने म्हणणे सादर केलेले आहे.सदरचे पुनर्वसन पुर्ण झालेनंतर सदर जागा उपलब्ध झाल्यास त्यानंतर सदर अर्जाबाबत विचार करता येईल त्यामुळे सदर जागा अर्जदार यांना भाडेतत्वावर देता येणार नाही.

उक्त जागेचा दर द.म.भाडे १७००/-व अनामत रक्कम रू.८५०००/-प्रमाणीत करून नियमानुसार कार्यवाही करणे असा अभिप्राय दिला आहे.सबब जागा भाडे तत्वावर देता येत नाही असे संबंधिताना कळविणे किंवा प्रमाणित केलेले भाडे व अनामतबाबत मा.स्थायी समितीकडे मान्यतेस पाठविणे याबाबत आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि,"अ" बाबत अचित आदेशार्थ सादर.

यावर अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय कि,सोबत संचिकेमधिल नगररचनाकार यांचे दि.६/०२/२०१६ चे पत्राप्रमाणे व "अ" तसेच "ब" प्रमाणे जागा अर्जदार यांना भाडे तत्वावर देता येणार नाही.तथापि धोरणात्मक निर्णयाकरिता स्थायी समितीकडे सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

***<u>चर्चा :-</u>***

मा.सभापती साहेब :- जागा व्यावसायासाठी जागाभाडे पोटी भाडेकराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेवून देणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.बाळासाहेब बोराटे :- खजूर गल्लीतील लोकांनी निवेदन दिले आहे.

मा.सभापती साहेब :- आपण पुर्नवसन केलेले गरीब लोक आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- त्यांना व्यवस्थीत भाडे आकारा. ॲग्रीमेंट करून घ्या.

मार्केट विभाग श्री.तांबोळी :- खजूर गल्लीतील गाळेधारकांचा काल अर्ज आला.प्रस्ताव ठेवतो आहे.

मा.सभापती साहेब :- ३८ वर्षपुर्वी नवनीतभाई बार्शीकर यांच्या कार्यकाळात ती जागा दिली होती.पुर्वी १ रु.भाडे होते.नंतर ३००/- रू.झाले आता रू.१७००/-झाले आहे.

मार्केट विभाग श्री.तांबोळी :- रेग्युलर व हस्तांतरण बाबत कार्यवाही करण्यात येईल.

मा.सभापती साहेब :- ग्राहक भांडारचे भाडे सांगा,ती जागा किती आहे.

मार्केट विभाग श्री.तांबोळी :- १२००० स्वे.फुट जागा आहे.वर्षाला ३८ हजार रूपये भाडे आहे.

मा.सभापती साहेब :- तुम्ही गरीबांच्या मागे लागता.ग्राहक भांडार प्रमाणे शहरात मोठया प्रमाणत वास्तु व जागाआहे.आपण भाडे तत्वावर देतो.लोकांनी त्या जागेवर डायरेक्ट नाव लावले. त्याबाबत आपण फक्त भांडतो करारामध्ये नमुद केल्या नुसार कारवाई करणे आवश्यक आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- खजुर गल्ली बाबत १ रू.भाडे घेत होतो.ती रस्ता बाजू फिची आकरणी त्यांना आपण करत होतो.

मा.सभापती साहेब :- आपला निर्णय गाळेधारकांच्या बाबत झाला आहे.मोकळया जागेबाबत नाही.रंगभुवनचे लोक आमच्याकडे आले होते.लोकांना दिड वर्षानंतर नोटीसा गेल्या.महासभेचा ठराव झाला. खजूर गल्ली बाबत काय निर्णय देणार.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- मुळात हे प्रकरण त्यांना जी जागा दिली ती नाममात्र भाडे आकारणी करून जागा दिल्या गेल्या आहेत.तात्पुरत्या स्वरूपात जागा दिलेली आहे.

मा.सभापती साहेब :- ग्राहक भांडारची मुदत केव्हा संपली.

मार्केट विभाग श्री.तांबोळी:- ८ ते १० वर्षा पुर्वी मुदत संपली आहे.

मा.सभापती साहेब :- जे अधिकारी जाणून बुजून काम करत नसतील तर त्यांच्या पगारातुन झालेल्या नुकसानीची वसूली करण्यात यावी.ग्राहक भांडाच्या जागेबाबतची फाईल पुटअप करून कॅटेगीरीत बसत असतील त्यांना ॲग्रीमेंट नुसार जागा देण्यात यावी व ज्यांची मुदत संपली आपण ज्या कामासाठी दिली त्या ठिकणी वेगळया कारणासाठी जागेचा वापर आढल्यास प्रथम ती वास्तु ताब्यात घेण्याची कारवाई करण्यात यावी.नोटिस कीती दिवसांत काढणार सांगा.

मार्केट विभाग श्री.तांबोळी :- तीन ते चार दिवसांत नोटिस काढतो.

मा.सभापती साहेब :- नोटीस काढून स्थायी समितीला अहवाल दया.मागील १० वर्षापासुन वेळोवेळी झालेल्या महासभा व स्थायी समिती च्या ठरावानुसार देण्यात आलेल्या जागा व गाळ्यांचे आत्ता पर्यत ऑडीट करा.ऑडीटर साहेब काय करता येईल सांगा.

मुख्यलेखापरिक्षक श्री.अनारसे :- विशेष लेखा परिक्षण करता येईल.

मा.सभापती साहेब :- आजच समिती कडे जुने दाणे डबरा येथील ग्राहक भांडार लगत स्वच्छता गृह(मुतारी ) च्या उत्तरेकडील रिकाम्या जागा भाडे तत्वावर मिळणे करीता चार अर्ज आले आहेत.श्री.सागर भास्कर थोरात,विलास प्रभाकर बीडवे,संजय गोविंद शिंगटे,चंद्रकांत सुधाकर बिडवे यांनी अनुक्रमे १०x१० चौ. फुट जागा भाडेतत्वावर देण्यात यावी.तसेच मागील१०वर्षाचे विशेष लेखा परिक्षण(ऑडिट )अहमदनगर महानगरपालिकेच्या मुख्यलेखापरिक्षक यांचे मार्फत तात्काळ करण्यात यावे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- प्राप्त झालेल्या चार अर्जदारांस ग्राहक भांडार लगत १०x१० चौ. फुट जागा भाडेतत्वावर देण्यात यावी.तसेच लिंकरोडला भाजीवाले बसतात त्यांनी पण जागा मागीतली आहे तो प्रस्ताव कुठे आहे.

नगररचनाकार श्री. पाटील :- पाच गोडावून येथील ३० ते ४० गुंठे जागा आहे.याबाबत पत्रव्यवहार चालु आहे.ते नाही म्हणतात.ओपनस्पेस मध्ये बसता येत नाही.

मा.श्री.दिलीप सातपुते :- काही पर्यायी व्यवस्था करात येईल का इंडस्ट्रीयल इस्टेट मध्ये बरेच ओपन स्पेस आहे.अनाधिकृत करण्यापेक्षा अधिकृत केल्यास महानगरपालिकेला उत्पन्न मिळेल. पोलीस स्टेशन जवळ सुध्दा जागा आहे.नगररचना विभागाने प्रत्यक्ष पहाणी करून या जागे पैकी सोईस्कर अशी जागा उपलब्ध करून हा भाजीवाल्यांचा विषय मार्गी लावा.

मा.सौ.विद्या खैरे :- स्थायी समिती कडे सतिश गुलाबराव जगताप,यांचा अर्ज प्राप्त झालेला असून त्यांनी नालेगांव सर्व्हे नं.७४०१ येथील १०X१५ या मोजमापाची खुली जागा व्यावसायाकरीता मागणी केलेली आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- नालेगांव अमरधाम च्या बाहेरील बाजुलगत या दोन अर्जदारांना जागा देत आहोत.त्या जागा मोक्षधाम येथे असलेल्या विद्युत दाहिनीच्या डी.पी.च्या समोर येते तिथे जागा दिली तर आडथळा निर्माण होईल.इले.डी.पी.दुरूस्ती करायची असल्यास अडथळा येणार नाही अशा प्रकारे जागा उपलब्ध करून देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- :-अर्जदार श्री जगदीश पांडे,नेप्तीगेट,नालेगांव व स्थायी समितीकडे प्राप्त अर्जदार श्री.सतिश जगताप रा.लिंक रोड,अ.नगर यांच्या मागणी नुसार नगररचना विभागामार्फत प्रत्यक्ष पहाणी करून जागा देण्यात यावी.

मा.श्री.मनोज दुलम :- ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार श्री जगदीश पांडे,नेप्तीगेट,नालेगांव यांना त्यांच्या मागणी नुसार जागा उपलब्ध करून भाडेतत्वावर देण्यात यावी.सभागृहा झालेल्या चर्चे नुसार, स्थायी समितीकडे प्राप्त झालेल्या अर्जदार श्री.सतिश जगताप रा.लिंक रोड,अ.नगर यांच्या मागणी नुसार विद्युत दाहिनीच्या डी.पी.ला अडथळा येणार नाही अशा प्रकारे जागा उपलब्ध करून देण्यात यावी.केडगांव येथील उपनगरामध्ये नगररचना विभागाने प्रत्यक्ष पहाणी करून भाजी विक्रेत्याकरीता ओटयांकरीता जागा उपलब्ध करून देण्यात यावी.

मा.श्री. दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार श्री जगदीश पांडे,नेप्तीगेट,नालेगांव यांना त्यांच्या मागणी नुसार जागा उपलब्ध करून भाडेतत्वावर देण्यात यावी.श्री.सतिश जगताप रा.लिंक रोड,अ.नगर यांच्या मागणी नुसार जागा उपलब्ध करून देण्यात यावी.केडगांव येथील भाजी विक्रेत्यांचा प्रश्न गंभीर असून सध्या रोडवर भाजी विक्रेते बसतात.त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे.त्यांनी केलेल्या अर्जा नुसार भाजी विक्रेत्यांच्या ओटयांकरीता जागा केडगांव सर्व्हे नं. ५५/१/२/३/४/ ओपनस्पेस जपे नगर,केडगांव येथील जागा उपलब्ध करून देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री जगदीश पांडे,नेप्तीगेट,नालेगांव यांनी व सभागृहात झालेल्या चर्चे नुसार, स्थायी समितीकडे प्राप्त अर्जानुसार श्री.सतिश जगताप रा.लिंक रोड,अ.नगर यांनी मागणी केलेली जागा अमरधाम येथील मोक्षधाम विद्युत दाहिनीच्या इले.डी.पी.दुरूस्ती करायची असल्यास अडथळा येणार नाही अशा प्रकारे जागा व जुने दाणे डबरा येथील ग्राहक भांडार लगत स्वच्छता गृह(मुतारी ) च्या उत्तरेकडील रिकामी जागा भाडे तत्वावर मिळणे करीता चार अर्ज आले आहेत.श्री.सागर भास्कर थोरात,विलास प्रभाकर बीडवे,संजय गोविंद शिंगटे,चंद्रकांत सुधाकर बिडवे यांनी अनुक्रमे १०x१० चौ. फुट जागा भाडेतत्वावर अटी व शर्ती नुसार करारकरून ११ वर्षा करीता देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

केडगांव सर्व्हे नं. ५५/१/२/३/४/ ओपनस्पेस जपे नगर,केडगांव येथे भाजी विक्रेत्यांकरीता ओटयांची व्यवस्था जागा उपलब्ध करून देण्यास ही सभा मान्यता देत आहे.या बाबत ची कार्यालयीन कार्यवाही तात्काळ पुर्ण करावी. मागील १० वर्षापासुन वेळोवेळी झालेल्या महासभा व स्थायी समिती च्या ठरावानुसार देण्यात आलेल्या जागा व गाळयांचे आत्ता पर्यत विशेष लेखा परिक्षण(ऑडीट)महानगरपालिकेच्या मुख्यलेखापरीक्षकां मार्फत करण्यात यावे.

**ठराव :-** अर्जदार श्री जगदीश पांडे,नेप्तीगेट,नालेगांव यांनी व सभागृहात झालेल्या चर्चे नुसार, स्थायी समितीकडे प्राप्त अर्जानुसार श्री.सतीश जगताप रा.लिंक रोड,अ.नगर यांनी मागणी केलेली जागा अमरधाम येथील मोक्षधाम विद्युत दाहिनीच्या इले.डी.पी.दुरूस्ती करायची असल्यास अडथळा येणार नाही अशा प्रकारे जागा व जुने दाणे डबरा येथील ग्राहक भांडार लगत स्वच्छतागृह (मुतारी) च्या उत्तरेकडील रिकामी जागा भाडे तत्वावर मिळणे करीता चार अर्ज आले आहेत त्यानुसार श्री.सागर भास्कर थोरात,विलास प्रभाकर बीडवे,संजय गोविंद शिंगटे,चंद्रकांत सुधाकर बिडवे यांनी अनुक्रमे १०x१० चौ. फुट जागा भाडेतत्वावर अटी व शर्ती प्रमाणे करारानुसार ११ वर्षा करीता देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

केडगांव सर्व्हे नं. ५५/१/२/३/४/ ओपनस्पेस जपे नगर,केडगांव येथे भाजी विक्रेत्यांकरीता भाजी ओटयांची व्यवस्था जागा उपलब्ध करून देण्यास ही सभा मान्यता देत आहे.या बाबत ची कार्यालयीन कार्यवाही तात्काळ पुर्ण करावी. व मार्केट विभागाचे मागील १० वर्षापासुन वेळोवेळी झालेल्या महासभा व स्थायी समिती च्या ठरावानुसार भाडेतत्वावर देण्यात आलेल्या जागा व महानगरपालिकेच्या मालकीच्या गाळ्यांचे सन २०१६-१७ अखेर तात्काळ विशेष लेखा परिक्षण मुख्यलेखापरिक्षक यांचे मार्फत तात्काळ करण्यात यावे.खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री.मनोज दुलम सही/-

अनुमोदक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- १०२ शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** कोपरगाव- अहमदनगर रस्ता (रा.म. १०) देहरे रेल्वे भुयारी मार्गातील बाधीत जलवाहिन्यां स्थलांतरीत प्राप्त निविदा दरास मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** पाणी पुरवठा विभाग अहमदनगर महानगरपालिका

संदर्भ :- १. ई. निविदा क्र.१४२२

२. मे.साई असोसिएटस,औरंगाबाद यांनी वाटाघाटी वेळी दिलेले पत्र.

उपरोक्त विषयाबाबत विनंती रिपोर्ट सादर की,कोपरगांव- अहमदनगर रस्ता(रा.म.१०)देहेरे रेल्वे भुयारी मार्गातील बाधीत मार्गातील बाधीत जलवाहिन्यां स्थालांतरीत करणे कामी मे.साई असोसिएट,औरंगाबाद यांची प्राप्त ई-निवीदा नियमानुसार पात्र होत असल्याने मा.उपायुक्त (सा)यांचे प्रशासकीय मंजुरीने दि.१७/१०/२०१६ रोजी निवीदेचा आर्थिक लिफाफा उघडयात आला असता मे.साई असोसिएट,औरंगाबाद यांनी अंदाजपत्रकीय म्हणजेच रू.१,६७,८३,६०६/-या रक्कमेच्या२.३%जादा दराने म्हणजेच रक्कम रू.१,७१,६९,६२८.९४इतक्या दराची निविदा प्राप्त झालेली होती.

सदरचे दर हे जास्तीचे व अवाजवी असल्याचे मे.साई असोसिएटस,औरंगाबाद यांना मा.निविदा छाननी समितीसमोर उपस्थित रहाणे बाबत कळविण्यात आले होते.दि.१८/११/२०१६ रोजी झालेल्या मा.छाननी समिती समोर वाटाघाटी वेळी मे.साई असोसिएटस,औरंगाबाद यांनी सदरचे काम रक्कम रू.१,७१,६९,६२८.९४ ऐवजी रक्कम रू.१,६७,३९,८१०.००इतक्या रकमेत करणेस सहमती दर्श विलेली आहे.तद्नुसार सुधारीत देकार हा अंदाजपत्रकीय रकमेचा म्हणजेच रू.१,६७,८३,६०६/- चे रकमेपेक्षा ०.२६% कमी दराने असून सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकीय दराचे रकमेपेक्षा ८.८% जादा दराचा आहे.

यास्तव कोपरगांव - अहमदनगर रस्ता (रा.म.१०) देहरे रेल्वे भुयारी मार्गातील बाधीत जलवाहिन्यां स्थालांतरीत करणे कामी प्राप्त निवीदा दर धारक मे.साई असोसिएटस,औरंगाबाद यांनी वाटाघाटी अंती दिलेले दर म्हणजेच चालू दरसूची सन २०१५-२०१६ नुसार ८.८%जादा दराने त्यांची ई - निविदा स्विकृती करणेस,तद्नंतर याकामी येणा-या एकूण रक्कम रू.१,६७,३९,८१०/- चे खर्चास मंजूरी मिळणेसह पुढील कार्यवाही करणे कामी मंजुरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर चर्चेसाठी व निर्णयासाठी ठेवून मा.स्थायी समितीच्या निर्णया नुसार पुढील कार्यवाही करणे,संयुक्तीक राहील.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,त्रुटी निरंक

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, स्वाक्षरी

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय कि,छाननी समितीच्या इतिवृत्तासह फेरसादर करावेत.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, फेरसादर,विषयांकित बाबतच्या मा.निविदा छाननी समितीच्या इतिवृत्तासह प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,फेरसादर अहवालानुसार निर्णयाकरीता स्थायी समितीकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय कि,दरसूची २०१५-२०१६ च्या अंदाजपत्रकीय दराने निविदा मंजूर करणे उचित होईल.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**टिप्पणी-** कोपरगाव - अहमदनगर रस्ता (रा.म. १०) देहरे रेल्वे भुयारी मार्गातील बाधीत जलवाहिन्यां स्थलांतरीत करणे कामी मे. साई असोसिएटस, औरंगाबाद यांची प्राप्त ई - क्र.१४२२ निविदा नियमानुसार पात्र होत असल्याने मा.उपायुक्त (सा.) यांचे प्रशासकीय मंजूरीने दि.१७/१०/२०१६ रोजी निवीदेचा आर्थिक लिफाफा उघडण्यात आला असता मे.साई असोसिएट,औरंगाबाद यांनी अंदाजपत्रकीय म्हणजेच रू.१,६७,८३,६०६/-या रक्कमेच्या२.३%जादा दराने म्हणजेच रक्कम रू.१,७१,६९,६२८.९४इतक्या दराची निविदा प्राप्त झालेली होती.

सदरचे दर हे जास्तीचे व अवाजवी असल्याचे मे.साई असोसिएटस,औरंगाबाद यांना मा.निविदा छाननी समितीसमोर उपस्थित रहाणे बाबत कळविण्यात आले होते.दि.१८/११/२०१६ रोजी झालेल्या मा.छाननी समिती समोर वाटाघाटी वेळी मे.साई असोसिएटस,औरंगाबाद यांनी सदरचे काम रक्कम रू.१,७१,६९,६२८.९४ ऐवजी रक्कम रू.१,६७,३९,८१०.००इतक्या रकमेत करणेस सहमती दर्शविलेली आहे.तद्नुसार सुधारीत देकार हा अंदाजपत्रकीय रकमेचा म्हणजेच रू.१,६७,८३,६०६/- चे रकमेपेक्षा ०.२६% कमी दराने आहे.

तद्नुसार मे.साई असोसिएटस,औरंगाबाद यांनी वाटाघाटी अंती दिलेले दर म्हणजेच चालू दरसूची सन २०१५-२०१६ नुसार ८.८%जादा दराने त्यांची ई - निविदा स्विकृत करणेस व याकामी येणा-या एकूण रक्कम रू.१,६७,३९,८१०/- चे खर्चास मंजूरी मिळणेसह पुढील कार्यवाही करणे कामी मा.स्थायी समितीसमोर चर्चेसाठी व निर्णयासाठी ठेवणे संयुक्तीक राहील. अशा आशयाच्या प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर करणेसाठी मा.मुख्य लेखा अधिकारी, मा.उपायुक्त (सा), मा. अतिरिक्त आयुक्त, यांचेमार्फत सादर करणेत आला असता त्यांनी मा. छाननी समितीने शिफारस केलेनुसार मान्यता देणेस शिफारस केली. मात्र मा.आयुक्त साहेब यांनी सदरची निविदा सन २०१५-२०१६ च्या दरसूची नुसार अंदाजपत्रकीय दराने मंजूर करणे उचित होईल असे नमूद केलेले आहे. सन २०१५-२०१६ चे दरसुचीनुसार कामाची किंमत रू.१,५३,८५,८५५/- येत असून यशस्वी निविदाधारकाचा देकार सदर दरापेक्षा ८.८० % जादा दराचा आहे.

मा.आयुक्त यांनी यशस्वी निविदाधारक मे. साई असोसिएटस , औरंगाबाद यांची निविदा सन २०१५-२०१६ चे दरसूची नुसार म्हणजेच रक्कम रू. १,५३,८५,८५५/- मंजूर करणेस शिफारस केलेली आहे.

तरी प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा रिपोर्ट असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

***<u>चर्चा :-</u>***

मा.सभापती साहेब :- कोपरगाव- अहमदनगर रस्ता (रा.म. १०) देहरे रेल्वे भुयारी मार्गातील बाधीत जलवाहिन्यां स्थलांतरीत करणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.सभापती साहेब :- प्रस्तावाची माहिती सांगा.

पा.पु.अभियंता श्री.सोनटक्के :- पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.काकडे हे रजेवर असल्याने त्यांच्या कडील काम सध्या माझ्याकडे तात्पुरत्या स्वरूपात आहे. या प्रस्तावाची माहिती नसल्याने या बाबतची माहिती मॅकेनिकल इंजी श्री.निकम साहेब सांगतील.

मॅकेनिकल इंजी श्री.निकमः- विषयांकीत पाईपलाईन स्थलांतरीत करणे बाबत सन २००७ पासून वारंवार पत्रव्यवहार झालेला आहे.देहेरे येथे रेल्वे लाईन व रस्त्याच्या खालून भुयारी मार्गाचे काम रेल्वे हद्दीत रेल्वे खात्या मार्फत चालू आहे.अहमदनगर महानगरपालिकेची पिण्याची पाईपलाईन असल्याने काम सुरू करता येत नाही.देहेरे

बसस्थानकाजवळ १७६/८०० ते १५७/२०० या रस्त्याच्या अंतरामधील पाईपलाईन स्थलांतरीत करण्याबाबत च्या कामाची निविदा आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कोणत्या निधी मधून खर्च करणार आहे.

मॅकेनिकल इंजी श्री.निकमः- या करीता जागतीक बॅक प्रकल्प यांनी रक्कम महानगरपालिकेकडे जमा केलेली असून यामधून हा खर्च करण्यात येणार आहे.

मा.श्री.मनोज दुलम :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.उषा नलवडे :- कामाची निकड पहाता काम करणे आवश्यक आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- कोपरगाव- अहमदनगर रस्ता (रा.म. १०) देहरे रेल्वे भुयारी मार्गातील बाधीत जलवाहिन्यां स्थलांतरीत करणे कामी प्राप्त निविदा दरास मंजूरी देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार कोपरगाव- अहमदनगर रस्ता (रा.म. १०) देहरे रेल्वे भुयारी मार्गातील बाधीत जलवाहिन्यां स्थलांतरीत करणे कामी प्राप्त निविदा दरास छननी समितीने केलेल्या शिफारशी नुसार मे.साई असोसिएटस,औरंगाबाद यांनी केलेल्या वाटाघाटी अंती दिलेले दर म्हणजेच चालू दरसूची सन २०१५-२०१६ नुसार ८.८%जादा दराने त्यांची ई - निविदा स्विकृत करणेस ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री.मनोज दुलम सही/-

अनुमोदक :- मा.सौ.उषा नलवडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- १०३ शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता बनवित असलेल्या गारबेज कॉम्पॅक्टरचे संयुक्तीक ४.५ क्यू.मी. क्षमतेचे लोखंडी कंटेनर बनविणे (अंदाजे ७० नग) कामी प्राप्त निविदा दरास मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मोटार व्हेईकल विभाग अहमदनगर महानगरपालिका

संदर्भ :- १. ई निविदा क्र.१४२३

२. मे. साई फायबर्स , मिरज यांचे दि.०६/१०/२०१६ चे पत्र

उपरोक्त विषयाबाबत विनंती रिपोर्ट सादर की, अहमदनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता महानगरपालिका बनवित असलेल्या गारबेज कॉम्पॅक्टरचे संयुक्त्तीक ४.५ क्यू. मी. क्षमतेचे लोखंडी कंटेनर बनविणे (अंदाजे ७० नग) कामी मे. न्यू साई फायबर्स, मिरज यांची प्राप्त ई- निविदा नियमानुसार पात्र होत असल्याने मा.आयुक्त यांचे प्रशासकीय मंजूरीने दि.०३/१०/२०१६ रोजी निविदेचा आर्थिक लिफाफा उघडण्यात आला असता गारबेज कॉम्पॅक्टरचे संयुक्तीक ४.५ क्यू.मी. क्षमतेचे लोखंडी कंटेनर बनविणे कामी प्रती नग रूपये ८१,०००/- इतके दर प्राप्त झालेले होते.

सदरचे दर हे जास्तीचे व अवाजवी असल्याने मे. साई फायबर्स , मिरज यांना दि.०५/१०/२०१६ रोजी मा. निविदा छाननी समितीसमोर उपस्थित रहाणे बाबत कळविण्यात आले होते. सदर वेळी मे. साई फायबर्स, मिरज यांचे प्रतिनिधी उपस्थित राहिले होते. तथापी निविदा छाननी समितीची बैठक झाली नाही. परंतू मे. साई फायबर्स ,मिरज यांनी वाटाघाटी बाबतचे पत्र दिलेले असून त्यामध्ये त्यांनी गारबेज कॉम्पॅक्टरेच संयुक्तीक ४.५ क्यू.मी. क्षमतेचे लोखंडी कंटेनर बनविणे कामी निविदेतील दर प्रती नग रूपये ८१,०००/- कमी करून प्रति नग रूपये ६४,८००/-इतक्या दराने काम करण्यास तयार असेलबाबत कळविले आहे. तसे सदर पत्रात त्यांनी मालाचा पुरवठा केल्यानंतर देयकाची रक्कम १५ दिवसात मिळावी अशी विनंती केलेली आहे.

या अनुषंगाने सादर की, मे. साई फायबर्स , मिरज यांना अहमदनगर महानगरपालिकेकडून नुकतेच २.५ क्यू.मी. क्षमतेचे १० नग व ४.५ क्यू.मी. क्षमतेचे १० नग लोखंडी कंटेनर बनविणे कामाचे कार्यारंभ आदेश दिले असून त्यामध्ये ४.५ क्यू.मी. क्षमतेचे लोखंडी कंटेनर बनविणे करीता रूपये ६४,८००/- इतका दर मंजूर आहे व सदरचे काम हे १४ व्या वित्त आयोगातील आहे.

त्यामुळे ४.५ क्यू.मी. क्षमतेचे लोखंडी कंटेनर बनविणे (अंदाजे ७० नग) कामी मे. साई फायबर्स , मिरज यांनी वाटाघाटी बाबतचे पत्रामध्ये त्यांचे पूर्वीचे दर नमूद केलेले असल्याने सदरचे दर मंजूर करणेस हरकत नाही.

यास्तव अहमदनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता महानगरपालिका बनवित असलेल्या गारबेज कॉम्पॅक्टरचे संयुक्तीक ४.५ क्यू.मी. क्षमतेचे ७० नग लोखंडी कंटेनर बनविणे कामी प्राप्त निविदा दर धारक मे. न्यू साई फायबर्स , मिरज यांनी वाटाघाटी अंती दिलेले दर प्रतीनग रूपये ६४,०००/- स्विकृत करणेस, तद्नुसार होणारे खर्च रू.४५,३६,०००/- चे खर्चास मंजुरी मिळणेसह पुढील कार्यवाही करणे कामी मंजुरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर चर्चेसाठी व निर्णयासाठी ठेवून मा.स्थायी समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे,संयुक्तीक राहील.

तथापी आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे मोटार व्हेईकल क्लार्क यांचा अहवाल असे.

यावर मेकॅनिकल इंजि.यांचा अभिप्राय कि,अ.नगर मनपाचे आरोग्य विभागाकरीता ४.५ क्यु.मी.क्षमतेचे लोखंडी कंटेनर (७० ) नग बनविणेकामी प्राप्त दर रू.६४,८००/- प्रतीनग स्वीकरणेस व या अनुषंगाने येणार एकुण खर्च रू.४५.३६,०००/- चे खर्चास मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

यावर मुख्यलेखाअधिकारी छाननी समितीची बैठक बोलविणे योग्य होईल.

यावर मेकॅनिकल इंजी.यांनी मा.फेरसादर, विनंती पुर्वक फेरसादर की,अहमदनगर महानगरपलिका बनवित असलेल्या गारबेज कॉन्ट्रक्टचे संयुक्तीक ४.५ क्यु.मी.क्षमतेचे लोखंडी कंटेनर खरेदी करणे कामी १४ वा वित्त आयोग निधी मधून ३ निवीदा क्र.१४०१ अन्वये खरेदी प्रक्रीया करून दि.१६/०९/२०१६ च्या छाननी समितीमध्ये वाटाघाटी अंती रू.६४,८००/- प्रतिनग गारबेज कंपन्यांचे दर निश्चीत करण्यात आले आहे.

सदरची प्रस्तावीत खरेदी ही महानगरपालिका निधीतून आहे.ई निविदा क्र.१४०१ अन्वये छाननी समितीने दर निश्चीत केलेल्या ४.५ क्यु.मी.क्षमतेचे लोखंडी कंटेनर या स्पेसिफीकेशन प्रमाणेच असून सदरच्या ई निविदा रूपये ६४,८००/- (प्रतिनग) या दरानेच खर्चास मंजूरी प्रस्तावीत करण्यात आली आहे.

सबब तद्नुसार येणा-या एकूण खर्च रू.४५,३६,०००/- च्या खर्चास व प्रस्तावास मा.स्थायी समितीची मंजुरी मिळणेस्तव सविनय सादर.

यावर मुख्यलेखाअधिकारी यांची संमती दर्शक स्वाक्षरी

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,त्रुटी निरंक

यावर उपायुक्त (सा) यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

यावर अतिरीक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय कि,सोबतच्या टिपणी मधिल "अ" प्रमणे निर्णयकरिता मा.स्थायी समितीकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय कि,कृपया म.ले.अ.यांनी सूचित केलेनुसार त्वरित छाननी समितीच्या अहवालानुसार सादर करावे.

यावर मेकॅनिकल इंजी.यांनी मा.फेरसादर, मा.मुख्यलेखाअधिकारी यांनी छाननी समिती बैठक बालाविण्याचे सूचित केलेनंतर त्यावर सविस्तर फेरसादर करण्यात आले असता,फेरसादर टिपणीवर मा.मुख्यलेखाधिकारी यांनी सहमती दर्शवून स्वाक्षरी ही केलेली आहे.तसेच सदर प्रस्तावावर मा.छाननी समितीच्या सर्व सदस्यांच्या सहमतीदर्शक स्वाक्ष-या आहेत.करिता प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे मंजूरीस्तव सादर करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**--***--**

***<u>चर्चा :-</u>***

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता बनवित असलेल्या गारबेज कॉम्पॅक्टरचे संयुक्तीक ४.५ क्यू.मी. क्षमतेचे लोखंडी कंटेनर बनविणे (अंदाजे ७० नग) कामी प्राप्त निविदा दरा विषयी चा प्रस्ताव आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.सभापती साहेब :- निविदा दरा बाबत माहिती सांगा.

मॅकेनिकल इंजी श्री.निकमः- तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या.त्यामध्ये मे.न्यु साई फायबर मिरज यांची कमी दराची निविदा असून.४.५ क्यु.मी.क्षमतेचे लोखंडी कंटेनर बनविणे कामी निविदेतील दर प्रतिनग रू.८१०००/-कमी करून प्रति नग रू. ६४८००/- या दराने पुरवठा करण्यास तयार आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- कंन्टेनरची स्पेसिफिकेशन ची माहिती सांगा

मॅकेनिकल इंजी श्री.निकम:- कंटेनरचा पत्रा ५एम.एम.जाडीचा बेस आहे.साईडचा पत्रा ३.५ एम.एम.जाडीचे आहेत.

मा.श्री.दिलीप सातपुते :- कंटेनर खरेदी अशी तुकडे करून का करण्यात आली.

घ.क. व्य विभाग प्रमुख श्री.पैठणकर:- १४ व्या वित्त आयोगातून २० कंटेनर घेण्याच्या प्रस्तावानुसार ई - टेंडर झाले होते व ठराव पारित झालेला आहे.त्यानंतर ७० कंन्टेनर घेण्याचा प्रस्ताव आला आहे.

मा.सभापती साहेब :- रस्त्याच्या कामाचे तुकडे केले तर आपण मंजूरी देतो का?

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ७० कंटेनर हे म.न.पा.फंडातून असल्याने पुरवठादार तयार होत नाही.आज हि निविदा प्राप्त झाली आहे.त्यानुसार ठेकेदार संस्थेने वाटाघाटी मध्ये पुरवठा केल्यानंतर पंधरा दिवसांत पेंमेट अदा करण्याची अट घातली आहे.

मा.सभापती साहेब :- मा.उपायुक्त साहेब आपण १५ दिवसांत पुरवठादाराचे बील अदा केले जाईल का?

मा.उपयुक्त श्री.चारठाणकर :- वेळेत बील अदा करण्याचा प्रयत्न करू.

घ.क. व्य विभाग प्रमुख श्री.पैठणकर:- १२० कंटेनर १४ व्या वित्त आयोगातून घेण्याचा प्रस्ताव मा.महासभेकडे देण्यात आला आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कंटेनर खरेदी हा घनकचर-याचा भाग आहे. हे ७० कंन्टेनर १४ व्या वित्तआयोगामधून घेण्यास काय हरकत आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- लांडे म्हणून जो ठेकेदार आहे त्याला ९० लाख रूपयांचा चेक दिला.

मुख्यलेखापरिक्षक श्री.अनारसे :- दिवाळीच्या आसपास हा निधी वर्ग केला.

मा.श्री.गणेश भोसले :- ९० लाख मोठी रक्कम आहे.कोणच्यामंजूरीने हा निधी वर्ग करून बील अदा करण्यात आले.

मुख्यलेखापरिक्षक श्री.अनारसे :- कलम ७३ नुसार कार्यवाही करणे गरजेचे आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- कंन्टेनर काय आमच्या घरात बासवायचे आहे का?

मा.सभापती साहेब :- १४ व्या वित्त आयोगात ९० लाख कसे वर्ग करणार.कार्योत्तर मंजूरी होत नाही का?

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कंटेनर खरेदी हा घनकचर-याचा भाग आहे.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- एकूण २०० नग कंटेनर खरेदी चा विषय होता.२० नग कंन्टेनर १४ व्या वित्ता आयोगातुन महासभेचा ठराव झाला आहे.७० नग कंन्टेनर खरेदी चा प्रस्ताव हा म.न.पा.फंडातील आहे.स्थायी समितीने या प्रस्तावातील ७० कंन्टेनर १४ व्या वित्त आयोगातून खरेदी करण्याचा ठराव केल्यास १४ व्या वित्त आयोगातून खरेदी करता येईल.

मा.सभापती साहेब :- १४ व्या वित्त आयोगातून कचरा संकलन व वाहतूक करणा-या ठेकेदारास प्रशासनाने ९० लाख रूपये कसे दिले.या बाबत महासभेचा ठराव किंवा स्थायी समितीच्या ठरावाची आवश्यक होता का?

मा.सभापती साहेब :- प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार कुणाला आहे.

मुख्यलेखापरिक्षक श्री.अनारसे :- खरेदी प्रक्रियाचे अधिकार १९४९ मधील अधिनियमा नुसार २५ लक्ष पर्यत मान्यता देण्याचे अधिकार आयुक्तांना आहे.२५ लक्षा पेक्षा जास्तीचे अधिकार स्थायी समितीला आहे.ज्या लेखाशीर्षामधून प्रशासकीय मान्यता झाली तर त्यातूनच पुर्तता व्हायला पाहिजे.शासनाने महासभेला अधिकार दिले आहे.९० लाख रूपयांचा वापर दुसरीकडे झाला असेल तर ते पैसे घनकच-याकडे वर्ग करावे लागतील.

मा.सभापती साहेब :- मुख्यलेखापरिक्षक यांनी सांगीतल्या प्रमाणे ज्या पध्दतीने ९० लाख रूपये ठेकेदारास दिले त्या प्रमाणे ७० नग कंन्टेनर खरेदी १४ व्या वित्त आयोगातून करण्यास मान्यता देता येईल.व नंतर पैसे

घनकचरा विभागा कडे वर्ग करण्यात येईल. सदरचा विषय अर्थ विभागाशी निगडीत असल्याने मुख्यलेखाधिकरी यांनी माहिती सांगावी.

सहाय्यक आयुक्त श्री.दराडे :- कॅफो यशदाला ट्रेंनिगला गेले आहेत.त्यांचा चार्ज माझ्याकडे आहे. परंतु या बाबत मला माहिती सांगता येणार नाही.

मा.श्री.दिलीप सातपुते :- अहमदनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता बनवित असलेल्या गारबेज कॉम्पॅक्टरचे संयुक्तीक ४.५ क्यू.मी. क्षमतेचे लोखंडी कंटेनर बनविणे (अंदाजे ७० नग) कामी प्राप्त निविदा दरास मान्यता देण्यात यावी.याकामी येणार खर्च प्रस्तावातील ७० कंटनेर रितसर पूर्ण होवून साहित्य स्पेसिपीकेशन प्रमाणे प्राप्त झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत प्रशासनाने देयक अदाईची कार्यवाही प्राधान्याने पार पाडावी.किंवा १४ व्या वित्त आयोगातून बील अदा करण्याची कार्यवाही पुर्ण करावी.

मा.सौ.उषा नलवडे :- कंटेनर खरेदीस मान्याता देण्यात यावी व याकामी येणारा खर्च कंन्टेनर पुरवठा झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत प्रशासनाने देयक देणे बाबतची कार्यवाही प्राधान्याने करावी किंवा १४ व्या वित्त आयोगातून बील अदा करण्याची कार्यवाही पुर्ण करावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहरातील कच-याच्या समस्येची आवस्था पहाता व मा.हरीत लवादाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शन सुचनांचे पालन करण्या करीता अहमदनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता बनवित असलेल्या गारबेज कॉम्पॅक्टरचे संयुक्तीक ४.५ क्यू.मी. क्षमतेचे लोखंडी कंटेनर बनविणे (अंदाजे ७० नग) कामी प्राप्त निविदा दरास मान्यता देण्यात येत आहे. याकामी येणार खर्च प्रस्तावातील ७० कंटनेर रितसर पूर्ण होवून साहित्य स्पेसिपीकेशन प्रमाणे प्राप्त झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत प्रशासनाने देयक अदाकरण्याची कार्यवाही प्राधान्याने पार पाडावी.किंवा १४ व्या वित्त आयोगातून बील अदा करण्याची कार्यवाही पुर्ण करावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता बनवित असलेल्या गारबेज कॉम्पॅक्टरचे संयुक्तीक ४.५ क्यू.मी. क्षमतेचे लोखंडी कंटेनर बनविणे (अंदाजे ७० नग) कामी प्राप्त निविदा दरासमंजुरी देण्यांत येत आहे. याकामी येणारा खर्च प्रस्तावातील ७० कंटनेर रितसर पूर्ण होवून साहित्य स्पेसिपीकेशन प्रमाणे प्राप्त झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत प्रशासनाने देयक अदा करण्याची कार्यवाही प्राधान्याने पार पाडावी.किंवा १४ व्या वित्त आयोगातून बील अदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ.उषा नलवडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- १०४ शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-**सुरेश कांतीलाल पटवा नागापुर उप कार्यालय वॉर्ड क्र.७२, बील क्र.४६० (Z१७२०३००८६) एम.आय.डी.सी.एम.एल.ब्लॉक सर्व्हे नं.९ ते २१ मनपा हद्दीतुन वगळल्याने आकरण्यात आलेली घरपटटीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ नागापुर विभाग

नागापुर उपविभागीय कार्यालय वॉ.क्र. ७२ वसुली लिपिक यांजकडून विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, वॉ.क्र.७२ नगर-मनमाड रोड नागापुर एमआयडीसी ब्लॉक मध्ये सुरेश कांतीलाल पटवा वॉ.क्र७२ बील क्र.४६० या नावे अहमदनगर महानगरपालिका घरपट्टी सर्व्हे सन २००१ मध्ये परिशिष्ट "अ" फॉर्म नोंद घेवुन कर आकारणी करण्यात आलेली होती.

सदर मिळकतीवर सन २०१४-२०१५ अखरे घरपट्टी / पाणीपट्टी रू.४३२०६/-+शास्ती थकबाकी असुन सदर मालमत्ता मा. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.ए. एच.सी.१००४/४९ प्र.क्र.५५/०४/नवी-२४ दिनांक १५ जानेवारी २००८ अन्वये उक्त भाग अहमदनगर महानगरपालिका हद्दीतून वगळण्यात आलेला असुन वगळण्यात आलेल्या मिळकतीवरील थकबाकी रू.४३२०६/- + शास्ती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार रक्कम निर्लेखित करणेबाबत व मंजुरीनुसार योग्य त्या दुरूस्त्या घेणेकामी अहवाल मान्यतेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक यांचा रिपोर्ट असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, उपरोक्त प्रकरणी महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय सोबत जोडलेला असुन सदर निर्णयामध्ये फक्त स.नं. व हद्द सिभा वगळल्या बाबत उल्लेख असुन उक्त मिळकती वरील थकबाकी कोणत्या सालापासून कोठपर्यत वसुली करावी या बाबत अहमदनगर महानगरपालिका विधीतज्ञ यांचा अभिप्राय घेणे उचित वाटते. तथापी मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.(सोबत- अधिसुचना शासन निर्णय छायांकित प्रती सन २०१४-१५ कराचे बील)

यावर प्रभाग अधिकारी क्र.१ यांचा अभिप्राय की, रिव्हीजन विभाग

यावर रिव्हीजन विभाग यांचा अभिप्राय की, सादर मा. शासन निर्णय १५ जानेवारी २००८ चे निर्णयानुसार मनपा हद्दीतील स.नं.९ ते २१ नागापुर हा भाग वगळले असल्याने व सदर मालमत्ता वगळलेल्या सर्व्हे नंबर मध्ये येत असल्याने महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधि.१९४९ चे प्रकरण ८ कराधान नियम १५२ नुसार वसुल न होणारी रक्कम मा. आयुक्त साहेबांवर स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करता येत असल्याने १५ जानेवारी २००८ नंतरची थकबाकी निर्लेखित करणेस न त्यापुर्वीची थकबाकी मनपा विधीतज्ञ यांचा अभिप्राय घेणे उचित वाटते आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, * संबंधीत वसुली लिपिक, कर निरीक्षक, प्रभाग अधिकारी , रिव्हीजन विभागाने प्रमुख, सहाक.मू.नि.व सं.अधि. यांनी कायदयाच्या अभ्यास करण्याची आवश्यकता आहे., जेव्हा उक्त मालमत्ता न.प. हददीत आणि तेव्हापासून ते ती मालमत्ता जोपर्यत मनपा हददीत जोपर्यत कर आकारणी करून वसुल करणे आवश्यक आहे. यात विधीतज्ञ काम मत देणार ?, **/अ** * उक्त मालमत्ता दि.१५ जानेवारी २००८ रोजीनंतर मनपा हददीतून वगळली आहे, तेव्हा त्या तारखेनंतरची कर आकारणी निर्लेखित करण्यात यावी./ **ब**

यावर मा.अति.आयुक्त यांचा अभिप्राय की, उपरोक्त सविस्तर अहवालानुसार मालमत्ता जोपर्यत मनपा हददीमध्ये होती तोपर्यतची कर आकारणी वसूल करणे "अ" प्रमाणे आवश्यक आहे. तसेच "ब" नुसार मनपा

हद्दीमधून सदर मालमत्ता वगळली असेल तर अधिनियम तरतुदी अन्वये कर आकारणी निर्लेखित करणे उचित होईल. तरी निर्णयाकरिता सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, "अ" व "ब" नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- सुरेश कांतीलाल पटवा नागापुर उप कार्यालय वॉर्ड क्र.७२, बील क्र.४६० (Z१७२०३००८६) एम.आय.डी.सी.एम.एल.ब्लॉक सर्व्हे नं.९ ते २१ मनपा हद्दीतुन वगळल्याने आकरण्यात आलेली घरपटटीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट .

मा.श्री. दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- मुळ रक्कम निर्लेखित करू बाकीचे नाही.

मा.सौ.सुनिता फुलसौदर :- मनपा हद्दीतुन वगळल्याने आकरण्यात आलेली घरपटटीची रक्कम निर्लेखित मंजूर करावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद केलेली सुरेश कांतीलाल पटवा नागापुर उप कार्यालय वॉर्ड क्र.७२, बील क्र.४६० (Z१७२०३००८६) एम.आय.डी.सी.एम.एल.ब्लॉक सर्व्हे नं.९ ते २१ मनपा हद्दीतुन वगळल्याने आकरण्यात आलेली घरपटटीची रक्कम निर्लेखित करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे.शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टानुसार ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद केलेली सुरेश कांतीलाल पटवा नागापुर उप कार्यालय वॉर्ड क्र.७२, बील क्र.४६० (Z१७२०३००८६) एम.आय.डी.सी.एम.एल.ब्लॉक सर्व्हे नं.९ ते २१ मनपा हद्दीतुन वगळल्याने आकरण्यात आलेली घरपटटीची रक्कम निर्लेखित करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे.

शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.सुनिता फुलसौंदर सही/-

अनुमोदक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-<br>
सभापती<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- १०५ शनिवार दिनांक १७/१२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** शंकरराव निवृत्ती सोनवणे नागापुर उप कार्यालय वॉर्ड क्र.७२, बील क्र.४५९व ४६१ एम.आय.डी.सी.एम.एल.ब्लॉक सर्व्हे नं.९ ते २१ मनपा हद्दीतुन वगळल्याने आकरण्यात आलेली घरपटटीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ नागापुर विभाग

नागापुर उपविभागीय कार्यालय वॉ.क्र.७२ वसुली लिपिक यांजकडून विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, यापर्वी वॉ.क्र.७२ जे.पी.शिंदे यांचेकडे वसुली व कार्यालयीन कामकाजाबाबत होता सन २०१२ मध्ये शिंदे यांचे अकाली निधी झाले आहे.

वॉर्ड क्र.७२ मध्ये नागापुर एमआयडीसी ब्लॉक क्रमांकX१८ होता दिनांक ३०/६/१९९९ तत्कालीन नगरपरिषद असताना लहान लहान ग्रामपंचायतीचा (१२ गावाचा) समावेश होवून दिनांक १/७/१९९९ रोजी शहर पालिका हद्द वाढ होवून नागापूर एमआयडीसी ब्लॉक X१८समावेश होता. अहदमनगर महानगरपालिका दिनांक ३० जून २००३ घोषीत करण्यात आली होती.

तत्कालीन नगरपरिषदेमार्फत सन २००१-२००२ मध्ये हद्दवाढ भागासह संपुर्ण नगर शहराकरिता घरपट्टी आकारणी बाबत सर्व्हे घेण्यात आलेला होता. सदर सर्व्हेचे काम पुर्ण होवुन हद्दवाढ समावेश भागासह सन २००३-२००४ मध्ये आकारणी कारण्यात आलेली आहे.

सदर घरपट्टी सर्व्हेमध्ये परिशिष्ट "अ" फॉर्म पुस्तक बी.क्र.७२/४५९-Z१७२०३००८५ बी.क्र.७२/४६१-Z१७२०३००८७ नोंदी घेवून आकारणी करण्यात आलेली आहे.

मा. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग दिनांक १५ जानेवारी २००८ रोजी नागापुर एमआयडीसी भाग अहमदनगर महानगरपालिका (स.नं. ९ मं २१) हद्दीतून वगळले बाबत अधिसुचना पारित केल्याने बी.क्र.४५९ व ४६१ वर घरपट्टी केलेली आकारणी रक्कम मार्च २०१४-२०१५ अखेर (मे) रूपये ५,४८,०१२/- रद्द करणेबाबत मान्यतेस्तव तसेच मंजुरीनुसार संगणक विभाग रिव्हीजन रजिष्टर परिशिष्ट "अ" फॉर्म दुरूस्ती नोंद घेण्यास अहवाल मंजुरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक यांचा रिपोर्ट असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक यांचे प्रस्तावानुसार तसेच मा. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग दि.१५ जानेवारी २००८ अधिसुचना स.नं. ९ ते २१ वगळलेनुसार घरपट्टी आकारणी सन २०१४-२०१५ अखेर रूपये ५,४८,०१२/- रदद करण्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार मान्यतेस्तव सविनय सादर.(सोबत- मा.महाराष्ट्र शासन अधिसुचना छायांकित प्रत तसेच बील क्र.४५९/४६१)

यावर प्रभाग अधिकारी क्र.१ यांचा सहमती दर्शक सही

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, बील क्र. ७२/४५९ ,७२/४६१ मालमत्ता धारक यांनी सन २००७-२००८ अखरेचे मालमत्ता कर भरले आहेत का ? याचा खुलासा करावा तसेच महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग दि.१५ जाने.२००८ ची अधिसूचना प्रत जोडावी व सादर करावे.

यावर वॉर्ड क्लर्क यांचा अभिप्राय की, फेरसादर मिळकत धारक यांनी सन २००३ ते २०१५ अखेर मालमत्ताकर भरलेला नाही. तसेच महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचा दि.१५ जाने.२००८ ची अधिसूचना प्रत जोडण्यात आली आहे. पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत प्रकरणी कर मुल्य निरीक्षक , कर संकलन अधिकारी यांची स्पष्ट अभिप्राय घेउन सादर करावे. सर्व्हे नं.९ ते २१ मध्ये समाविष्ट आहे काय ?

यावर कर मुल्य निरीक्षक , कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत प्रकरणी महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे दि.१५ जानेवारी २००८ च्या अधिसुचनेनुसार सदर मालमत्ता स.नं. ९ ते २१ मध्ये समाविष्ट आहे.सदर भाग शासन निर्णयानुसार वगळल्याने मालमत्तेवरील थकबाकी वसुल न होणारी नसल्याने महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधि.१९४९ प्रकरण ८ कराधान नियम १५२ नुसार वसुल न होणारी रक्कम निर्लेखित करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो. असल्याने नमुद शासन निर्णय १५ जाने.२००८ पासुनची थकबाकी निर्लेखित करणेस हरकत नाही तथापी मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, उपरौकत मालमत्तेवरील थकबाकी वसुल झ ााल्यानंतरच "अ" प्रमाणे सहाय्यक मुल्य निर्धारक यांचा अभिप्रायानुसार कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत नुसार रक्कम वसुल न होण्याजोगी असल्याने निर्लेखित करणेकामी प्रस्ताव मे. स्थायी समिती सभेत घेणेबाबत आदेशार्थ स. सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की , सन २००८ पुर्वीची कर भरले बाबतची माहिती मागवावी.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, फेरसादर सन २००३-०४ रोजी नवीन हद्द वाढीतील कर आकारणी करणेत आलेली असुन सन २००३-०४ ते २००८ पर्यत कोणत्याही प्रकारे कर भरण्यात आलेला नाही पुढील आदेशार्थ सविनय सादर.

यावर वॉर्ड ऑफिस यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- शंकरराव निवृत्ती सोनवणे नागापुर उप कार्यालय वॉर्ड क्र.७२, बील क्र.४५९व ४६१ एम.आय.डी.सी.एम.एल.ब्लॉक सर्व्हे नं.९ ते २१ मनपा हद्दीतुन वगळल्याने आकरण्यात आलेली घरपटटीची रक्कम निर्लेखित करणे बाबत चा विषय आहे.

मा.श्री. दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- मुळ रक्कम निर्लेखित करू बाकीचे नाही.

मा.श्री.मनोज दुलम :- मनपा हद्दीतुन वगळल्याने आकरण्यात आलेली घरपटटीची रक्कम निर्लेखित मंजूर करावा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- शंकरराव निवृत्ती सोनवणे नागापुर उप कार्यालय वॉर्ड क्र.७२, बील क्र.४५९व ४६१ एम.आय.डी.सी.एम.एल.ब्लॉक सर्व्हे नं.९ ते २१ मनपा हद्दीतुन वगळल्याने आकरण्यात आलेली घरपटटीची रक्कम निर्लेखित करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे.शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** शंकरराव निवृत्ती सोनवणे नागापुर उप कार्यालय वॉर्ड क्र.७२, बील क्र.४५९व ४६१ एम.आय.डी.सी.एम.एल.ब्लॉक सर्व्हे नं.९ ते २१ मनपा हद्दीतुन वगळल्याने आकरण्यात आलेली घरपटटीची रक्कम निर्लेखित करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे.

शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.मनोज दुलम सही/-

अनुमोदक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका